म. ग्रं. सं. ठाणे
क्र. नं. 202
REFBK-0008822







# आजगांव दर्शन

ले.:- गुं. फ. आजगांवकर.

( प्रथमावृत्ति )

१९५४.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
बा. क्र. 8822

REFBK-0008822

किंमत ३ रु.

वृद्धिगत करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. कारण त्यामुळें एकप्रकारची निरोगी अशी ईर्ष्या निर्माण होते व विधायक कार्यासाठीं ती राबवूनही घेतां येते. असा अभिमान असल्याशिवाय व्यक्ति, कुटुंब, ग्राम, प्रांत व राष्ट्र यांची प्रगति झपाट्यानें होऊं शकणार नाहीं. आजगांवदर्शनानें हा क्षेमकर अल्पारंभ झाला आहे असेंच मी म्हणतों, व श्री. आजगांवकर यांच्या या प्रयत्नाचें चीज त्यांचे ग्रामस्थबंधु, शिक्षणाधिकारी व सर्वसामान्य जनता भरपूर प्रमाणांत करतील अशी आशाही मी प्रकट करतों.

त्रिविधवृत्त कचेरी<br>ता. ११-१०-५४

– चं. वि. बावडेकर



श्रीदेव वेताळ, आजगांव.

# आजगांव दर्शन

★ ★ ★

लेखक

गुं. फ. आजगांवकर

# धन्यवाद

माझ्या आईच्या इच्छेसाठीं म्हणून '**आजगांव दर्शन**' हा ग्रंथ मी लिहून पुरा केला. या ग्रंथाचें सर्व श्रेय तिला आहे. आजगांव ग्रामस्थांपैकीं श्री. भा. के. प्रभु, श्री. घ. आ. प्रभु, श्री. गोपाळ पावणे प्रभु, श्री. वि. गो. नातु, महाराष्ट्र-भाषा-भूषण श्री. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, श्री. स. फ. आजगांवकर, श्री. नारायण गोविंद प्रभु आजगांवकर, श्री. भा. रा. राजाध्यक्ष यांचें सहकार्य लाभलें. श्री. लक्ष्मण सखाराम प्रभु आजगांवकर, श्री. गणपत सखाराम प्रभु आजगांवकर, श्री. आत्माराम राघोबा आजगांवकर, श्रीमान् केशव जनार्दन गाडगीळ, कुरुंदवाड, यांच्या उत्तेजनामुळें ग्रंथ प्रसिद्धीचा योग लौकर आला. कु. मनोरमा नारायण राळकर यांनी माहितीच्या संकलनास हातभार लावला. याशिवाय माझ्या अनेक ग्रामस्थ बंधूंनी ह्या कार्यास शुभाशीर्वाद दिला आहे. त्या सर्वांना धन्यवाद देऊन हा ग्रंथ, आजगांवच्या श्रीदेव वेतोबास भक्तिपूर्वक अर्पण करतों.

१५ ऑगस्ट
१९५४

**गु. फ. आजगांवकर**
३३६। २ भाइजीवनजी लेन,
मुंबई २

# प्रस्तावना

कांहीं भूगर्भ शास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं, कित्येक लक्ष वर्षांपूर्वी हल्लींचा अरबीसमुद्र सह्याद्री पर्वतास लागलेला होता पुढें पृथ्वीच्या उदरांत कांहींतरी मोठी घडामोड होऊन किंवा एखादा मोठा प्रलयकारी भूकंप होऊन सह्याद्रीपासून समुद्र तीस चाळीस मैल मागें हटला व दमण-पासून कन्याकुमारीपर्यंत सुमारें १००० मैल लांबीचा भूभाग निर्माण झाला. हा भूभागही लक्षावधि वर्षे ओसाड पडलेला होता• पुढें परशुराम नामक एका अवतारी पुरुषानें, निरनिराळ्या ठिकाणचे लोक या प्रदेशांत आणून येथें वसाहत केली व अशारीतीनें अपरान्त, कोंकण, मल्याळ वगैरे देश निर्माण झाले. या देशांपैकीं हल्लींच्या रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागांत, गोमांतकाच्या सीमेजवळ **आजगांव** या नांवाचा सुमारें ५॥ हजार लोकवस्तीचा मोठा गांव आहे. त्या गांवचा ऐतिहासिक, धार्मिक, सामा-जिक व आर्थिक वृत्तांत श्री. गुं. फ. आजगांवकर यांनी प्रस्तुत पुस्तकांत देण्याचा प्रयत्न केला आहे. आजगांव हें नांव आद्यग्राम या मूळ संस्कृत नांवाचें अपभ्रष्ट रूप आहे हें उघड दिसतें व यावरून या भागांत पहि-ल्यानें हाच गांव वसविण्यांत आला असावा असें वाटतें. या गांवांतील रवळनाथ नामक देवाच्या मूर्तीसभोंवतीं एक शिलालेख आहे, तो सुमारें ६०० वर्षांपूर्वीचा असावा असें कांहीं संशोधकांचें मत आहे. आजगांव गांव फार जुना आहे, इतकेंच नव्हे तर बहुतेक सर्व जातींचे व धर्मांचे लोक या गांवांत फार प्राचीन काळापासून रहात आले आहेत. चित्पावन, कऱ्हाडे, किरवंत व गौडब्राम्हणांच्या तीन पोटजातींचे ब्राम्हण, मराठे, तेली, तांबट, भंडारी, सोनार, कुंभार, गवंडी, धोबी, सुतार, देवळी, वैश्य, न्हावी, गुरव, धनगर, महार, चांभार, मुसलमान, किरिस्तांव इत्यादि सर्व जातींचे लोक आजगांवांत आहेत. सुमारे १५।१६ आडनांवाचे चित्पावन ब्राम्हण आजगांवांत आहेत आणि आपटे, गाडगीळ, परांजपे, गोगटे वगैरे आड-नांवाचे जे चित्पावन ब्राम्हण हल्लीं सर्वत्र पसरले आहेत, त्यांचा मूळचा गांव आजगांवच होय. एका काळीं आजगांव हा चित्पावनांचा बाले किल्ला (Strong hold) होता याचा पुरावा म्हणजे त्या गांवांत असलेलें

श्रीपरशुरामाचें पुरातन देवालय होय. चिपळुणाजवळच्या परशुराम क्षेत्रा-शिवाय परशुरामाचें दुसरें देवालय फक्त आजगांवांतच आहे, इतरत्र नाहीं व या गोष्टीचा उल्लेख कै. प्रा. राजाराम रामकृष्ण भागवत यांनी आपल्या एका ग्रंथांत केला आहे.

आजगांवांतील वेताळ, रवळनाथ, पुरमार इत्यादि देवतांची देवालयेंही फार जुनी असून त्यापैकीं कांहीं देवतांचें आगमन आजगांवांत कोणत्या कारणानें झालें या संबंधीच्या दंतकथा फार मनोरंजक आहेत. एवंगुण-विशिष्ट अशा या आजगांव गांवासंबंधाची बहुतेक सर्व जुनी नवी माहिती श्री. गु. फ. आजगांवकर यांनी मोठ्या परिश्रमानें मिळवून या पुस्तकांत दिली आहे. सर्व साक्षर आजगांवकरांनीं हें पुस्तक विकत घेऊन त्यांच्या श्रमाचें चीज करावें अशी त्यांना माझी विनंति आहे.

हरिनिवास, दादर
मुंबई. ता. १५ एप्रिल १९५४

**ज. र. आजगांवकर**


# सुंदर माझा गांव

सुंदर माझा गांव
येथें रंक न कोणी राव !
हिरव्यागार भूमिनें नटला
वृक्षलतांनीं बहरुन आला
फळाफुलांनीं विनम्र झाला
द्वेषाचें नच नांव
सुंदर माझा गांव ॥१॥

सहकाराचें प्रेमळ जीवन
सहानुकंपा आर्तां लागुन
बंधुभावना परस्परांतुन
संतपदांबुजिं भाव
सुंदर माझा गांव ॥२॥

विद्वत्तेनें गौरविलेला
दीर्घोद्योगें पुढारलेला
औदार्यानें भूषविलेला
क्षुद्रत्वा नच वाव
सुंदर माझा गांव ॥३॥

— गुंफराज


कसबे आजगांव
तर्फ मजकूर तालुका सावंतवाडी
जिल्हा रत्नागिरी


१८२६
दि. ३
२०
नो. रि. ३०१७

# सुंदर माझा गांव

'सुंदर माझा गांव' असें माझ्या गांवाचें अगदी यथार्थ वर्णन करतां येईल. मी कुठेंहि असलों तरी माझें मन माझ्या गांवांत रेंगाळत असतें. माझ्या मनांत बालपणांतील अनेक गोड आणि मधुर स्मृति जागृत होतात माझ्या वाडवडिलांनीं बांधलेल्या घरांतून माझी प्रियतम आई, वडील, भाऊ माझी आठवण करीत असतात. माझ्यावर निरतिशय प्रेम करणारे सगेसोयरे, मित्र, शेजारी ह्या माझ्या गांवांत राहतात आणि मी गांवीं गेलों कीं त्यांच्या पवित्र आणि निर्व्याज प्रेमास भरतें येतें. माझ्या वाडवडिलांच्या असंख्य पिढ्या याच गांवांत जन्मल्या, नांदल्या आणि गांवाच्या उत्कर्षास हातभार लावीत असतांना कामीं आल्या. त्यांच्या जन्मोत्सवाच्या आनंदांत आणि मृत्यूच्या दुःखांत सारा गांव सामील झाला होता. विद्वत्ता, वक्तृत्व आणि उद्योग या गुणांची माझ्या गांवांतील लोकांना नैसर्गिक देणगी आहे. माझ्या गांवांतील लोक जसे स्वाभिमानी आहेत तसे सत्यप्रियहि आहेत. पुरातन कालापासून चालत आलेले दैवी कायदे येथें मानले जातात आणि पाळले जातात.

माझ्या गांवांत श्रीमंतीचा आणि सत्तेचा दिमाख कोठें दिसत नाहीं. याचक वृत्तीनें दुसऱ्याच्या श्रमावर जगणारीं बांडगुळें येथें नाहींत. येथें अनेक धर्मांचे, पंथांचे आणि विचारप्रणालीचे लोक गुण्यागोविंदानें राहतात. प्रत्येकानें सहिष्णुवृत्तीनें जगावें हें प्रत्येकाच्या अंगवळणीं पडून गेलें आहे. प्रत्येकजण आपल्या नांवापुढें आपल्या गांवाचें नांव लावतो. 'आजगांवकर' हें नांव एकीचें, प्रेमाचें, बंधुभावाचें, स्वाभिमानाचें प्रतिक आहे. माझ्या गांवचीं माणसें पृथ्वीच्या पाठीवर दूरवर पसरलेलीं आहेत. तेथील त्यांचें कर्तृत्व गांवाच्या कीर्तींत भर घालतें.

माझ्या गांवची संस्कृति म्हणजे हजारों वर्षें भारतांत दृढमूल होऊन राहिलेल्या पवित्र भारतीय संस्कृतीचा अखंड वाहता प्रवाह आहे. परंतु या



# कसबे आजगांव

तर्फ मजकूर तालुका सावंतवाडी

जिल्हा रत्नागिरी

सर्वांगसुंदर गांवाचा इतिहास कोणी लिहून ठेवलेला उपलब्ध नाहीं. रत्नागिरी जिल्हा ही नररत्नांची खाणच आहे. ह्या पुण्यभूमींतील खेड्यांना प्रभावी इतिहास आहे. तो लिहिला गेला पाहिजे. खेडेगांवचीं हीं छोटीशीं राज्यें ग्रामदेवतांच्या आधिपत्याखालीं शतकानुशतकें चालत आलीं आहेत. ह्या ग्रामराज्यांचा इतिहास म्हणजे मुख्यतः देवस्थानचा इतिहास होय. मान-पान व न्यायदान या सर्व बाबतींत देवस्थानचा अधिकार श्रेष्ठ होता, देवस्थानच्या बाबतींत प्रत्येकाचे हक्क मर्यादित झालेले व परंपरेनें चालत राहणारे आहेत. या बाबतींत कित्येकदां कित्येक गांवांतून भांडणें व रक्त-पात झाल्याचीं उदाहरणें आहेत. परंतु माझा गांव देवाचा, पंचायतीचा व न्यायालयाचा निर्णय मानतो. अनेक वर्षांनीं क्वचित् निर्माण झालेले हे वाद थोड्याच कालावधींत मागें पडतात आणि मग वाद घालणाऱ्या दोन्ही पक्षांत वैराचें अस्तित्वच राहत नाहीं. जणू झालेलें भांडण हें खेळांतील व खेळापुरतेंच निर्माण झालेलें होतें. देवस्थानविषयक वादाची या इतिहासांत घेतलेली माहिती साधार आहे. त्यामुळें भावी पिढीला अशा वादापासून तत्त्वतः कांहीं फायदा आहे कीं काय याचा विचार करणें सुलभ होईल. तत्कालीन न्यायदान आणि भाषा यांचा अभ्यास करणारांना निवाडे व सनदा उपयुक्त होतील.

ज्या कांहीं थोड्या चित्पावन ब्राम्हण घराण्यांची माहिती उपलब्ध होऊं शकली तेवढी दिली आहे. आजगांवांतील ब्राम्हणेतर, घराण्यांची माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला परंतु ती व्यवस्थितपणें कोणीही पुरवूं शकला नाहीं. आणि म्हणून केवळ नामनिर्देशानें त्यांचा उल्लेख करावा लागला. वृत्तपत्रांतून जाहीर केलेल्या विनंतीस अनुलक्षून ज्यांनीं वंशावळी व माहिती पाठविली त्याचा उपयोग केला गेला आहे. या ग्रंथांत ज्या चुका आणि माहितीचा अपुरेपणा राहिला असेल तो माझ्या निदर्शनास आणून दिल्यास पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाच्यावेळीं योग्य ती दुरुस्ती करीन असें आश्वासन देऊन ठेवतों.



श्रीदेव रवळनाथ



श्रीदेवी भूमिका

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ८८२२



# आजगांवची वसाहत कोणी वसविली ?

'सह्याद्रिखंड' ह्या नांवाचा एक पौराणिक ग्रंथ इ. स. १८७७ सालीं जे. जर्सन द. कुन्हा यांनी पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला होता. त्यांनी त्यासाठीं एकंदर चौदा पोथ्या एकत्र केल्या व संशोधिल्या. कोचीन, जुन्नर, मुंबईची रॉयल एशियाटिक् सोसायटी, कोटा, सिद्धपूर, काशी वगैरे भागांतून ह्या प्रति गोळा केल्या होत्या. ह्या ग्रंथाची रचना शिवकालांत केव्हां तरी झाली असावी या ग्रंथांत आजगांवची माहिती आली आहे.

कोंकणप्रांत ही परशुरामाची भूमि म्हणून प्रसिद्ध आहे. परशुरामानें समुद्र मागें हटवून ही भूमि अस्तित्वांत आणली. गंगाकिनारीं राहणाऱ्या ब्राम्हण कुलांना आणून त्यांना ती वांटून दिली. ही ब्राम्हण घराणीं वेद-शास्त्रसंपन्न होतीं असें दिसतें. त्यापैकीं कांहीं मत्स्याहार करीत असत. इंग्रजी अंमलांत हीं घराणीं इंग्रजी अभ्यासाच्यामागें लागलीं. वैदिक विद्या मागें पडली. विद्या आणि बुद्धिमत्ता यांच्या जोरावर हे लोक पुढें आले. हळूहळू त्यांपैकीं कांहीं लोकांनीं आपले गांव सोडले. ज्या ज्या ठिकाणीं हीं ब्राम्हण कुळें गेलीं तेथें तेथें तीं स्थायिक झालीं. आजगांवच्या बाबतींतही तसेंच झालें आहे. आजगांवचीं अनेक कुलें आतां महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राबाहेर विखरून आहेत. आणि त्यांची माहिती देणें सर्वथा अशक्य आहे. 'कोकणाख्यान' या नांवाचा एक जुना ग्रंथ आहे. त्यांतील कांहीं ओंव्या निवडून येथें देतों–

चौदा बाणें चळण केलें । म्हणोनी चौदाचळ म्हणीतलें । शतयोजनें कोंकण जालें । ऐसें यापरी ।। हें ऐकोनि ब्राह्मण । पंचद्राविड पंचगौड जाण । भूमि सप्तधा विभागून । ब्राम्हणां दान दिधली ।।

आजगांवसे महा थोर । जेथ देव वेताळ प्रखर । नित्य पुराण कथा जागर । महोत्साह होतसे ।। सन्निध तिवरें ग्राम । तेथ माउली म्हणती उत्तम । ब्राम्हण अग्निहोत्री नाम । वसताती पैं तेथें ।। आणिक म्हापण वेतोरेसी । खानोली दाभोली आजग्रामासी । गोवळण माळगांव या सहाग्रामासी । मतकरी यांसी म्हणती ।।

आजगांवीचे मतकरी। ते म्हाडगांवीचे भारद्वाज गोत्री। राळकर ते कौंडण्य गोत्री। लोटली ग्रामसासष्ठीचे ।।

ह्या उल्लेखावरून असें दिसतें कीं, म्हाडगांवीं राहणारे व तेथें अग्रमान भोगणारे भारद्वाज गोत्री ब्राह्मण होते. त्यापैकीं कांहींनीं येऊन आजगांव हा गांव वसविला. तेथें ते पहिले मानकरी म्हणून स्वतः अधिकार भोगूं लागले. मागाहून जीं घराणीं आलीं त्यांना अनुक्रमें मान मिळाले असावेत. त्यांत ढाकोरें येथें राहणारें राळकर घराणें सासष्टी येथील लोटली गांवचें होतें असें दिसते. कोंकणाख्यानांत, द्रव्य वसुलीचा अधिकार म्हाडगांव येथील ब्राह्मण कुलाकडे होता, म्हणून म्हाडगांव हा मुख्य ग्राम मानला जाई, असा उल्लेख आहे. त्यावरून तेथून आलेल्या कुलानें नवीन वसाहतील 'आद्यग्राम' हें नांव दिलें असावें. त्याचें अपभ्रष्ट रूप 'आजगांव' हें होय.

आजगांवांतील सर्व प्राचीन देवस्थानें पाहिलीं तर तीं बहुतेक शंकराचीं दिसून येतात. गणपति व परशुराम यांचींही देवळें आढळतात. आदित्यनाथाचें प्राचीन देवालयही येथें आहे. ह्या सर्व प्राचीन देवतांचा विचार केला तर 'आजगांव' हा गांव ब्राह्मण कुलांनीं प्रथम वसविला हें दिसून येतें. पुढें कालाच्या ओघांत निरनिराळ्या कारणांनीं इतर लोक गांवांत येऊन स्थिर झाले असावेत–आणि त्यांना 'ग्रामस्थ' म्हणून अधिकार मिळत गेले असावेत. आजगांव कोणी वसविला, येथें कोण नांदले, आज कोण आहेत आणि पुढें कोण असतील याचा जर विचार केला तर असें म्हणणें भाग आहे कीं या भूमीच्या मालकीचा ताम्रपट कोणा एकालाच दिलेला नाहीं. या गांवावर ज्याचें विशुद्ध आणि सात्विक प्रेम आहे व आजगांवच्या दैवी परंपरेंत जो भर घालील, त्यानेंच स्वतःला 'आजगांवकर' म्हणवून घेण्यांत कांहीं महत्त्व आहे.

दक्षिण रत्नागिरी भागांत रेवतीद्वीप हें फार प्राचीन स्थान असून तेथील 'रेवतीपत्तन' हें व्यापार व कलाकौशल्य यांनीं संपन्न होतें. प्राचीन काळीं तें प्रसिद्ध बंदर होतें, कालाच्या ओघात आणि भूगर्भाच्या फेरफारांत ह्या बंदराचें अस्तित्व नष्ट होऊन अवशेष राहिलेला भाग 'रेडीपाटण'

म्हणून आजही ओळखला जातो. शेंकडों वर्षें आजगांव हा बंदरी गांव होता. आजगांवांत 'पार' या नांवानें जो भाग आज दाखविला जातो तेथपर्यंत व्यापारी गलबतें पूर्वी येत असत. तसेंच 'पेठ' (सावकारवाडा) म्हणून जो भाग दाखविला जातो तेथें पूर्वीं भली मोठी व्यापारीपेठ अस्तित्वांत होती. ५०।६० वर्षांपूर्वीपर्यंत आजगांव हें व्यापारी उलाढालीचें एक महत्त्वाचें ठिकाण होतें. रामघाट आणि बेळगांवघाट या मार्गीनें शेंकडों बैलगाड्या व बैलांचीं लमाणें मालाची ने-आण करीत असत. त्याकाळीं आजगांवच्या लोकांना चरितार्थासाठीं गांवाबाहेर जाण्याचा प्रसंग क्वचितच येई. आज मात्र व्यापारदृष्टचा गांवाचें स्थान खालावलें आहे.

## आजगांवच्या सीमा व गांवांतील वाड्या

आजगांवच्या पूर्वेस आरोस, दक्षिणेस तिरवडें व गुळदुवे, आग्नेयेस तळवणें, नैऋत्येस शिरोडे, पश्चिमेस आरवली, वायव्येस आसोली, उत्तरेस मातोंड व ईशान्येस न्हावेली हे गांव लागतात. आजगांव व मळेवाड येथें पूर्ण प्राथमिक शाळा आहेत. लोकसंख्या १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें ५७०४ आहे. आजगांवांत चित्तपावन वैदिक ब्राह्मणांची बरीच मोठी वस्ती होती, पण हल्ली ती मोडकळीस येत चालली आहे. गौड ब्राह्मणांपैकीं मतकरी, राळकर व सारस्वत ब्राह्मण घराणीं आहेत. मोठा वर्ग म्हणजे मराठे, भंडारी, ख्रिश्चन यांचा असून एक मुसलमान घराणेंही आहे. महार लोकांची सुमारें चाळीस घरें असून आजूबाजूच्या इतर गांवांपेक्षां त्यांना येथें मानमरातब व धान्यादि वसुलीचा हक्क अबाधित चालत आला आहे.

आजगांवांत एकूण नऊ वाडे आहेत. १ बांधवाडा २ सावकारवाडा ३ भोमवाडा ४ देऊळवाडा ५ माळयार ६ ढाकोरें ७ वरची मळेवाड ८ खालची मळेवाड ९ कोंडुरें.

**गायरान**— जनावरांच्या चराईच्या सोयीसाठीं गायरान म्हणून १०९ एकर २९ गुंठे जमीन सारा माफीनें विशेष सार्वजनिक कामाकरितां सोडून देण्यांत आली आहे. गायरान म्हणून एवढ्या विस्तीर्ण क्षेत्राची जमीन सोडल्याचें रत्नागिरी जिल्ह्यांत हें एकच उदाहरण आहे. ह्या

जमिनींत आधुनिक पद्धतीनें जमिनीची मशागत करून चांगलें गवताचें पीक काढतां येईल व त्यामुळें गांवचा अनेक प्रकारें फायदा होण्यासारखा आहे. भावी काळांत ग्रामपंचायतीनें ( आज अस्तित्वांत नाही ) किंवा सहकार मंडळानें या प्रश्नाकडे लक्ष पुरवावें.

**दुकम तलाव**— गांवच्या शेतीच्या उपयोगासाठीं दुकम नांवाचा उन्हाळी तलाव केला जातो. त्यांत लक्षावधि कमलें फुलतात. सभोवारच्या नारळी-पोफळीच्या सावल्या आणि अनंत आकाश, त्या नील कमलांनीं भरून गेलेल्या पाण्यांत जेव्हां प्रतिबिंबित होतें तेव्हां तो देखावा नयना-ल्हादक वाटतो. हा तलाव गांवच्या दक्षिण भागाजवळ असून त्याच्या एका बाजूस पूर्वपश्चिम शिरोडा-सावंतवाडी राजरस्ता आहे. इतर तिन्ही बाजूस गांवची वसाहत आहे. रस्त्यास लागून दक्षिणांगानें उन्हाळी व पावसाळी भातपिकांचा विस्तीर्ण मळा आहे.

**वजर**-ढाकोरें वाडींतील उमाळा कुरांगळी या भागांतून पाण्याचा एक मोठा प्रवाह वहात येतो. हा वेतोबाच्या देवळामागून वहात जात तिरोड्याच्या खाडीला मिळतो. वेतोबाच्या देवळामागें हा प्रवाह सुमारें चाळीस फूट उंचीवरून धबधब्याप्रमाणें खालीं पडतो. पावसाळ्याच्या दिवसांत हें दृश्य पाहण्यासारखें असतें. पावसाळा संपण्याच्या सुमारास बांध घालून हें पाणी पाटानें दुकम तळ्यांत व भटवाडींतील बागायतीसाठीं नेलें जातें.

**कोल्हेटेंब**-१९३९ सालीं, रावसाहेब मंगेश नारायण राजाध्यक्ष यानीं गायरानामध्यें जाण्यायेण्यासाठी ९ फूट रुंदीच्या रस्त्याकरितां सरकारकडून जमीन मिळविली होती. हा रस्ता कोल्हेटेंब टेंकडीवर जातो. तिच्या माथ्यावर श्री. मंगेशराव राजाध्यक्ष यांनी एक दगडी चवुतरा बांधून ठेवला आहे. ही जागा उंचावर असून हवेसाठीं बसण्याचें हें उत्तम ठिकाण आहे. तेथून रेडीचा किल्ला, समुद्र व वेंगुर्लें बंदर येथपर्यंतचा भूप्रदेश दृष्टीच्या टप्प्यांत येतो.

# आजगांवच्या जमिनीची विल्हेवारी

आजगांवचें एकूण क्षेत्र ७८२९ एकर ¾ गुंठा येवढें आहे. त्यांत उत्पन्नाच्या दृष्टीनें ( लावणीस ) योग्य अशी जमीन ५३०२ एकर ⅘ गुंठे इतकी आहे. लावणीस निरुपयोगी जमीन ( पोटखरावा ) २३२० एकर २८ गुंठे व नदीनाले ७६ एकर ४½ गुंठे येवढी आहे. आजगांवांत मसणवटीसाठीं ( स्मशानासाठीं ) २ एकर ६¾ गुंठे जमीन राखून ठेवण्यांत आली आहे. रस्ते व सडका यांसाठीं ३२ एकर २५¾ गुंठे जमीन उपयोगांत आणलेली आहे. देवालयासाठीं १ एकर ६ गुंठे, धर्मशाळेसाठीं ४¾ गुंठे जमीन ठेवलेली असून गायरानाकरितां १०९ एकर २९ गुंठे जमीन सोडली आहे. जमिनीचा आकार ६४८९ रु. १२ आ. २ पै आहे.

इतर विशेष कामासाठीं ठेवलेली जमीन पुढीलप्रमाणें आहे–

फॉरेस्ट किंवा अरण्य (तीन एकर अठ्ठावीस गुंठे)
डिस्टिलरी व विहीर (एक पूर्णांक एक चतुर्थांश एकर)
पोलीसचौकी (चार पूर्णांक एक चतुर्थांश गुंठे)
टोलनाकें (दोन पूर्णांक एक चतुर्थांश गुंठे)

हल्लीं पोलीसचौकी व टोलनाकें सरकारनें बंद केलें आहे. संस्थानी अंमलांत तीं चालू होतीं.

**निखार्ग्यांची मानस**– सर्वे नंबर ४९७।४९८ यांत पाणी जाण्या-येण्यासाठीं पूर्वी मानस बांधलेली होती. ती मोडून गेल्यामुळें सुमारें २५ एकर जमीन लागवडीस कमी येऊं लागली आहे. शिवाय भरतीच्यावेळीं समुद्राचें खारें पाणी जमिनींत पसरत असल्यामुळें, त्याचा पिकावरही वाईट परिणाम होतो.

**आजगांवची गंगा**– देऊळवाडा येथें रामेश्वराचें लहानसें देवस्थान आहे. तेथें गंगेचा प्रवाह सतत वहात असतो. त्यामुळें भाविक लोकांची ह्या तीर्थावर मोठी श्रद्धा आहे.

## आजगांवचें उत्पन्न-

आजगांवांत मुख्य धंदा शेती असून गांवास पुरेल एवढें भाताचें पीक येतें. शिवाय नागली, वरी, उडीद, व कुळीथ यांचें उत्पन्न आहे दुसरें महत्त्वाचें उत्पन्न नारळ व काजूचें आहे. १९४७ पर्यंत सरकारी नियंत्रणाखालीं येथें दारू गाळण्याची भट्टी चालत असे आणि त्यामुळें ख्रिश्चन लोकांचा तोच एक उपजीविकेचा व्यवसाय होता. हल्लीं दारूबंदीचा कायदा अस्तित्वांत असल्यानें हा धंदा साफ बसला आहे. कोकम ( रातांबे ), आंबे, सुपारी, फणस, भाजीपाला वगैरे उत्पन्न देणाऱ्या बावी आहेतच. येथील कांहीं ख्रिश्चन बायका मासे विक्रीचा धंदा करतात.

**खनिज पदार्थ** – ढाकोरें, कोंडुरें व मळेवाड येथें मँगनिज धातु असून, मधली मळेवाड येथें लोखंड व कुंभारकामाची माती सांपडते. रंगाचें काम करण्यास उपयुक्त अशी पांढरी शाडू व उतम केशरी रंग असलेली माती डोंगर माथ्यावर विपुल प्रमाणांत आढळते.

**चक्क्या किंवा गिरण्या** – आजगांवांत एकूण चार भाताच्या आणि पिठाच्या गिरण्या आहेत. पूर्वी येथें काजूचे कारखाने चालत असत आणि त्यामुळें सुमारें चारशें लोकांना कामधंदा मिळे. गांवांत उद्योगधंदे निर्माण झाल्यास गांवांतील तरुणांना चरितार्थासाठीं मुंबईत जावें लागणार नाहीं आणि गांवही समृद्ध होईल.

## आजगांवचीं देवस्थानें


श्रीदेव वेताळ ही आजगांवची प्रमुख देवता असून ती पंचायतनापैकीं आहे. पंचायतन म्हणजे श्रीदेव वेताळ,श्रीदेव रवळनाथ श्रीदेव सर्वेश्वर, एक श्रीदेव रामेश्वर आणि श्रीदेवी भगवति म्हणजेच भूमिकादेवी. ह्या भूमिकादेवीला कित्येकजण आदिशक्ति माउली असेंही म्हणतात. श्रीदेव वेताळ हा देव कैलासनाथाच्या अष्टगणांपैकीं एक आहे. मूर्तीची आकृति मनुष्यासारखी असून दिसण्यांत भव्य व पश्चिमाभिमुख आहे. या द्विभुज मूर्तीच्या उजव्या हातांत त्रिकोश खड्ग व डाव्या हातांत पाणिपात्र असून मूर्तीच्या



श्री देव खळनाथ



लेखक :- गुं. फ. आजगांवकर.



श्री. स. फ. आजगांवकर.

विनोदी वक्ते व विनोदी लेखक

पायांबरोबर तिचे आनुषंगिक गण आहेत. त्यांतच गाडगीळ या ब्रह्मकुलाचा अधिपति पुरुष आहे. तसेंच मूर्तीच्या डाव्या बाजूस श्रीसिद्धपुरुष-आजगांव ग्रामस्थांपैकीं प्रमुख मतकरी कुलाचा पूर्वज असून, त्याची द्विभुज मूर्ति आहे. श्रीदेव वेताळाचें देवालय फार मोठें आहे. सभामंडपांत दोन हजता माणसें सुखानें बसूं शकतील. याच देवस्थानाला लागून देवाच्या डाव्या हाताला श्रीदेवी भूमिकेची मूर्ति आहे. तिचे बाजूस ती स्थापन करणारा आदिमायेचा उपासक पुरुष-मायेचा वंस ( वंश ) व आणखी बरेचसे वंश पुरुष आहेत.



# श्रीदेव रवळनाथ व प्राचीन शिलालेख

श्रीदेव रवळनाथाचें देवस्थान कुडाळ प्रांतांत प्रत्येक गांवांतून आढळतें. परंतु आजगांवच्या देवतेच्या मूर्तींत उत्कृष्ट कारागिरी दिसते. येथील देवस्थानांच्या व्यवस्थेंत हा एक विशेष आहे कीं, त्यांत ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्व हिंदूंना अधिकार व हक्क दिलेला आहे. 'रवळनाथ' हें 'रेवणनाथ' या नांवाचें रुपांतर असावें, असेंही कांहीं संशोधकांचें मत आहे.

सुप्रसिद्ध इतिहास संशोधक कै. रावबहादूर वा. अ. बांबर्डेकर यांनीं 'विद्यासेवक' वर्ष ३ रें अंक ४ था यांत लिहिलेल्या लेखावरून आजगांवच्या रवळनाथ मूर्तीवरील कोरलेला लेख मोठ्या चर्चेचा व संशोधनाचा विषय होता असें दिसतें. ते म्हणतात, "मूर्तीच्या सिंहासनावर व प्रभावळीवर एक लेख कोरलेला असून हा अद्याप वाचला गेलेला नाहीं. फक्त दोन तीन ओळी लागल्या त्या अशा":—

"श्रीगणेशायनमः स्वस्ति श्रीशालिवाहन शके ११४८ वर्तमान विरोधि संवत्छर शुभं भवतु।"

कै. बांबर्डेकर यांच्या 'विद्यासेवक' मासिकांत लिहिलेल्या वरील लेखाशिवाय पुणें येथें भरलेल्या भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या चौदाव्या संमेलनांत पुढील आशयाचा आणखी एक निबंध वाचला होता.

"हा शिलालेख 'रवळनाथ' मूर्तीच्या सिंहासनावर व प्रभावळीवर कोरलेला आहे. लेखाचा संवत् विरोधी असून बार्हस्पत्य पद्धतीचा आहे व लेखनपद्धति आणि शिल्पकला त्या प्रांताची स्वलक्षण अशीच दिसून येते. या मूर्तीची स्थापना तेराव्या शतकाच्या सुरवातीची दिसते."

परंतु शिलालेखाचें प्रत्यक्ष वाचन केलें असतां असें दिसतें की 'शके १५४५ रुधिरोद्गारी नाम संवत्सरे' असा उल्लेख आहे. यावरून मूर्तीस आज ३३१ वर्षें होतात. या रवळनाथाजवळच उत्तर बाजूस मूळची अनादि रवळनाथाची, दक्षिणाभिमुख लहान मूर्ति आहे.

श्री देव रवळनाथ म्हणजे श्रीशंकराच्या हिमालयावरील अवतारांपैकीं केदारनाथ! हा देव दक्षिण देशामध्यें दक्षिणेश्वर ज्योतिबाराय या नांवानें

प्रसिद्ध आहे. रवळनाथपुराण या छापील पोथींत भूतनाथ म्हणजे वेताळ व रवळनाथ या देवतांचें पूजाविधि, इतिहास आणि उपासनेचे मूलमंत्र दिले आहेत. 'रुद्रयामक' या ग्रंथांत वेताळ देवतेचें सविस्तर वर्णन व महत्व सांगितलें आहे.

## श्रीसर्वेश्वर व श्रीरा श्वर

श्रीदेव सर्वेश्वर व श्रीदेव रामेश्वर हीं दोन्ही शिवलिंगें असून त्यांचीं उपासक कुलें येथें वास्तव्य करून आहेत. शिवाय वतनदार ग्रामस्थांच्या श्रीदेव नारायण व श्रीदेव आदित्यनाथ हीं कुलदैवतें आहेत. श्रीदेव आदित्यनाथ म्हणजे सप्तमुखी अश्वाच्या रथांत बसलेली श्रीसूर्यमूर्ति. ही तांबूस धातुमय दगडाची असून हें देवस्थान ५०० वर्षांचें जुनें असावें. याशिवाय श्रीदेव परशुराम, जो चित्तपावन ब्राह्मणांचा आराध्य देव, त्याचें जुनें देवालय असून त्यांची पूजाअर्चा होत असतें.

## गणपतीचीं देवस्थानें

आजगांवांत गणपतीचीं तीन देवस्थानें आहेत. एक ढाकोरें वाडीच्या शेवटास आहे. याला अल्पशी सरकारी नेमणूक आहे. दुसरें कान्देरकर यांच्या ढाकोरें येथील ठिकाणांत आहे. येथील विशेष चमत्कार असा कीं, बाराही महिने सतत वाहणारा पाण्याचा प्रवाह येथें आढळतो. हा प्रवाह उन्हाळ्यांत कमी होत नाहीं. तिसरी गणपतीची मूर्ति आजगांव येथील भटवाडींत असून त्याची पूजा आपटे घराण्याकडून होत असते. शिवाय मळेवाड येथें बलरामाचें जुनें देवालय आहे. त्याला मुसळादेव असें म्हणतात.

## श्रीलक्ष्मीनारायण

'श्रीलक्ष्मीनारायण' ही ढाकोरें येथील प्रमुख देवता असून हें देवस्थान सुमारें आठशें वर्षांचें जुनें असावें. श्रीनारायणमूर्ति पुरुषोत्तम रूपाची आहे. या देवस्थानाजवळच नारायणतळें आहे.

## घोडे मूख

मळेवाडपासून थोड्या अंतरावर घोडे मूख नांवाचें एक प्रसिद्ध स्थान आहे. आजगांव, न्हावेली व मातोंड या तिन्ही गांवच्या सीमेवर हें देवस्थान

आहे. सुमारें अर्धा मैल उंच चढून गेल्यावर घोड्याच्या तोंडाप्रमाणें एक दगडी पाषाण पहाण्यास मिळतो. हें देवस्थान जागृत असून तिन्ही गांवचे देव, आपल्या लव्याजम्यासह वर्षांतून एक वेळ येथें येऊन जात असतात.

## आजगांवचें जागृत देवस्थान आणि कांहीं दैवी चमत्कार

गोमंतकांतील सावर्डें स्टेशनपासून अदमासें दीड कोसावर काकोडें या गांवीं साठेबुवा पुणेकर रहात असत. हल्लीं त्यांचे वंशज तेथें आहेत. पुणेकर साठे हे हरिदास होते. त्यांना पोटदुखीची व्यथा फार होती. साठे-बुवांनीं आजगांवच्या वेतोबास नवस मागून घेतला कीं, जर माझी पोटदुखी नाहींशी झाली तर दरवर्षी तुझ्यापुढें रामनवमीस कीर्तन करीन. नवस मागितल्यावर थोड्याच दिवसांनीं औषधाशिवाय पोटदुखी बंद झाली. साठेबुवा पुढें दरवर्षी रामनवमीस आजगांवीं येऊन कीर्तन करीत. परंतु एके वर्षी त्यांनी देशावरील एका गांवीं उत्सवाचें आमंत्रण स्वीकारलें आणि तेथें जाऊन पहिल्या दिवशीं कीर्तनास उभे राहिले. परंतु चमत्कार असा कीं, त्यांची पोटशुळाची व्यथा तत्काळ सुरू झाली. साठेबुवांनी श्रीदेव वेतोबाची प्रार्थना केली व उद्यां निघून आपल्यापुढें कीर्तनासाठीं हजर होतों असें सांगितलें. त्याबरोबर पोटशूळ ताबडतोब थांबला. पुढें साठे-बुवांच्या मागून त्यांचे चिरंजीव दादाबुवाही आजगांवीं कीर्तनास जात असत. ( आपटे घराण्याचा इतिहास पृ. २ )

## देव मुका कां झाला ?

आजगांव, तिरोडें व शिरोडें या तिन्ही गांवांच्या मुख्य देवता आजगांव येथील वेताळ व रवळनाथ या होत. आणि त्यांच्या सांगण्यावर जनतेची श्रद्धा आहे. तिरोडें येथें स्थायिक झालेलें सावंत भोंसले घराणें आजही प्रसिद्ध आहे. त्यांतील एक पुरुष आझाद-हिंद-सेनानी जनरल जगन्नाथराव भोसले, भारताचे पुनर्वसाहत खात्याचे उपमंत्री आहेत. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे ते उजवे हात होते. यांच्या एका पूर्वजाचा खून मळगांवच्या मेटांत ( खिंडींत ) झाला. त्या खुनाशीं सावंतवाडीच्या तत्का-लीन राज्यकर्त्यांचा संबंध होता असें सांगतात. त्याकाळीं सावंतवाडी संस्थानावर विजापूरकरांचें अधिपत्य होतें. सावंतवाडीकर सरदेसाई सर-देसकीचें काम पहात असत. त्यांत आपणास हिस्सा मिळावा अशा अर्थाच्या

सनदा, ज्याचा खून झाला त्या कृष्णरावानें विजापुराहून आणल्या होत्या. ह्या सनदा हस्तगत करण्यासाठीं वरील खून झाला असावा असें म्हणतात. ह्या पुरुषाची पतिव्रता पत्नी आजगांवच्या देवाजवळ आली. देवाचा अवसार ( वारें ) तेजांत आल्यावर बाईनें आपली नथ देवासमोर ठेवली व आपल्या पतीचा शोध लावून देण्याची निकराची मागणी केली. श्रीदेव रवळनाथ व श्रीदेव वेताळ ( भूतनाथ ) यांच्या सांगण्याप्रमाणें जमलेल्या लोकांनीं कुऱ्हाडी, कोयते, कुदळी, पहारी व फावडीं घेतलीं. आणि देव आपल्या लवाजम्यासह निघून आजगांवहून सुमारें अकरा मैलांवर असलेल्या मळगांवच्या मेटांत आले. सोवत बाई होतीच. मेटांत आल्यावर नवीन लावलेल्या वेळूच्या व सागाच्या बेटाभोंवतीं देवानें 'नारिंग' फिरविला व ती झाडी तोडून जमीन खणावयास सांगितलें. पांच सहा हात खोलीवर एक तांब्याचें भांडें सापडलें. त्यांत माणसाची हाडें होतीं. देवानें तें भांडें व नथ बाईच्या स्वाधीन केली. पुढें ही हकीकत विजापूर दरबार व बाईचे नातेवाईक ग्वाल्हेरचे शिंदे यांच्यापर्यंत पोहोंचली. त्यामुळें सरदेसाई यांस ठपका आला. या अपमानानें संतप्त होऊन सरदेसायांनीं आजगांव देवस्थानच्या नेमणुका रद्द केल्या. आणि त्या वेळेपासून सरदेसाई यांच्या वंशांत आजगांवच्या देवाचें दर्शन कोणीहि घ्यावयाचें नाहीं असा रिवाज चालत आला आहे. दर्शन घेणारावर देवाचा कोप होईल अशी त्यांची समजूत आहे. ह्या प्रकारानंतर आजगांवच्या देवानें बोलून निर्णय देण्याचें बंद केलें आणि आतां देव खुणांनीं आपलें मनोगत कळवीत असतो.

ही दंतकथा आहे कीं सत्यकथा आहे हें ठरविणारा प्रत्यक्ष पुरावा मिळत नाहीं. आजगांव देवस्थानाला पूर्वीं सरकारी नेमणूक होती ती बंद झाली ही मात्र वस्तुस्थिति आहे खरी. सावंतवाडी संस्थानचे अधिपति आजगांव देवस्थानचें दर्शन घेण्याचें कटाक्षानें टाळतात हेंही प्रत्यक्ष पाहण्यांत आलेलें आहे. आणि कै. श्रीमंत बाबासाहेबांपर्यंतचे अधिपति या मार्गानें जेव्हां आरवली येथील देवस्थानच्या दर्शनास जात, तेव्हां आजगांवच्या देवळाचें शिखर दृष्टीस पडूं नये म्हणून रस्त्याच्या बाजूस पडदे लावीत असें आमचे आजोबा प्रत्यक्ष पाहिलेली गोष्ट म्हणून आम्हास सांगत. या उलट तिरोडकर सावंत भोसले हे या देवाचे भक्त आहेत. यावरून ही

दंतकथा अगदींच निराधार नसावी असें वाटतें. तिरोडकर भोसले घराण्यांत, कृष्णराव ' या पुरुषाचा खून झाल्याचें व तो आजगांवच्या देवानें शोधून काढल्याचें सांगण्यांत येतें.

## कीर्तनांत समई चालली

आजगांवांत सोनार जातीचा एक श्रीमंत गृहस्थ रहात असे. प्रतिवर्षी ललितापंचमीच्या दिवशीं कीर्तन करविण्याचा त्याचा प्रघात असे. मळगांवचे गोपाळबोधबुवा यांची फार ख्याति असल्यानें त्यांना एका वर्षी कीर्तनासाठीं बोलावण्यांत आलें. बुवांनी "अवघे पोटासाठीं सोंग। येथें कैंचा पांडुरंग" हा आपल्या कीर्तनाचा विषय ठेवला होता. त्यांनी कथा सुरू करण्याऐवजीं अध्यात्म सांगण्यास सुरुवात केल्यामुळें कांहीं तरूण मंडळी कीर्तनास कंटाळली व तेथेंच झोंपी गेलीं. गोपाळबोधांचें त्यांच्याकडे लक्षच नव्हतें. त्यांनीं पहांटेस कीर्तन संपवितांना 'हेंचि दान देगा देवा' हा अभंग म्हणून देवीची आरती म्हणण्यास सुरुवात केली. परंतु आरती घेण्यास कोणी उठला नाहीं. तेव्हां देवीच्या पुढें असलेली समई हळुहळू बुवांच्या पुढें आली आणि तेथें थोडावेळ उभी राहून पुन्हा स्वस्थानीं निघून गेली. त्यावेळीं बुवांनी पुढील अभंग म्हटला —

पंढरिरायें समई चालविली ॥ ध्रु ॥
क्रोधी नाम सवत्सरीं। रत्नाकर सिंधू तीरीं।
आश्विन मासीं शुक्रवारीं। उपांग ललिते पुढें ॥ १ ॥
आजग्रामामाझारी। अग्नि शिरवयाचे घरीं।
कथेमाजी चौथे प्रहरीं। कौतुक डोळां दाविलें ॥ २ ॥
टवळे फिरे वरचेवर। गमन करी स्थिरास्थिर।
पाहोनियां नारीनर। म्हणती कौतुक देवाचें ॥ ३ ॥
आकळे न कळे हे कोणा। करितो पंढरीचा राणा।
गोपाळबोध लागे चरणा। विठ्ठल म्हणा स्वानंदे ॥ ४ ॥

हा प्रकार पाहिल्यावर त्या सोनारानें बुवांची क्षमा मागितली. पुढें ईश्वरी कोपानें त्या घराण्याचा निर्वंश झाला. आणि त्या वेळेपासून आजगांवांत कोणतेंही सोनार घराणें कायमचें स्थायिक होऊन राहू शकत नाहीं. (महाराष्ट्र कविचरित्र, भाग १ ला वरून)

# देवस्थान विषयक वादाचा निवाडा

( आजगांव देवस्थानांकडील पहिला मान कोणाचा या वादांत इ. स. १९४२ सालीं सावंतवाडी कोर्टानें दिलेला महत्वाचा निर्णय )

नक्कल **हुकूम** ता. १२-३-४२

विषयः- मौजे आजगांव गांवांतील देवस्थानकडील मतमान.
१ घनश्याम आत्माराम प्रभु मतकरी गांवकर वगैरे रहाणार आजगांव, अर्जदार.

विरूद्ध

मुरारी लक्ष्मण परब अग्रसणकर गांवकर वगैरे राहणार आजगांव, सामनेवाले.

आजगांव देवस्थानकडील मतमानाचीं कामें, गांवकरांमध्यें तंटा असल्यामुळें देवस्थान कायदा सन १९३२ चा नं. २ कलम २६ अन्वयें जाहीरनामा करून बंद ठेवण्यांत आलीं आहेत. त्या बाबतींत संबंधीत पक्षकारांची तक्रार, पक्षकार, व त्यांचे तर्फेचे वकील यांचे मार्फत ऐकून घेतली. कागदपत्र व पुरावा हजर करण्यासाठीं वेळोवेळीं तारखा पुढें ढकलून पक्षकारांना पुरावा हजर करण्यासाठीं भरपूर वेळ देण्यांत आला. आरंभापासूनच तोंडी पुरावा घेतला जाणार नाहीं असें ठरविण्यांत आलें होतें. ता. ५ माहे मे सन १९४१ रोजीं अर्जदार घनश्याम आत्माराम प्रभु मतकरी यांचेतर्फे मि. शांताराम नारायण मांद्रेकर व राजाराम गोविंद सामंत व सामनेवाले परब अग्रसणकरतर्फे मि. आत्माराम शंकर रांगणेकर, मुळीक यांचेतर्फे मि. वसंत नारायण नार्वेकर व देवळाकडील इतर वृत्तिक यांचेतर्फें मि. अनंत लक्ष्मण पाटणकर याप्रमाणें वकील हजर राहून तक्रारी सांगितल्या त्या ऐकून घेतल्या.

मि. पाटणकर यांनी सांगितलेली तक्रार फक्त देवस्थान बंद असल्यापुरती होती. त्यांच्या पक्षकाराचा मतमानाशीं संबंध नाहीं. देवस्थान सरकारनें ताब्यांत घेतलें असल्यामुळें व देवस्थानतर्फें देवस्थानची व्यवस्था पहाण्यासाठीं देवस्थान कमिटी नेमली असल्यामुळें, देवस्थानचीं कामें त्या

कमिटीमार्फत व्हावयाचीं आहेत. मतमानाचा त्या कामाशीं संबंध नाहीं अशी त्यांची तक्रार होती. परंतु सरकारनें देवस्थानें ताब्यांत घेतलीं याचा अर्थ मतमान नाहींसे केलें असें होत नाहीं. व ही गोष्ट देवस्थान कायद्याचें कलम २७ यांत स्पष्ट केलेली आहे. यामुळें मि. पाटणकर यांच्या तक्रारीचा विचार करणें रहात नाहीं. आमच्याकडे दाखल झालेली मूळ तक्रार मतकरी व परब अग्रसणकर यांच्यापुरतीच आहे. मुळीक यांचा या तक्रारीशीं संबंध नाहीं. तथापि मुळीक यांनीं आपण होऊन सदरहू चौकशीच्या कामांत आमच्या परवानगीनें आपलें म्हणणें वकीला मार्फत मांडले. त्यांचे म्हणणे आपल्याला मतकरी देवस्थानचे वृत्तिक म्हणवितात, त्याप्रमाणें आपण वृत्तिक नाहीं.

मुळीक यांना देवस्थानकडून रु. २८-८-२ हतलाख नेमणूक मिळते व ती लक्ष्मण राघ मुळीक यांचे नांवें चालत होती. त्या नेमणुकीबद्दल मुळीक देवस्थानाकडे जीं कामें करितात तीं वृत्तिकपणाच्या सदरांत येत नाहींत असें त्यांचें म्हणणें आहे. या नेमणुकीशिवाय वृत्तिकपणाचीं कामें करण्याबद्दल ७ रु. १० आ. ची नेमणूक आहे. या नेमणुकीसंबंधीचीं कामें मतकरी कोणाकडून तरी करून घेतात. केव्हांतरी हीं कामें कोणा मुळीक यांजकडून करून घेतलीं असतील, याचा अर्थ मुळीक यांनींच तीं कामें करावयाचीं असा होत नाहीं असें मुळीक याचें म्हणणें आहे. मुळीक यांनीं आमच्याकडे ता. २४-७-४१ चा अर्ज दिला आहे. त्यांत सदरहु ७ रु. १० आ. नेमणुकीची आपणास जरुरी नाहीं असें लिहून दिलें आहे. व त्या अर्जांत ७ रु. १० आ. नेमणुकीबद्दल कोणतीं कामें करावयाचीं याचा खुलासा केला आहे व हीं करण्याचीं आमची इच्छा नाहीं व ७ रु. १० आ. नेमणुकीची आपणांस जरूरी नाहीं असें त्यांनीं अर्जानें स्पष्ट कळविलें आहे. कोणत्याहि इसमाच्या इच्छेविरुद्ध देवस्थानचीं कामें करून घेतां येणार नसल्यामुळें मुळीक यांस हीं कामें करण्यास भाग पाडतां येणार नाहीं. सदरहू नेमणुकींतून देवस्थान कमिटीदार यांनीं अन्यरीतीनें तीं कामें करून घेण्याची तजवीज केली पाहिजे.

प्रभु मतकरी व परब अग्रसणकर या दोहोंतील वाद पहिला मानकरी कोण येवढयापुरता आहे. ते दोघेहि मानकरी आहेत याबद्दल संशय नाही. व ही गोष्ट दोघांनाहि कबूल आहे. परब अग्रसणकर यांच्यातर्फें जे पुराव्याचे कागद हजर करण्यांत आले आहेत ते कागद पूर्वी केव्हांहि कोणत्याहि कामांत हजर झालेले नाहींत, ते कागद मूळ कोणत्या तारखेस झाले हेंही समजत नाहीं. त्यांतील पुरुषांचीं नांवें कोणाला अनुलक्षून आहेत हेंहीं निश्चित होत नाहीं व त्यामुळें पुराव्याच्या दृष्टीनें त्याचा कांहीं उपयोग नाहीं. सदरहू पक्षकारातर्फे दुसरें म्हणणें म्हणजे प्रभु मतकरी यांचा मान वेतोबाच्या देवळाकडे आहे व आपला पहिला मान रवळनाथाच्या देवळाकडे आहे असें आहे. परंतु या म्हणण्याला कांहींच आधार नाहीं. मतकरी यांना जे मान भोगतात ते आजगांवातील सर्व देवस्थानकडील आहेत असें मतकरी यांच्या-आलेल्या पुराव्यावरून निर्विवाद सिद्ध होतें. वेतोबाची मूर्ति लांकडाची आहे व रवळनाथाची मूर्ति दगडाची आहे अशी एक तक्रार सांगण्यांत आली. या तक्रारीचा मतमानाकडे काय संबंध आहे हें समजत नाहीं. मतकरी व अग्रसणकर परब या दोन्ही पक्षांकडून कित्येक कबुलायती व पावत्या हजर करण्यांत आल्या. सदरहू पावत्या व कबुलायती रवळनाथ व वेतोबा या दोन्ही देवस्थानसंबंधीं आहेत व त्यांच्यावरून अमुक देवस्थानकडे अमक्याचा मान असें मानण्यास कांहींच आधार मिळत नाहीं. प्रभु मतकरी यांनी आपला पहिला मान असल्याबद्दल जे निरनिराळे कागद हजर केले आहेत ते महत्त्वाचे आहेत. सदरहू कागदांपैकीं नि. १० कडे सन १७४४।४५ चा रोखा आहे. या रोख्यांत इतर मानकऱ्यांचीं नांवें नाहींत. याच्यावरून प्रभु मतकरी हे मुख्य मानकरी असल्यामुळें सर्व मानकऱ्यांतर्फे अमुक मानकरी म्हणून त्यांचें नांव सदरहू रोख्यांत घातलें असावें असें अनुमान निघतें. सदरहू रोख्यांत मुळीक हे वृत्तिक आहेत असा निर्णय झालेला आहे. तथापि सदरहू बाबतीत वर पॅरिग्राफ नं. ३ मध्यें लिहिल्याप्रमाणें मुळकांची इच्छा वृत्तिकपणाचीं कामें यापुढें करावयाचीं नसल्यामुळें त्याबद्दलची तजवीज करावयाची आहे. प्रभु मतकरी यांच्यातर्फे दुसरा महत्त्वाचा कागद

म्हणजे सन १८११।१२ चा रोखा होय. या रोख्यांतील मजकुरावरून निर-निराळया गांवांतील बरेच पंच नेमून त्यांच्यामार्फत संपूर्ण चौकशी करून नंतर ठराव करण्यांत आला आहे, असें स्पष्ट होतें. या रोख्यावरून प्रभु मतकरी यांचा पहिला मान आहे असें स्पष्ट होत आहे. सदरहू रोखा हा वेतोबाच्या देवळापुरताच आहे अशी तक्रार सांगण्यांत आली. परंतु सदरहू रोख्यांत ' दुडू घालणें ' असे शब्द आहेत. ते रवळनाथाच्या देवळाला लागू होतात. सदरहू रोख्यावरून परब अग्रसणकर यांचा दुसरा मान आहे असें सिद्ध होतें. सदरहू रोख्याशिवाय प्रभुमतकरी यांजकडून आणखी महत्वाचा पुरावा हजर करण्यांत आला आहे. त्यांत १९१० च्या एप्रिल महिन्यांत देवस्थानसंबंधीं चाललेल्या एका कामांत देवळाकडील मतकऱ्यांनीं लिहून दिलेला जबाब आहे. तो जबाब असलेलें मूळ काम आम्ही आणून पाहिलें. सदरहु कामावर हल्लींचा मानकरी मुरारी लक्ष्मण परब अग्रसणकर गांवकर याचा बाप लक्ष्मण दादे परब याची सही असून सदरहू जबाबांत " मतकरी गांवकर हे पहिले मानकरी असल्यामुळें देवस्थानकडील एकंदर कृत्यें प्रमुख-पणें त्यांच्या हुकुमानें चालतात व होतात व ते करितात " असें म्हटलें आहे. त्यानंतर अलीकडे सन १९३५ सालांत ता. १३ माहे फेब्रुवारी सन १९३५ चा आजगांव देवस्थानकडील मानकऱ्यांचा जबाब झालेला आहे. त्या जबा-बावर मुरारी लक्ष्मण परब अग्रसणकर यांची सही आहे. शिवाय त्याच जबाबाच्या खालीं देवस्थान सुपरिंटेंडेंट यांनी आपल्या स्वतःच्या अक्षरांत जबाब लिहून घेतला आहे. त्यांत असे शब्द आहेत, " महादेव रघुनाथ प्रभु मतकरी व मुरारी लक्ष्मण परब अग्रसणकर या दोघांनीं नेहमीं हजर राहुन नेमणुकीचीं सर्व कामें करून घ्यावीं. त्यांच्या संमतीनें हुकूम करा-वयाचा तो मतकरी घराण्यांतील महादेव रघुनाथ प्रभु यांनी करावा. " व जबाबाखालीं सुद्धां मुरारी लक्ष्मण परब याची सही आहे. सदरहू कामांतील सदरहू जबाबावरील सह्या आपल्या असल्याचें मुरारी लक्ष्मण परब यांनी कबूल केलें आहे व त्यांच्यातर्फे वकील मि. रांगणेकर यांनींहि सदरहू जबाब मुरारी याजवर बंधनकारक आहे असें कबूल केलें आहे. सदरहू जबाब हल्लींचा म्हणजे सन १९३५ चा असल्यामुळें व त्यांत प्रभु मतकरी

यांचा पहिला मान देवस्थानकडील सर्व मानकऱ्यांनीं कबूल केलां असल्या-मुळें वास्तविक पाहतां पूर्वीचा पुरावा व कागदपत्र पाहण्याचें कांहींच कारण नव्हतें व या कामांत वेळोवेळ पुरावा हजर करण्याविषयीं मुदत मागून निष्कारण कालापव्यय करण्यांत आला आहे असें निरुपायानें म्हणावें लागतें. मि. रांगणेकर वकील यांच्या सांगण्यावरून मुरारी यांचा जबाब झाला तें काम व त्याचा बाप लक्ष्मण दादे परब याचा जबाब झाला तें काम हीं दोन्हीं मूळ कामें आम्ही स्वतः आणून पाहिलीं आहेत. दुसरा एक विचार करण्यासारखा मुद्दा म्हटला म्हणजे सदरहू आजगांव देवस्थानकडे मतकरी मानकऱ्यांतर्फे एक वहिवाटदार म्हणून नेमण्याची वहिवाट आहे व देवस्थान अधिकाऱ्यांकडून वेळोवेळ निरनिराळे वहिवाटदार मंजूर करण्यांत आलेले आहेत. या गोष्टीवरूनही मुख्य मानकरी म्हणून देवस्थानकडील कामें करून घेण्याचा हक्क प्रभु मतकरी यांचा आहे असें दिसून येतें.

प्रभु मतकरी यांच्याकडून पुराव्यासाठी आणखी बरेच कागद हजर करण्यांत आलेले आहेत. परंतु त्यांचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. सदरहू चौकशींत मतमानाबद्दल आम्ही कोणत्याहिप्रकारें नवीन हुकूम करीत नसून, निर्विवाद आज कोणाचा पहिला मान आहे हें ठरवीत आहोंत; व तेंही पक्षकारांच्या कबुलीनेंच ठरवीत आहों, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण वर उल्लेख केलेला ता. १३-२-१९३५ चा जबाब मुरारी लक्ष्मण परब यानें कबूल केला. मतमानाचे बाबतींत कोणत्याहिप्रकारें संशय असता तर त्या बाबतींत कोणत्याहीप्रकारें निर्णय न देतां सदरहू काम आमच्याकडून सावंतवाडी दरबारकडे निर्णयासाठीं पाठविण्यांत आलें असतें. कारण संश-याचे प्रसंगीं मतमानांचे बाबतींत निर्णय देणें हा दरबारचा अधिकार आहे. परंतु सदरहू बाबतींत मतमानासंबंधीं कोणत्याहिप्रकारें संशय रहात नाहीं. पक्षकार मुरारी यानें स्वतः लिहून दिलेल्या जबाबाप्रमाणें वागणें हें त्याचें कर्तव्य आहे व त्या दृष्टीनें विनाकारण त्यानें तक्रार उपस्थित केली हें योग्य केलें नाहीं असें निरुपायानें म्हणावें लागतें.

प्रभु मतकरी हे पहिले मानकरी आहेत ही गोष्ट सिद्ध आहे. तथापि पहिले व जबाबदार मानकरी या नात्यानें हल्लींच्या परिस्थितीकडे लक्ष

देऊन तडजोडीनें व सर्वांच्या संमतीने, त्यांनीं तंटा उत्पन्न न होईल अशा रीतीनें देवस्थानची कामें करून घेतलीं पाहिजेत. मतमान हा कायद्याच्या सक्तीनें देणें हें योग्य नाहीं व तो तसा मिळविणें कोणालाही भूषणावह नाहीं मतमान हा लोकांनीं स्वखुषीनेंच द्यावयाचा असतो. पूर्वीपेक्षां सध्या परिस्थिति व लोकांचे विचार फार बदललेले आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणें देवस्थानचीं कामें करतांना आपल्या मतमाना-पेक्षां देवाविषयीं नम्र भावना बाळगून कामें केलीं पाहिजेत. तरी या सर्व गोष्टींचा विचार करून व तंट्यामुळें देवस्थानें बंद राहण्यापेक्षां किंवा देवळांत कांहीं लोक हजर व बरेच लोक गैरहजर अशा रीतीनें देवपणें होण्यापेक्षां गांवच्या सर्व लोकांनीं एकोप्यानें देवपणाचीं कामें केलीं तरच परमेश्वराला संतोष होईल ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी.

सदरहू देवस्थानचे कमिटीवर यांनीं सर्व मानकऱ्यांची सभा बोलावून एकवाक्यतेनें कशारीतीनें देवस्थानांचीं कामें सुरू करतां येतील याचा विचार करून इकडे कळवावें म्हणजे देवपणाची बंदी उठविण्याबद्दल हुकूम करण्यांत येईल.

तारीख २ माहे फेब्रुवारी १९४२.

सहीं- **डी. एम. पंडोल**
रेकॉर्ड कीपर, सांवंतवाडी

सही- **जी. एस. बाकरे**
नायबदिवाण, सावंतवाडी.

---

(ऐतिहासिक सनदा आणि निवाडे)

# गांवकी व मान-पान

( १७४४।४५ मध्यें आजगांवचे फट मुळीक, वाजे मुळीक व राग मुळीक यांनीं विरतीकपणाऐवजीं गांवकींत मिरास मिळावी म्हणून फिर्याद केली होती. त्याचा निवाडा करणारा रोखा पुढें दिला आहे. याची नक्कल हु. नं. २६१५ ता. ३१।१।९९ चे कामीं सावंतवाडी संस्थाननें

घेतली होती. इ. स. १९४२ मध्ये सावंतवाडी कोर्टानें आपल्या निकाल पत्रांत त्याचा आधार घेतला आहे. —लेखक)

## रोखा १७४४।४५

रोखा गांवकरांनी मौजे आजगांव सुरू सन खमस आर बेन मया अलफ फट मुळीक व राग मुळीक व बाजे मुळीक मौजे मजकूर हे हुजूर फिर्यादि जहालेले मौजें मजकुरी विर्तिकपणाचा भोगवटा पुरातनप्रमाणें चालतो. गांवकीची मिरास आपणांस यावी म्हणून त्यावरून मतकरी गाऊंकर व मुळीक यांचे कतबे घेऊन मनसुभी राम सावंत कुणकेरकर व अर्जुन मसी व नरहर बाबाजी आरांवदेकर व देसाई नाडकर्णी तपे पेडणें व वायाजी प्रभु वालावलकर व गांऊकर नेरूर व कानोजी किटनाईक धामापूर कर व गांऊकर परवळें व वाजे प्रभु पाटकर व राम प्रभु केळूसकर व गणबा दळवी आरूलीकर व शीवशेणवी नाबर व गांऊकर शिरोडें व गणू किटनाईक आरांवदेकर व मुकुंद कालनाईक गावकर व सीवसांतु प्रभु गांवकर वेंगुर्ले व कानकामत वेंगुर्लेंकर व किलधुरी माणगांवकर असे समस्ताचे हुजूर आणून त्याचे मनसुभींबद्दल आज्ञा केली. त्यावरून त्यांनीं मुळीक याचा करीना व भोगवटा मनास आणितां ते विर्तिक ऐसे जाहले. मुळीकास गांवकीस संबंध नाहीं ऐसे जाहले त्यावरून कतबेची गुन्हागारी मुळीकाकडे घेतली. सालाबाद ज्याचें मान-पान चाललेप्रमाणें चालू देणें. पेसनीचे कागद या वेवाहाराचे मुळीकाकडे असतील ते बातील केले.

अ. छ ११ रजसु (निशाणी) बाजरसुद्र

नि ।। ३६ भाग १

## रोखा १८११।१२

रोखा गांवकरान मौजे आजगांव तर्फ मजकुर सुरू सन इसने आशेर मय्य तेन अलफ मतकरी गांवकर मौजे मजकूर यांचे घरीं पुरातनप्रमाणें श्रीदेव दसरेचे नवमीचे रात्रीस पावणेरास गेले. त्याचे नैवेद्यास मुळीक यांनी अटक केला. त्यावरून मतकरी यांनीं हुजूर फिर्याद केली.

तेव्हां रघुगण मुळीक व बाजे मुळीक यास हुजूर आणून हरदुजणाचा व्यवहार समक्ष समजून घेऊन मनसुभीचा निवाडा करणें विषयीं आज्ञा केली. नांव निशी–

१ राजश्री महादेवराव शिवराव सबनीस
१ ,, भिकाजी जगन्नाथ चिटणीस
१ ,, लक्ष्मण कृष्ण नेरूरकर
१ ,, भास्कर रामचंद्र नाडकर्णी ( तपें पेडणें )
१ ,, बाळकृष्ण गोविंद पेडणेकर
१ ,, नारायण कृष्ण शेट ( सातर्डें )
१ ,, लक्ष्मण रघे प्रभू मतकरी ( सातर्डें )
१ ,, लक्ष्मण गोविंद प्रभू ( सातर्डें )
१ ,, रामचंद्रराव खानविलकर
१ ,, दौलतराव मोहिते
१ ,, यशवंतराव विचारे
१ ,, महादाजी रघुनाथ काळे
१ ,, सखाराम अनंत फडके
१ ,, तातो काळसाल परतुलकर
१ ,, राम प्रभु तेंडोलकर
१ ,, गोविंद विठे प्रभु, बंदर वेंगुर्लें
१ ,, शाम ठाकूर म्हापणकर
१ ,, गोपाळ प्रभु केळुसकर

१९

एकूण एकूणीस असामीचें मत मनसुभी समक्ष मनास आणितां मतकरी यांनी सांगितलें जें प्रथम सप्तमीस व अष्टमीस दोन रोज जागरास मानाप्रमाणें दुडू घालतों व नवमीचे रात्रीस श्रीदेव अवसारी आलेवर आपलें घरीं पावणेरास जातात. तेथून सीमा उलंघनास देव गेलेवर तेथें आपटेची पूजा आपण करितों. त्याउपर अग्रसणकर प्रा। मराठा व सेणवी व

राळकर यांचेकडे तीन रोज देव जातात त्याउपर पांचवे रोजीं याप्रमाणें आले ते अनंत भट भेहेरे महाजन यांचे घरीं जातात व कार्तिक द्वादशी रोजीं तुळशीची पुजा व अन्नशांत परभेची व काष्टचे स्थापनेची व देवळाची गणेशपुजा व होळीचा नारळ आपण ठेवितो व देव सोडावयास व बसावयास सांगावें तें आपण सांगतों व गांवकी आपण करितों ऐसें सांगितलें यावरून मुळीक यास पुशिलें त्यांनी सांगितलें जें मतकरी व आपण एकीकडे वसून गणेशपुजा करितों व देव पावणेरास आपल्या कुळाकडे जातात व गांवकीचा वहिवाट आपले गुजारतीनें होते म्हणून सांगितलें त्यावरून त्यास दाखला काय म्हणून पुशिलेवर मुळीक यांनीं नांवनिशी लिहून दिली. त्यावरून वे।। येस जोशी व फटंभट जोशी पैकीं अनंतभट भेहेरे व बाळाजी पुंडलीक कुळकर्णी व हरी विठजी राऊळ गुरव व रामशेट खांबया व गोपाळ सांवळ व देऊजो सुतार व नानगो म्हार मौजे मजकूर यांस हु।। आणून पुशिलें त्यांस वे।। येस जोशी यांनीं सांगितलें व लिहून दिले जे गणेशपूजा मतकरी यांनी केली त्यास आम्ही सांगितली. मुळीक यांनी केली नाहीं. देव पावणेरास पांचा मानानें जातात. प्रथम मतकरी याचे घरीं, दुसरे दिवसीं अग्रसणकर प्रभु मराठा याचे घरीं, तिसरे दिनीं शेणवी याचे घरीं व चवथे रोजीं राळकर याचे घरीं, पांचवे रोज भेहेरे भट याचे घरीं, येणें प्रमाणें पांचा मानास देव जातात. व आपटेची पूजा व कार्तिकी द्वादशी रोज तुळसीची पूजा व गांवकी मतकरी करतात. याप्रमाणें सांगितलें व लिहून दिलें. यानंतर वे।। फटंभट जोशी व आनंतभट भेहेरे यास पुशिलें त्यांनी सांगितलें जें पांचामानी देव जातात व गणेशपूजा गांवकी मतकरी करतात. त्यानंतर हरी विठजी राऊळ गुरव यांस पुशिलें. त्यांनी सांगितलें व लिहून दिलें जे सदरहू प्रमाणें पांचामानानें देव जातात व आपटेची पूजा व कार्तिक द्वादशी रोज तुळशीचो व आन्नशांत परबेची व काष्टाचे स्थापनेची व देवळाची गणेशपूजा व होळीस नारळ व देव सोडावयास व बसावयास सांगावें व डालपास नारळ देवपणाचे ठेवावयास सांगावें तें मतकरी सांगतात व गांवकी मतकरी करतात. या प्रमाणें लिहून दिलें व भिस प्रभु अग्रसणकर प्रभु मराठा व

चिटको मुकुंद व बाळाजी पुंडलीक व रामप्रभु राळकर व रामशेठ खांवया व देवजो सुतार व गोपाळ सांवळ व नानगो म्हार मौजे मजकुर यांजकडे दाखला व भोगवटा मनास आणितां त्यांनी सांगितलें जे देवपणास पांचामानानें जातात व गणेशपूजा व होळीचा नारळ व देव सोडावयास व देव बसावयास सांगावें ते मतकरी सांगतात व गांवकी मतकरी करितात याप्रमाणें सांगितलें त्यावरून मतकरी याजकडे पुशिलें. मुळीक याजकडे काय चालतें ? त्यांनीं सांगितलें जे पूर्वीं सन खमस आवेन मया अलफचे सालीं छ ११ रजेवी निवाडा होऊन सनद सादर आहे त्याप्रमाणें मुळीक याजकडे विर्तिकी चालती याप्रमाणें सांगितलें व निवाडेची सनद बजिन्नस हु॥ दाखविली त्यावरून दाखले भोगवटे करून व गांवचे दाखले वरून मुळकांस गांवकीस व मानास व गणेशपूजेस संबंध नाहीं विर्तिक ऐसे निवाडा जाहला त्यावरून ही सनद सादर केली आहे. पुरातन चालत आलेप्रमाणें गांवकी व श्रींदेव पावणेरास व गणेशपुजा व होळीस नारळ व देव सोडावयास व बसावयास मतकरी यांणी सांगत आलेप्रमाणें चालू देणें सनदीची तालीक घेऊन ही सनद मतकरी यांजकडे आसों देणें छ २४ माहे सवाल

(निशाणी) वाजरसुद्र

— याची नक्कल हु. नं. २६१५ ता. ३१।१।९९ चे कामीं घेतली. ता. ५।७।९९ रुजू पाहिली ता. १३।३।२८

( सही ) गोपाळ रामकृष्ण कारकून

खरी नक्कल ( सही ) अंतोन जॉन कमाविसदार

सदरहू नकलेचे अदमासें शब्द सहाशें याची दर शेंकडा ०८९ प्रमाणें रुजवात फी ०४०६ तालुका नमुना नं. ५ भाग १ याजवर जमा करून घेऊन नक्कल दिली ता. १३।३।२८.

( सही ) रामचंद्र जयराम कारकून

श्री

# रोखा १८३२।३३ निशानी ३७ भाग २

नि ।। १४

रोखा गांवकरान मौजे आजगांव तर्फ मजकूर सुरू सन सम्मस सकसेन मयातेन अलफ मतकरी गांवकर मौजे मजकूर यांजकडे गांवकी व मतमान पुरातनपासून, चालत आहे. असें असतां हल्लीं रघुगण मुळीक व राघो न्हान मूळीक व सावो विठ मुळीक व राम सोम मुळीक मौजे मजकूर याणे दसरेचे देवपणास व मतमानास बेवेवहार केला त्यामुळें सालमजकुरीं छ २८ जमा दिलावलीस सनद सादर होऊन गांवकी व मतमान अनामत करून मतकरी गांवकर यांस व मुळीक यांस हुजूर आणून, मनसुबी मनास आणितां सदरहुविशीं हरतुजपणाचे व्यवहाराचे निवाडे पेसनी सन खलास आबेन मया आलफचे सालीं छ ११ रजबी व सनईसजे आशेर मया तेन व अलफचे सालीं छ २४ सवाली निवाडा होऊन सनदा सादर झाल्या त्यांत मुळीक हे वितींक असा निवाडा जाहल्याच्या सनदा दोन्ही आणून हुजूर दाखविल्या त्यावरून ही सनद सादर केली आहे. पुरातनप्रमाणें गांवकी मतमान मतकरी गांवकर यांजकडे चालत आलेप्रमाणें चालू देणें मुळीक यानें सालमजकुरीं आमानताची सनद नेली ती रद्द केली आहे. सालाबाद ज्याचे मानपान चालत आले त्याप्रमाणें चालू देणें. सनदेची तालीक घेऊन अस्सल सनद याजकडेस भोगवटेस असों देणें छ २ माहे सवाल

बाजरसुद्र

याची नक्कल हुजूर नं. २६१५ ता. ३१।१।९९ चे कामी घेतली ता. ५।७।९९

(सही) चिमणाजी बाबुराव ( कमाविसदार )

रुजू पाहिलीं ता. १३।३।२८

(सही) गोपाळ रामकृष्ण कारकून

खरी नक्कल

(सही) अंतोन जॉन (कमाविसदार)

सदरहू नकलेचे शब्द अदमासी १२५ याची दरशेंकडा ८८९ प्रमाणें फी एक आणा सहा पै ८१८६ ता. नंबर ५ भाग १ याजवर जमा करून घेतले.

( सही ) रामचंद्र जयराम कारकून.

श्री

**रोखा १८३२।३३** नि॥ ३८ भाग १३
२०।८।४०

नि॥ १५

गांवकरान मौज आजगांव तर्फ मजकूर यास विठ्ठलराव माधव सुरू सन सलास सलासीन मैया तेन अलफ तुम्ही बखर सरकारी पाठविली त्यांत मुळीक हा श्रीची पूजा टाकून घरीं गेला आणि पूजा राहिली ती गुरव याजकडून करविली म्हणून लिहिलेत त्यास तें न येत असलेस गुरव याजकडून श्रीची पूजा करवणे जाणिजे छ ५ माहे सवानरडकर

याची नक्कल हू॥ नं. २६१५ ता. ३१।१।९९ चे कामीं घेतली ता. ५।७।९९

(सही) **चिमणाजी बाबुराव** (कमाविसदार)

रुज पाहिली ता. १३।३।२८

(सही) गोपाळ रामकृष्ण कारकून

खरी नक्कल

(सही) **अंतोन जॉन** (कमाविसदार.)

सदरहू नकलेचे अदमासें शब्द ४० याची रुजवात फी शेंकडा ८८९ पै प्रमाणें नऊ पै तालुका नं. ५ भाग १ याजवर जमा करून घेऊन नक्कल दिली ता. १३।३।२८

(सही) **रामचंद्र जयराम कारकून**

# आजगांवांत दरसाल होणारीं देवकृत्यें

१) चैत्र शुद्ध प्रतिपदा (**पाडवा**)- ह्या दिवशीं सकाळीं प्रभु मतकरी स्नान करून देवळांत प्रवेश करतात व नगारजीस नगारा वाजविण्याचा हुकूम करतात. नगाऱ्याचा आवाज ऐकल्यावर जोशी स्नान करून देवळांत येतो व पंचांग वाचण्यास प्रारंभ करतो. नंतर श्रीराम स्थापनेचा कार्यक्रम पार पडतो. ह्या दिवसापासून (चै. शु।। १) पौर्णिमेपर्यंत रोज जागर सुरू असतात. जागर रात्रौ ९ ते ११ वाजेपर्यंत चालतात. ह्यावेळीं पुराणिक हरिदास, मृदंगी, ताशेकर, वाजंत्री वगैरे हजर असतात. तसेंच प्रत्येक देवळाकडे देवाचा पुजारी व अितर पंधरसकर हजर राहून आपापलीं कामें तत्परतेनें करीत असतात.

२ ) चैत्र शुद्ध नवमी (**रामनवमी**) - दिवसा बारा वाजतां श्रीदेव वेतोबाच्या देवलयांत श्रीरामजन्माचा मोठा उत्सव होतो. श्रीरामजन्मानंतर पालखी वाद्यगजरासह पांचहि देवळांकडे नेतात. तेथें प्रत्येक देवास प्रभु मतकरी बाळ नेऊन भेटवितो. पालखी फिरून आल्यानंतर जमलेल्या सर्व मंडळीस प्रभु मतकरी बाळाचें दर्शन करवितो. नंतर गाऱ्हाणें होऊन प्रसाद वांटला जातो.

३ ) चैत्र शु।। पौर्णिमा (**श्रीहनुमान जयंति**) - चैत्र शु।। १ पासून सुरू झालेला जागर या दिवशीं पुरा होतो. रात्रौ जागर पुरा झाल्यावर श्रीमारुती जन्मोत्सवाला प्रारंभ होतो. श्रीदेव वेतोबाच्या पुजाऱ्याकडून पांचहि देवळांकडे वाद्यगजरासहीत पंचारति फिरविली जाते.

४ ) वैशाख शु।। ३ (**अक्षयतृतिया**) - श्रीदेव भार्गवरामाच्या देवळांत, नेमणुकदार पुजारी, नाटेकर भट यांचेकडून वैशाख शु।। १ पासून हा उत्सव सुरू केला जातो व अक्षयतृतीयेस श्रीदेव वेताळ याचे देवळांतून प्रभु मतकरी पालखी वगैरे सरंजाम अिस्ताद ताबीनदारकडून घेऊन, नाटेकर यांजकडे देतात व उत्साह साजरा करून घेतात.

५ ) आषाढ शु।। १० मी या दिवशीं संध्याकाळीं देव कौलास होतो. म्हणजे श्रीदेवांचीं तरंगे, कापडें व जोडे सोडून ठेवतात. यालाच देव राजमंदिरास जाणें असें म्हणतात. कापडें सोडण्याचें काम, प्रभु मतकरी यांच्या सांगण्याप्रमाणें मडवळ ( वितिक ) करतात. नंतर तीं कापडें ( लुगडीं ) व जोडे मोजून धुण्यासाठीं मडवळाकडे दिली जातात. तिसऱ्या दिवशीं म्हणजे त्रयोदशीचे दिवशीं रवळनाथाच्या देवळाकडे रात्रीं खेतरपुजा केली जाते. हें काम मडवळ करतो.

६ ) श्रावण शु।। १ (**भजन सप्ताह**)– ह्या दिवशीं भजन सप्ताह सुरू होऊन सात दिवस रात्रंदिवस चालतो. हा सप्ताह श्रीदेव वेतोबाच्या देवलयांत होतो. प्रभु मतकरी, गांवांतील भजक लोकांच्या सहाय्यानें तो करून घेतात. सप्तमीचे दुसऱ्या दिवशीं समाराधना होते.

७ ) श्रावणी सोमवार– प्रत्येक श्रावण सोमवारीं रात्रीं, पांचहि देवळांत मतमानाप्रमाणें जागर होतात.

८ ) श्रावणी समाराधना– ही समाराधना सर्व देवळांतून एकाच दिवशीं घातली जाते. श्रीदेव वेताळाचे देवळांत सुमारें नैवेद्यांचीं ५६ पानें वाढावीं लागतात.

९ ) भाद्रपद– भाद्रपद महिन्यांत भात पिकल्यावर सुमुहूर्त पाहून **नवें** केलें जातें. आदल्या दिवशीं प्रभु मतकरी, गांवच्या सर्व लोकांस बोलावणें करतात. हें नवें प्रभु मतकरी यांचे ठिकाणांत आजगांव–शिरोडा सीमेवर कापलें जातें. नंतर हें नवें वाजतगाजत सर्व देवळांतून पोंचविलें जातें. व प्रत्येक देवळांचा पुजारी तें आपापल्या देवळांत बांधतो. नंतर जमलेल्या मंडळीस नवें वाटण्यांत येतें. नवें जेव्हां देवळात आणतात तेव्हां, तें ठेवण्यासाठीं मडवळ धुतलेली धोतराची घडी घालतो. नव्याबरोबर भातहि वाटलें जातें. हें काम प्रभु मतकरी करून घेतो.

१० ) भाद्रपद शु।। ५ मी (**गणपति विसर्जन**)– ह्या दिवशीं संध्याकाळीं श्रीदेव वेताळाचे देवळांत, पंधरसकर नोकर रांगोळी घालून ठेवतो. तेथें कुळाच्या देवळांत मिरवत आणलेले गणपति उतरून ठेवण्यांत

येतात. नंतर प्रभु मतकऱ्यांच्या सांगण्यानें पुजारी घंटा वाजवून धुपारत करितो नंतर गणपति विसर्जन होतें.

११ ) आश्विन शु।। ७ मी (**तोरण जागर**)— सकाळीं देवस्थानचे सर्व नोकर व लोक आंघोळ करून श्रीदेव रवळनाथाच्या देवळांत जमतात. नंतर प्रभु मतकऱ्यांच्या सांगण्यावरून, रवळनाथाच्या भाटल्यांतील आंब्याचे टाळ आणले जातात व सर्व देवळांतून तोरणें बांधण्यांत येतात. रात्रौ जागर होतो. प्रभु मतकरी आपल्या पहिल्या मानाचा दुडू घालतो व नंतर इतर मानकरी क्रमाप्रमाणें दुडू घालण्याचा कार्यक्रम पार पाडतात.

१२ ) आश्विन शु।। ८ मी (**भाराचा जागर**) ह्या दिवशीं रात्रीं भाराचा जागर सुरू होतो. प्रभु मतकरी व अितर मानकरी आपपल्या मानाप्रमाणें दुडू घालण्याचा कार्यक्रम साजरा करतात व नंतर पांचहि वृत्तिक नोकर हातांत पेटत्या मशाली घेऊन ढोलाच्या तालावर नाचतात.

१३ ) आश्विन शु।। ९ मीं (**दसरा**)— ह्या दिवशीं श्रीदेव रवळनाथाच्या देवळाकडे यात्रा भरते. लोकांची देवदर्शनासाठीं गर्दी जमते. रात्रौ पहिल्यानें जागर पुरा होतो. नंतर सावंतवाडी संस्थानांतील सर्व देवस्थानांतील सर्व देवांचीं नांवें घेऊन प्रत्येक देवास विडामान द्यावा लागतो. हें काम पुजारी गुरव करतो. नंतर देव राजमंदिरास जातेवेळीं मडवळ याजकडे धुण्यास दिलेलीं कापडें व जोडे मडवळास आणण्यास सांगून ते प्रभु मतकरी मोजून घेतात. नंतर त्यांत आणखीं नवे कपडे घालून व पुन्हा मोजून तरंगें नेसविण्यास मडवळास सांगतात. नंतर सर्व मानकरी श्रीदेव वेतोबाच्या देवळांत जाऊन बसतात. मडवळ व सुतार तरंगें नेसवितात. हें काम झाल्यावर मडवळ वरच्या देवळांत येऊन तरंगें सजविल्याचें सांगतात. नंतर सर्व मंडळी श्रीरवळनाथाच्या देवळांत येऊन, देवाच्या पुढचांत पाटा ठेवून त्यावर तिन्हीं तरंगें बांधतात. उत्साह मूर्ती व पावा ( पादुका ) गुरव पाटयावर ठेवतो व पूजा करतो. नंतर वर्षभर हजर रहाणारे, अव्यंग, शुचिर्भूत असे

खांबये निवडून तरंगें धरून बसविले जातात. नंतर गाऱ्हाणें करून त्यावर तांदूळ मारले जातात. बऱ्याच वेळानें त्यांचे अंगावर देव संचार झाल्यावर ते एकदम उठतात. नंतर प्रभु मतकरी गुरव यास तरंगें सोडण्याची आज्ञा करतो. तरंगें सोडल्यावर देव बाहेर येतात. पावणाईचे तरंग सुतार घेतो. पाटा वगैरे सामान मडवळ घेतात. समई पंधरसकर नोकर घेतो. देवळावाहेर रस्त्यावर पाटा ठेवून त्यावर तरंग, व मूर्ती ठेवून नंतर कातर म्हणून होतें. दोन तरवारी बांधून, तिकटें धरून त्यावर सर्व वृत्तिक नोकर एकावर एक असे उपडे रहातात. ( प्रथम महार, त्यावर मडवळ, सुतार, श्रीदेव रवळनाथाचा पंधरसकर नोकर ) ह्या सर्वांच्या पाठीवर गुरव एका हातांत खंजीर व दुसऱ्या हातांत तांदूळ घेऊन चढतो व उभा राहून पाट्यावरील उत्साह-मूर्तीवर तांदूळ फेंकतो व नंतर खालीं उतरतो. श्रीआदित्यनाथाच्या देवळांत देवी पावणाईचें तरंग नेलें जातें. तेथें गुरव पूजा करून पावणाईस फुलें माळतो. नंतर पावणाईला वाजतगाजत घेऊन येतात. श्रीदेव वेतोबाचे देवळाकडील पिंपळावर शिवलग्न होतें. नंतर सर्व मंडळी श्रीदेव वेतोबाच्या देवळांत जाते. तेथें सर्वांना कौल होतो. नंतर प्रभु मतकरी देवास पावणेरास नेण्यासाठीं पहिल्या मानाचा नारळ ठेवतो. नंतर देव प्रभु मतकरी यास लोकांना बोलवावयास सांगतो. सर्व आल्यावर श्रीदेवाची मूर्ति पालखींत ठेवून सरंजामासह देव प्रभु मतकरी यांचेकडे पावणेरास येतात. त्यावेळीं प्रभु मतकरी सर्व नोकरांस अडेसरी म्हणून भात घालतो. हरिदास, पुराणिक, जोशी भट वगैरे लोकांस तांदुळांचा शिधा दिला जातो. नंतर देवांस महाप्रसाद होऊन लोकांना जेवण घातलें जातें. संध्याकाळीं पुन्हां देव काढून, नारळ ठेवून प्रभु मतकरी प्रथम कौल घेतो व नंतर अितरांना कौल मिळतो. नंतर गाऱ्हाणें झाल्यावर देव सरंजामासह परस्पर आपट्याच्या झाडाकडे सीमोल्लंघनास जातो. तेथें गणपति पूजन होऊन आपट्याची पूजा होते. नंतर सोनें ( आपट्याची पानें ) लुटण्यांत येतें. आणि देव श्रीदेव वेताळाचे देवळांत येऊन सर्व देवांस सोनें वहातो. पुन्हा कौल होण्याचा कार्यक्रम असतो. नंतर अितर मानकरी आपापल्या क्रमाप्रमाणें देवास नारळ ठेवून पावणेरास येण्यास

अनुक्रम नालय

आमंत्रण करतात. पुढें चार दिवस मानाप्रमाणें पावणेर होतात. पैकीं बेहेरे, महाजन यांच्या पावणेरास भाताची अडेसरी वगैरे नसते. फक्त देवांस नैवेद्य होतो. चतुर्दशी दिवशीं देव, श्रीदेव वेतोबाच्या देवळांत येऊन आपल्या नेहमींच्या जागीं पाटचावर बसतात.

१४) आश्विन शु ।। १५ (**कार्तिक-स्नान**)-प्रभु मतकरी, पंधरसकर नोकरांकडे सर्व देवालयांतून दीपोत्सवासाठीं तेल नेऊन देतात. पौर्णिमेच्या दिवशीं सकाळीं श्रीदेव वेताळाचे देवळांत, गणेशपूजन झाल्यावर पुराण वाचण्यास प्रारंभ होतो. या दिवसापासून रोज पुराण जागर सुरू होतो.

१५) कार्तिक शु ।। १० मी (**दशावतारारंभ**) - श्रीदेव वेताळाचे देवळांत व श्रीदेवी भूमिकेच्या देवळांत प्रभु मतकरी मोठ्या समाराधना घालतात. रात्रीं आरती होऊन पालखी काढतात व जागर करतात. नंतर दशावतारी गणपतीचें सोंग देवास दाखवितात. नंतर देवास नारळ ठेवतात. गाऱ्हाणें केल्यावर प्रभु मतकरी यानें दिलेला नारळ दशावतारी पेटाऱ्यांत ठेवून आपल्या बाहेर गांवच्या नेमणुकीच्या जत्रा करण्यास जातात.

१६) कार्तिक शु ।। १४ (**वैकुंठचतुर्दशी**) - या दिवशीं प्रभु मतकरी सर्व देवालयांकडे तुलसी-विवाह करतो. श्रीदेव सर्वेश्वराचे देवळाकडे आरंभ होऊन शेवटीं श्रीदेव नारायणाकडील तुलसीविवाह झाल्यावर देवळांत पुराण कीर्तन होते व पालखी निघते. नंतर प्रभु मतकरी याजकडून दह्याचें मडकें फोडलें जातें. आणि गाऱ्हाणें होऊन उत्साह पुरा होतो. (येथील सर्व कामें जोशी करतो. रुपडें व पोषाख त्याच्याकडेच असतो.)

१७) कार्तिक शु ।। १५ मा (**त्रिपुरी जत्रा**)- या दिवशीं सकाळीं श्रीदेव सर्वेश्वराच्या दीपमालेच्या बैठकीवर कार्तिक स्नानाची समाप्ति होते. आणि तेथें मोठी समराधना होते. हें सर्व प्रभु मतकरी आपल्या पदरखर्चानें करतात. दुपारीं दोन वाजतां देव सोडतात. देव, तरंगें, मूर्ति, व खालीं श्रीदेव रवळनाथाचे देवळांत बसविले जातात. नंतर श्रीदेव वेताळाच्या जत्रेचा ढोल

व नगारा वाजतो. रात्रीं मोठी त्रिपुरी जत्रा भरते. रात्रीं ९ वाजतां तेल वाटण्यांत येतें. पहिल्यानें सर्व देवळांकडील टीपर पाजळतात व दीपमाळा पेटवितात. हें काम पंधरसकर नोकरांचें असतें. जागर होतो. दोन्ही पालख्या दोन्ही पंचारतीसह सर्व देवळांसभोंवतीं फिरतात. पालख्या फिरून आल्यावर दशावतारी यांस, दशावतारास आरंभ करण्याची आज्ञा होते. खेळ संपल्यावर सकाळीं वेताळाचा पुजारी कांकड आरती घेऊन पांचहि देवळांस फिरून आणल्यावर दह्याचें गाडगें फोडतात. नंतर श्रीदेवाकडे आलेला प्रसाद, मतकरी याच्या हुकुमानें वहिवाटीप्रमाणें मुळकांकडून वांटला जातो. नंतर गाऱ्हाणें होऊन जत्रेचा उत्साह संपतो.

१८) कार्तिक वद्य प्रतिपदा- (**श्रीदेव रवळनाथ जत्रा**)- श्रीदेव रवळनाथाची जत्राहि वरीलप्रमाणेंच होते. तेल वाटलें जातें. जागर होतो. पालखी व आरत फिरते. नंतर दशावतारास आरंभ होतो. खेळ संपतांच सकाळीं आरती होऊन गाऱ्हाणें होतें. श्रीदेवाकडे आलेला प्रसाद वहिवाटी-प्रमाणें पुजारी गुरव वाटतो. दुपारीं दोन वाजतां देव सोडून पुन्हा वरच्या वेतोबाच्या देवळांत पाट्यावर बसविले जातात.

१९) कार्तिक वद्य ॥ ३० (**तेलपड**)— या दिवशीं रात्रीं तेलपडीचा उत्सव असतो. म्हणजे सर्व देवांचें अंगास लावण्यासाठीं व दिवे लावण्यासाठीं तेल वाटण्यांत येतें. तें देवस्थानचे नोकर घेऊन जातात. आणि मतकरी यांच्या सांगण्याप्रमाणें गुरव तेल वांटीत असतो.

२०) मार्गशीर्ष शु ॥ ३ या (**तयेची जत्रा**)- या दिवशीं श्रीदेव वेताळाचे देवळांत मोठी जत्रा भरते. रात्रीं तेल वाटणें, जागर करणें, पंचारति फिरविणें, दशावतारांचे खेळ व गाऱ्हाणें करणें वगैरे कार्यक्रम वरीलप्रमाणेंच असतो. श्रीदेवाचा प्रसाद प्रभु मतकरी याच्या आज्ञेप्रमाणें पुजारी मुळीक वांटतो. नंतर दशावतारी यांस पैसे देण्यांत येऊन प्रभु मतकरी पावती घेतो.

२१) देवस्वारी (**चतुःसीमा फिरणें**)- मार्गशीर्ष महिन्यांत सुमुहूर्त पाहून देवस्वारी होते. प्रभु मतकरीं यांच्या सांगण्याप्रमाणें श्रीदेव वेताळाच्या देवळांतील तुळशीच्या पेढीवर सर्व देवांना डाळ व पांच नारळ ठेवले जातात. नंतर देव सोडून, मूर्ती पालखीसह सरंजाम घेऊन, लव्याजम्यानिशीं बाहेर पडतात. पहिल्यानें श्रीदेव रामेश्वरास भेटून श्रीदेव नारायणाचे देवळांत एक रात्र रहातात. तेथें महाप्रसाद वगैरे जोशी करतो. दुसऱ्या दिवशीं देव, वसवाचें तळें येथें काळोबास भेटून, तेथून वांके सांवरीच्या बाहेरच्या सभामंडपांत रहातात. तिसऱ्या दिवशीं देव मळेवाड येथें निथकारी यास भेटतात. तेथून घोडेमुखास भेटण्यास डोंगरावर जातात. घोडेमुखास एक बकऱ्याचा मान देऊन तेथून खालीं कोंडुरा येथें आरोस सीमेवर येतात. तेथें आपल्याबरोबर घाडवस या देवास घेऊन कोंडुरें येथें मुक्काम करतात. दुसऱ्या दिवशीं सकाळीं देव निघून तिरोडा गांवीं येतात. तेथें माऊलीस भेटून नंतर श्रीदेव वेताळाचे देवळांत परत येतात. चवथे दिवशीं दुपारीं पुन्हा बाहेर पडून प्रभु मतकरी यांच्या कुळांच्या देवळांत कुलस्वामीस भेटून तेथून शिरोड्यास खासबागेंत देवास भेटतात. शिरोड्याच्या माऊलीस भेटून तेथून सर्व मंडळीसह देव रेडीपाटण सिद्धास भेटून त्याच्या चाळ्यास मान देऊन, नंतर रेडीच्या माउली देवीस भेटून रात्रौ आजगांवीं श्रीवेताळाचे देवळांत पुन्हा येतात. नंतर तीन दिवस सर्व प्रकारचें देवपण बंद असते. चवथें दिवशीं चाळा बाहेर घालून व नारळ विस्तावून देवस्वारीचे काम पूर्ण होतें. नंतर प्रचीतीसाठीं सरकार परवानगीनें शिकार करून सावज आणतात आणि मग देवपण पुरें होतें.

२२) फाल्गुन शु॥ १५ मा (**शिमगा**)- धाकोरें वाड्यांतून पोफळीची होळी तोडून आणून, श्रीवेताळाचे देवळाजवळ, प्रभु मतकरी यांच्या ठिकाणांत घातली जाते. चवथ्या अगर पांचव्या दिवशीं सर्व देवांना हळदवणी घालतात. नंतर शिमग्याच्या रोमटास व खेळास सुरवात होते. पहिल्यानें प्रभु मतकरी घुमटावर हात मारून सुरवात करून देतो. रोमटासाठीं दोन कलावंतीणी आणाव्या लागतात. नंतर कलावंतीणींसह सर्व देवांस

व वहिवाटीप्रमाणें गांवांत रोमट फिरवून आणले जातें. रोज देवळांत मांड वाजवून रोमट नंतर बाहेर पडतें. ठरल्या दिवशीं धुळवड होते. त्यादिवशीं रात्रीं होळीस नारळ ठेवून गाऱ्हाणें होते आणि नंतर धूळ मारून शिमग्याचा उत्साह पुरा होतो.

२३) **नवससायास** (आंगवणी)- गांवांतील अगर बाहेरील देवांचे भजक लोक आपले नवस फेडण्यास गांवांत आल्यास त्यांची सर्व व्यवस्था प्रभु मतकरी करतो. प्रभु मतकरी गाऱ्हाणें करून नवसाची वस्तु देवास मानवतो. नंतर ती वस्तु जोडा, साडी अगर पुतळी असल्यास इस्ताद तावीनदाराकडे देऊन देवाचे इस्तादींत जमा होते. इतर कांहीं खाण्याच्या वस्तु असल्यास त्यांची वहिवाटीप्रमाणें व्यवस्था लावण्यांत येते. तसेंच कोणाचे महारुद्र, लघुरुद्र करावयाचे असल्यास ते प्रभु मतकरी यांच्या जाणिवेनें होतात.

२४) **कीर्तन-पुराण**- गांवांत कोणी नवीन हरिदास आल्यास त्यांचें कीर्तन, पुराण प्रभु मतकरी करून घेतात.

२५) **सार्वजनिक कृत्य**- देवांच्या देवालयांत कोणत्याहि प्रसंगीं सार्वजनिक सत्यनारायणाची पूजा वगैरेंचा नवस फेडावयाचा झाल्यास प्रभु मतकरी पूजेस बसतो.

२६) **प्रसाद लावणें**- श्रीदेव रवळनाथाच्या उत्साह-मूर्तीस प्रसाद लावण्यांत येतात. म्हणजे जर कोणावर संकट अगर एखादा प्रसंग आला तर त्यांतून कोणता निर्णय घ्यावा हें समजण्यासाठीं तो इसम प्रभु मतकरी यांस आपली हकीगत सांगून, प्रसादी प्रश्न देवास विचारून उलगडा करून घेतो. प्रभु मतकरी पुजारी गुरव यास प्रसाद लावण्यास सांगून आपण प्रश्न घालतो व त्याचीं उत्तरें घेऊन मेळ पुरा करून देतो. प्रभु मतकरी याच्या जाणिवेशिवाय देवास प्रसाद लावण्याची वहिवाट नाहीं.

२७) **देव काढणें**- वरील ठराविक दिवसांखेरीज देव काढणें असतील तर प्रभु मतकरी यांच्या विचाराशिवाय देव सोडले जात नाहींत.

२८) **तरंग रंगविणें**- चितान्याकडे ठरावाप्रमाणें पैसे देऊन प्रभु मतकरी दरसाल तरंग रंगवून घेतो.

२९) **शाकारणी**- देवळांची कौलें शाकारून घेण्याचें काम प्रभु मतकरी करून घेतो व लागणारा पैसा देवस्थान उत्पन्नांतून घेतला जातो,

३०) **समुद्रस्नान**-- पर्व आल्यास श्रीदेव, तरंगें, मूर्ती, पावा वगैरे सरंजामासह प्रभु मतकरी समुद्रांत स्नान करतो.

येणेंप्रमाणें सर्व देवकृत्यें व इतर कृत्यें, पहिला मानकरी म्हणून प्रभु मतकरी यांच्या आज्ञेप्रमाणें होत असतात.

( जुन्या पत्रव्यवहारांतील उतारा )

## देवस्थान विषयक सरकारी नेमणूक

(इतलाग सदरांतून सरकारांतून गुजारतवाल्यांचें नांवें मिळणारी रक्कम १९२० चा जाबता)

रु. आ. पै.

४४–१०–० श्री वेताळ, भूमका, श्रीदेव सिद्ध यांजकडे नंदादीप व नोकरी. विठगो, विष्णू, सखलो व शंकर देवळी

२३– ८–२ श्रीवेताळ, भूमका यांजकडे पूजा नैवेद्य. सणाच्या दिवसासाठीं १ रु. ८ आ. गुजारत लक्ष्मण राघमुळीक

३१– ६–० श्रीवेताळ, भूमका व सर्व देवांकडे नौबत. गुजारत शेख महंमूदसाहेब.

२७–१०–० श्रीवेताळास अभिषेक २ रु. २ आ. श्रीसर्वेश्वरास कमळें ७ रु. ५ आ. ८ पै. गणपतीच्या पूजेसाठीं व नैवेद्यासाठीं १८ रु. २ आ. ४ पै मिळून गोपाळ आपटे यांच्या हस्तें.

२३– ५-० श्रीआदित्यनाथाची पूजा नैवेद्य. गुजारत यशवंत गोविंद जोशी

२१– ३–० श्रीआदित्यनाथ व श्री रवळनाथ यांजकडे नंदादीप व इतर कामासाठीं मिळून. गुजारत भदगें भावीण, भीकें भावीण.

३– ५–० श्री आदित्यनाथास श्रावण महिन्यांत अभिषेक. गुजारत यशवंत महादेव साठे

२– ८–० श्रीरामेश्वराकडे पूजा, नैवेद्य, सांजवात. गुजारत विठू खांबये.

११–१३–० श्रीरवळनाथास पूजा नैवेद्य. मंगेश रवळू गुरव

८–११–० श्रीनारायणास पूजा नैवेद्य. हस्तें दुर्गाराम बाबू जोशी.

२४– ५-० श्रीसर्वेश्वराची पूजा व नैवेद्य १५–८–० कमळें ८–१३–०

४– १–० श्रीसर्वेश्वराकडे पौष महांत नामावळी सांगणें. बाळकृष्ण महादेव आपटे

४– ५-० श्रीसिद्ध पूजा व नैवेद्य. गुजारत वामन यशवंत प्रभु.

९– ४–० श्रीवेताळ व सर्व देव–कीर्तनाची चाकरी हस्तें गोविंद आत्माराम बोडस.

९– ४–० सदरहू प्रमाणें. कीर्तनाची चाकरी. अनंत राम बोडस.

८– ०–० सदरहू प्र ।। सर्व देवांकडे पुराण सांगणें.

४८– ३–० श्रीभार्गवराम याजकडे पूजा नैवेद्य. गुजारत महादेव आत्माराम नाटेकर.

१०– ४–० श्रीगणपतीकडे पूजा नैवेद्यासाठीं.

१- १–० श्रीम्हारदेवाची पूजा, नैवेद्य. विसो तानो म्हार.

१००-११-० देवस्थान कमिटीदार व वहिवाटदार यांजकडे १००–११–०

१३ –९–० रामनवमी

१५ –७–६ श्रावण समाराधना.

२–९–१० .... ....

३--१४--९ नित्याचे सोमवारीं जागर.

२४-- ०--२ शिमग्यासाठीं.

१— १ — ५ समुद्रस्नान.
०—१३—११ पडजागरास तेल.
१७— २ — ५ जत्रा.
१— १ — ५ श्रीसिद्ध रेडी यास,
०— ३ — ६ श्रीरवळनाथास, दसऱ्यास.
०— ७ — ८ तेल
०— ७ — ० दिपवाळीस देवाच्या अंगास तेल.
३— १ — ७ कार्तिक अमावास्येस देवाच्या अंगास तेल.
१६—११— ५ देवस्थान स्वारीसाठीं.

२—०—० रामनवमीबद्दल पंचांग सांगण्यास श्रीदेव रवळनाथ याचकड जत्रेदिवशीं समाराधनेसाठीं मिळून यशवंत गोपाळ जोशी
७—८—० जत्रा
२—९—० मृदंग वाजविणें
२—२—० ढोल वाजविणें. सुकडो लखो म्हार
५—३—० नौबत वाजविणें. आत्मा म्हादगो म्हार

४३७—२—२ एकूण

## ( चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें देवस्थानच्या स्थावर मिळकतीच्या उत्पन्नाचा खर्च )

( खंडीस ८ रु. प्रमाणें आकार )

रु. आ. पै

६१— ८ —११ श्रीदेवाच्या खात्याचा जमीन धारा + लोकल फंड. ५७ रु. १५ आ. + ३ रु. ९ आ ११ पै.

१०— ० — ० नगारा चौघडा वगैरे वाद्यें वाजविण्यासाठीं.

०—१२— ० दसऱ्यादिवशीं आणि इतर दिवशीं देवाकडे आणि गांवांत घड आणून बसविण्यासाठीं, सांवळ यास.

४८— ० — ० नगारा चौघडा यांच्या नौबतीचे चाकरीसाठीं ६ खंडी भात.

| | |
|---|---|
| ६०—०—० | सनईच्या नौबतीच्या चाकरीसाठीं ७।। खंडी भात. |
| १—०—० | जत्रेदिवशीं प्रसाद वाटण्याकरितां पोहे. |
| ३०—०—० | श्रीदेवाच्या इमल्याच्या वार्षिक दुरुस्तीसाठीं. |
| ५—०—० | तरंगाचे तीन खांब रंगविण्यासाठीं. |
| २—८—० | दसऱ्यादिवशीं दिव्यास तेलासाठीं. |
| २—०—० | क्षेत्रपालाच्या बकऱ्यासाठीं. |
| ०—८—० | श्रावण पौर्णिमेच्या जागरास तेलासाठीं. |
| २—०—० | नेहमीच्या देवपणाच्या वेळीं दिव्यास तेलासाठीं. |
| ३—०—० | सदरवेळीं देवपणास येणारे भगत, यांना जेवणावळी-बद्दल. |
| १—०—० | श्रीदेव घाडवस याजकडील चाकरीसाठीं. |
| ८—०—० | श्रीदेव सर्वेश्वर याजकडील झाडलोटीच्या चाकरीसाठीं १ खंडी भात. |
| ०—५—० | वाकेसावली पूर्वसाच्या वाडवलासाठीं |
| ३—०—० | समुद्र-स्नानाकरितां इतर गांवचे देव येऊन या गांवांत रहातात त्यांस जेवणावळ. |
| १२—०—० | रवळनाथाचे तरंग घेणारा खांबये यास पोटगीसाठीं भात १।। खंडी. |
| १२—०—० | भूतनाथाचे तरंग घेणाऱ्या खांबयास भात १।। खंडी. |
| १०—०—० | पारधीचे खर्चासाठीं |
| ५—०—० | मार्गशीर्ष शु।। ३ या दिवशीं जत्रेस दशावतारी यांस शिध्यासाठीं. |
| ३—०—० | नगारखान्यास नौबतीचे वेळीं दिवा लावण्यासाठीं |

(कामाच्या मानानें सरकारकडून मिळणारी नेमणूक कमी असल्या-कारणानें भरतीसाठीं ( ४३ रुपये १४ आणे ) त्यांतून खालील नेमणुका.)

| | |
|---|---|
| ५—०—० | विठगो देवळी, दुर्गे भावीण वगैरे देवळयांस श्रीवेताळाकडे पडलेल्या चाकरीसाठीं. |

| | |
|---|---|
| ६—४—० | मंगेश रवळू गुरव यास श्रीदेव रवळनाथाकडील चाकरीसाठीं. |
| १—७—० | मधगें व भिकल्या भावीण यांस श्रीदेव रवळनाथ, आदित्यनाथ, पुरमार, यांच्या चाकरीसाठीं. |
| ५—०—० | विश्वनाथ शेठ खांबये यास श्रीरामेश्वर याजकडील चाकरीसाठीं. |
| २—९—० | वामन यशवंत प्रभु यास श्रीदेव सिद्ध याजकडील चाकरीसाठीं. |
| ७—१०—० | श्रीदेव वेताळ व भूमका याजकडील नोकरीच्या कामासाठीं (नवें) नव्या दिवशीं सर्व देवळांकडे नवें पोंचविणें, जत्रेदिवशीं जोशी याचे घराकडून खांद्यावरून कृष्ण आणून तो सर्व देवळांकडे खांद्यावरून आरती-बरोबर नेणें, होळीचे नेम काढून होळी घातल्यानंतर ती आचण्यासाठीं श्रीचावडेश्वरीच्या देवळाचे सांपळे आणणें व प्रत्येक सालांत गणपती पूजनाचें सामान गणपती पूजन करणार मतकरी यांजकडे देणें वगैरे कामाकरितां. |
| १६—०—० | शेख महंमूद, शेख महंमद, यांस श्रीदेव वेताळ वगैरे सर्व देवांकडे नौबतीच्या चाकरीसाठीं भात २ खंडी. |
| ३२४—७—११ | एकूण. |
| १३—०—० | देवस्थानचें काम पहाणारा कुळकर्णी यास पगार १२ रु. + १ रु. कांटीनसी बद्दल. |
| २६—०—० | संस्थान देखरेखीसाठीं मे. पोलिटिकल साहेब; मंजुरी नं. २६१६ ता. ७-९-१९१६. |
| ६—३—५ | शिल्लक वरील रकमांचा खर्च वजा जातां. |
| ८०६—१३—६ | एकूण. |

सदरहूप्रमाणें देवस्थान उत्पन्न व खर्चाचा तपशील असून तशी वहिवाट चालूं सन १९२० सालापासून दुसरा जावता होईपर्यंत रहाण्याची आहे. ता. २०।१।१९२०.

१) विठ्ठल अंबाजी प्रभु मतकरी
२) घनःश्याम आत्माराम प्रभु
३) पांडुरंग सखाराम प्रभु मतकरी
४) लक्ष्मण नारायण प्रभु मतकरी
५) भास्कर विष्णु प्रभु गांवकर
६) लक्ष्मण दादे प्रभु गांवकर
७) केशव विठ्ठल प्रभु गांवकर
८) राजाराम नारायण राजाध्यक्ष
९) दिनकर अनंत गांवकर कुलकर्णी
१०) सीताराम विसाजी गांवकर कुलकर्णी
११) महादेव रामचंद्र प्रभु
१२) विसाजी बाबुराव गांवकर कुलकर्णी.


सही – **नारायण कमाविसदार.**
ता. १७।८।२१.

## आजगांवचीं मानकरी घराणीं

आजगांवांत मुख्य वर्ग चार आहेत. १ वतनदार. २ मानकरी. ३ विर्तिक. ४ रयत. यांपैकीं देवस्थानची व्यवस्था ठेवणारीं व वार्षिक कामें प्रमुखपणें करणारीं जीं घराणीं आहेत त्यांत भारद्वाज गोत्री प्रभु मतकरी हे ब्राह्मण घराणें प्रमुख आहे.

भारद्वाज गोत्र, प्रवर तीन—

१) अंगीरस २) बार्हिस्पत्य ३) भारद्वाज



प्रभु मतकरी आजगांवकर घराणे
कुलस्वामी
सदे प्रभु
फट्ये प्रभु
फट्येप्रभु
नारायण
भास्कर
बालकृष्ण
रुद्राजी (बागलांची वाडी)
गणेश
हिरे
अंबाजी
फट्ये
सदे
राम
रखमे
सोमरे
सोयरे
यशवंत
पुरुषोत्तम
आत्माराम
अनंत
विठ्ठल
रघुनाथ
सखाराम
जगन्नाथ
निवृत्ती
विष्णू
गोविंद
गोपाळ
भास्कर (द)
वासू (द. रघुनाथ)
फटाजी
महादेव
पांडू
दिनकर
दिगंबर
दत्तात्रय
वासू (द. फटूस)
विठ्ठल
आत्माराम
अंबाजी
गणपत
यशवंत
केशव
शिवराम
कृष्णाजी
श्रीनिवास

शाखा --(वेदांचे भाग)

१) शाखलशाखा २) आश्वलायन सूत्र

आणि या घराण्याशीं सहकार्य करणारीं इतर चार घराणीं आहेत. आजगांवांत दुसरा मान अग्रसणकर मराठा जातीच्या घराण्याकडे आहे. हें घराणें आपणांस हल्लीं 'परब गांवकर' असें म्हणवितें. तिसरा मान सारस्वत ब्राह्मणापैकीं 'कुलकर्णी' घराण्यास असून चौथा मान कौंडण्य गोत्री राळकर ब्राह्मण घराण्याकडे आहे. आणि पांचवा बहुमान बेहेरे आडनांवाच्या चित्तपावन ब्राह्मण घराण्याकडे आहे. देवस्थानविषयक नवीन कामांत महारदेवाचेंहि एकून घ्यावें लागतें. म्हणजे तोहि सल्लागारांत येतो. ही महार जाती चांद्रवंशीय आहे. महारांतील दुसरी जात बेळे नांवाची असून ते स्वतःस सूर्यवंशीय म्हणवितात. त्यांचें घराणें आज आजगांवांत नाहीं. याशिवाय नानेलकर महार व मसूरकर महार असें स्वतःला म्हणविणारे मळेवाड येथील महार आहेत. यांपैकीं आजगांव येथील महार-देवाच्या भक्तमंडळीस महार जातींत अग्रमान आहे. हे महार वतनदार आहेत. परंतु हल्लीं बहुतेकांनीं आपल्या जमिनी घालविल्या आहेत. गांवच्या वार्षिक कामांत चार पांच प्रसंगीं, श्रीदेव वेताळ व श्रीदेव रवळनाथ यांच्या देवालयांतील उत्सव प्रसंगीं स्पर्शास्पर्श दोष मानावयाचा नाहीं असा शेंकडों वर्षांचा प्रघात आहे.

## आजगांवचीं घराणीं

**कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण :–** प्रभु मतकरी आजगांवकर; प्रभु राळकर, जोशी.

**चित्पावन ब्राह्मण :–** गाडगीळ, बोडस, नातु, मराठे, बेहरे, काकतकर, दातार, भुस्कुटे, पटवर्धन, भिडे, खाडीलकर, काळे, आपटे, साठे, रानडे, मोडक, बापट, अग्निहोत्रि, गोखले, डोंगरे, गोगटे, इ।।. बोडस

हें फार जुनें चित्पावन ब्राह्मण घराणें. आजगांवांतील देवांपुढें कीर्तन करण्याचा मान या घराण्याकडे आहे. शिवाय गांवचे उपाध्याय (ग्रामजोशी) यांचीं दोन घराणीं आहेत.

**गौड सारस्वत ब्राह्मण :-** राजाध्यक्ष (कुलकर्णी), बुडकुले.

**बारदेशकर गौड ब्राह्मण :-** प्रभु साळगांवकर, सावकार, राय, झांटये, धोंड.

**कऱ्हाडे ब्राह्मण :-** नाटेकर, पाटणकर.


**वैश्य-वाणी :-** निखार्गे, नार्वेकर, चिरेकर.

**मराठा :-** शेगडे, आयर, परब अग्रसणकर, मुळीक, शेटकर, कळसुलकर.

**भंडारी :-** कानजी, पांढरे, गवंडे, पायनाईक, बाळे, राऊत, केदार, पेटकर.

याशिवाय धंद्यावरून न्हावी, परीट, सुतार, कुंभार वगैरे लोक आहेत. इतर ज्ञातीचे लोकही आपणास आजगांवकर म्हणवितात.

## आजगांवची मराठी शाळा



आजगांवचे नवीन शालागृह

२७ सप्टेंबर सन १८७१ मध्यें आजगावांत पूर्ण प्राथमिक मराठी शाळा सूरू करण्यांत आली. या शाळेंत इंग्रजी चार इयत्तांचें शिक्षण मिळत असे. कै. परशुराम रामचंद्र शिनारी हे या शाळेचे सुमारे पंचवीस वर्षें मुख्याध्यपक होते. त्यांच्या कारकीर्दीत, या शाळेचा लौकिक सावंतवाडी संस्थानांत वाढलेला होता. आरोंदें, मळेवाड, तिरोडें

रेडी, शिरोडा, आरवली येथून विद्यार्थी मुद्दाम या शाळेंत शिक्षणासाठीं येत. कै. शिनारी हे विद्वान व प्रेमळ शिक्षक होते. त्यांचे अनेक विद्यार्थी पुढें कीर्तिवंत झाले. त्यांत कै. मित्र, मासिक मनोरंजनकर्ते व म. भा. भूषण आजगांवकर विशेष प्रसिद्ध आहेत. कै. शिनारी यांचे मागाहून, बांदे येथील गोवेंकर मास्तर मुख्याध्यपक म्हणून गाजले. ह्या शाळेची लांबी ८८ फूट व रुंदी २० फूट आहे. हल्लीं तिच्या बाजूलाच नवीन दुमजली दगडी इमारत बांधण्यांत आली आहे. तिची लांबी ६६ फूट व रुंदी १९ फूट आहे. ही इमारत बांधून पुरी करण्याचें श्रेय रावसाहेब मंगेश नारायण राजाध्यक्ष यांस आहे. त्यांच्या प्रयत्नामुळें आणि आजगांव ग्रामस्थ संघ मुंबई, या संस्थेच्या मदतीमुळें ही इमारत तयार होऊं शकली. इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर प्रस्तुत ग्रंथ लेखक श्री. गुं. फ. आजगांवकर यांनी स्थापन केलेलें ग्रंथ संग्राहालय आहे. ग्रंथसंग्रहालयांत असलेलें फर्निचर व ग्रंथसंग्रह देणगी रुपानें मिळविण्यांत आला आहे. हें कार्य श्री. गुं. फ. आजगांवकर यांनीं आरंभापासून आतांपर्यंत केलें आहे. आजगांव ग्रामस्थ संघ मुंबई या संस्थेनेंही बरीच पुस्तकें संग्रहालयासाठीं पाठविली. मुंबईचे एक प्रसिद्ध समाजसेवक श्री. गं. वा. परमेकर यांनी आपला दुर्मिळ ग्रंथसंग्रह दिला आहे. या संग्रहालयाच्या स्थापनेसाठीं आरंभीं एक ' विद्यार्थी मंडळ ' तयार करण्यांत आलें होतें. ता. १६-४-५० रोजीं शाळेच्या पटांगणांत भारत नाट्य समाजाचा एक प्रयोग करण्यांत आला होता. त्यांत जी थोडीशी आर्थिक मदत मिळाली तिचा विनियोग संग्रहालयासाठीं करण्यांत आला होता. विद्यार्थी मंडळानें पहिले तीन महिने वाचनालयाची व्यवस्था पाहिली. पण पुढें हें काम करण्यास त्यांना सवड मिळेनाशी झाली. अशा वेळीं संग्रहालय चालविण्याची जबाबदारी कै. गोपाळ आत्माराम मडवळ आजगांवकर यांनी स्वीकारली. ते सोनसुरें येथें मुख्याध्यापक होते. श्री. आजगांवकर यांनी ( २४ ऑगष्ट १९५२ रोजीं स्वर्गवास ) अखेर पर्यंत संस्थेचें कार्य मोठ्या आस्थेनें व विनामूल्य केलें. ग्रंथ संग्रहालयाचें आदर्श रेकॉर्ड त्यांच्याच कारकीर्दींत तयार झालें. ती व्यवस्था त्यांच्या मागाहून रावसाहेब मं. ना. राजाध्यक्ष चालवीत आहेत. ग्रंथसंग्रहालयाची स्थापना ता. १६ एप्रिल

१९५० मध्यें झाली. जून १९५३ मध्यें भरलेल्या सर्वसाधारण सभेनें संग्रहालयाची घटना तयार करून मंजूर केली असून त्या घटनेस धरून सदर संग्रहालय चालावयाचें आहे. संग्रहालयानें एक बालवाचनालय विभाग सुरु केला असून, ह्या विभागांतील पुस्तकें मुख्याध्यापक आजगांव मराठी शाळा यांचें स्वाधीन केली आहेत. त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांसाठीं केला जातो.

## आजगांव ग्रामस्थ संघ–मुंबई

मुंबई येथें वास्तव्य करून असलेल्या आजगांवच्या ग्रामस्थांत स्नेह व सलोखा वाढावा आणि त्यायोगें आजगांवची सामाजिक उन्नति साधावी म्हणून हा संघ २ जून १९४६ रोजीं डॉ. शिरोडकर हायस्कूलमध्यें भरलेल्या सभेंत स्थापन करण्यांत आला. म. भा. भू. ज. र. आजगांवकर हे अध्यक्ष होते. प्रथम वर्षी संघाचे सभासद १६८ होते. ह्या संघातर्फे आजगांव शाळेंतील मुलांना दरवर्षी पहिल्या तीन अनुक्रमांकांस बक्षिसें दिलीं जातात. शिवाय रुग्णशुश्रूषेला लागणाऱ्या वस्तु आजगांवीं ठेवलेल्या असून त्या सर्वांना मिळण्याची व्यवस्था केलेली आहे. संघाचे संस्थापक व पहिले सेक्रेटरी श्री. वा. रा. राजाध्यक्ष आणि संघाचे पहिले अध्यक्ष श्रीं. नारायण गोविंद प्रभु आजगांवकर यांनीं पहिल्या कार्यकारी मंडळांतील सभासदांच्या सहकार्यानें पुष्कळ मोठें कार्य करून संघटनेला स्थैर्य आणलें. यासंबंधीची अधिक माहिती संघाच्या प्रथम वार्षिक छापिल अहवालांत देण्यांत आलेली आहे संघाचे पहिले महत्त्वाचें कार्य म्हणजे आजगांवच्या शाळेसाठीं आर्थिक मदत उभी करणें हें होय. शंभर रुपयाहून अधिक रुपयाची मदत ज्यांनीं शालागृहास केली त्यांचीं नांवें इमारतीच्या दर्शनी भागावर कोरलेलीं आहेत. श्री. लक्ष्मण सखाराम आजगांवकर, कापडाचे व्यापारी बेळगांव, यांनी आपले आजोबा रामचंद्र सखाराम प्रभु आजगांवकर यांचें नांव देण्यासाठीं दोन हजार रुपये दिले होते. त्यांचा स्मारक हॉल म्हणून शाळेवर एक मजला बांधण्यांत आला आहे. शालागृहावर मंगलोरी कौलें घालण्यास झालेला सर्व खर्च श्रीमती राधाबाई तुकाराम देसाई यांनी दिला. सावकार-

वाडा येथील डोणी दुरुस्त करून उन्हाळ्यांत गुरांसाठीं पाणी भरण्याचें काम संघातर्फे करण्यांत येतें. आजगांव येथील ग्रंथसंग्रहालयासाठीं संघातर्फे एक दैनिक दिलें जातें. हल्ली श्री. भास्कर नारायण आजगांवकर हे संघाचें अध्यक्ष आहेत.

# आजगांव ग्रामस्थ संघ मुंबई

## कार्यकारी मंडळ

## (१९४६)

### अध्यक्ष

१ रा. नारायण गोविंद आजगांवकर

### खजिनदार

२ रा. वसंत दत्तात्रय आजगांवकर

### चिटणीस

३ वामन राजाराम राजाध्यक्ष

### सभासद

४ रा. श्रीपाद गोपाळ आजगांवकर
५ ,, रामचंद्र लाडोबा मुळीक
६ ,, जनार्दन गणेश आपटे
७ ,, लक्ष्मण विश्राम तेली
८ रा. त्रिंबक बाबूराव आजगांवकर (हरीजन)
९ ,, विनायक चिटकोबा झांटये
१० ,, बाजीराव दशरथ पांढरे
११ ,, जयराम अनंत पायनाईक
१२ ,, परशुराम आबाजी आजगांवकर
१३ ,, जगन्नाथ रुमा पांढरे
१४ ,, रावजी लाडू राऊत
१५ ,, दत्ताराम चंद्रोजी आजगांवकर
१६ ,, वामन अनंत मेस्त्री

### हिशेब तपासनीस

रा. वासुदेव दत्तात्रय राजाध्यक्ष

# साठ वर्षांपूर्वींचें आजगांव

## (ले. महाराष्ट्रभाषाभूषण ज. र. आजगांवकर)



श्री. ज. र. आजगांवकर

प्रकृत पुस्तकांत श्री. गुं. फ. आजगांवकर यांनी आमच्या आजगांव गांवाविषयीं जी भौगोलिक आणि ऐतिहासिक माहिती दिली आहे तींत मला फारशी भर घालतां येईल असें वाटत नाहीं. ग्रामदेवतांचें महात्म्य आज आहे तेवढेंच साठ वर्षांपूर्वींही होतें. हल्लीं शैक्षणिक बाबतींत थोडीशी अधिक प्रगति झाली असली तरी साठ वर्षांपूर्वींही आजगांव येथील शाळेची शिक्षणाच्या बाबतींत फार प्रसिद्धि होती व शेजारच्या शिरोडें व आरवली गांवांतील विद्यार्थी देखील आजगांवांत शिक्षणसंपादनार्थ येत असत. त्यावेळीं प्राथमिक शिक्षणाच्या सहाच इयत्ता होत्या. सहावीच्या परीक्षेलाच 'व्हर्न्याक्युलर फायनल' म्हणत, व ती परीक्षा देण्यासाठीं रत्नागिरीस किंवा वेळगांवास जावें लागे. त्यावेळीं या परीक्षेंत आजगांवच्या शाळेंतील कांही विद्यार्थी पहिल्या दुसऱ्या नंबरास पास झाल्याचें आठवतें. मुख्य शिक्षक श्री. परशुराम रामचंद्र शिनारी, श्री. विष्णुपंत नाडकर्णी, श्री. म्हैसकर, श्री. दत्तोबा ऊर्फ दत्तात्रय अनंत प्रभु, राघोबा सजनोबा प्रभु, व काकतकर मास्तर, हेच शिक्षक अनेक वर्षे होते. मुलांची संख्या शंभरहून अधिक होती. पुढें १८९० च्या सुमारास इंग्रजी शाळा झाली व तींत फक्त तीनच इयत्ता शिकविल्याजात असत. रेगे या नांवाचे इंग्रजी मास्तर होते. याच सुमारास मुलींना शाळेंत घेण्यांत येऊं लागलें. साठ वर्षांपूर्वीं आमच्या मराठी शाळेंत फक्त एकच विद्यार्थिनी होती. व त्यामुळें लोकांस तिचें मोठें कौतुक वाटे. या मुलीचें नांव मुक्ता झांट्ये. त्या वेळचे

शिक्षक 'ट्रेन्ड' नसूनही आपापल्या विषयांत पूर्ण निष्णात होते. या शिक्षकांनीं आम्हांस भाषा, भूगोल, कविता इत्यादि विषयांचें जे शिक्षण दिलें तें आम्हांस अद्याप पुरत आहे. भाषाविषय शिकविण्यांत शिनारी मास्तरांचा हातखंडा होता. या शिक्षकांत दोष असेल तर तो एकच आणि तो कोणता तर त्यांचा मारकुटेपणा! त्यांनीं पन्नास शंभर काठया मारल्या तर त्या आम्हीं थोडयाच समजत असूं. येरवीं मात्र हे शिक्षक मोठे प्रेमळ होते. मी विषम ज्वरानें आजारी पडलों तेव्हां सुमारें पंधरा दिवस शिनारी आणि रेगे मास्तर यांनी प्रत्येक दिवशीं आमच्या घरीं येऊन माझी वास्तपुस्त केली, इतकेंच नव्हे, तर मी जेव्हां अत्यवस्थ झालों तेव्हां हेड्मास्तर शिनारी यांनी आसपासचे सगळे वैद्य गोळा करून त्यांच्याकडून मला तपासविलें व योग्य ती औषध योजना करविली. त्या वेळीं मेजर टी. कँडी यांची मराठी क्रमिक पुस्तकें, रा. ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांचे भूगोल, हंटरचा किंवा ओक यांचा इतिहास आणि छत्रे किंवा पोतदार यांचें अंकगणित, अशीं क्रमिक पुस्तकें होतीं. याशिवाय वरच्या इयत्तांस जमाखर्चाची पद्धति, भूमिति, व्युत्पत्तिप्रदीप, महत्त्वमापन, वृत्तदर्पण आणि सृष्टिज्ञान यांचा अभ्यास करावा लागे.

गांवांतील लोकांचा ग्रामदेवतांवर मोठा विश्वास. या ग्रामदेवतांच्या चमत्कारांच्या अनेक दंतकथा त्या वेळींही प्रचलित होत्या. त्यावेळीं आजगांव हे गांव सावंतवाडी संस्थानांत असल्यामुळें सावंतवाडीचे शालाधिकारी कै. पांडुरंगबापू सबनीस हे दरवर्षी सहामाही परीक्षेसाठीं आजगांवच्या शाळेंत येत असत. वार्षिक परीक्षेसाठीं रत्नागिरी जिल्ह्याचे डे. इन्स्पेक्टर कै. शिवराम सदाशिव नाडकर्णी हे किंवा त्यांचे असिस्टंट लाला या नांवाचे मुसलमान गृहस्थ होते ते येत असत. बाळामाजी या नांवाचे आणखी एक असिस्टंट होते तेही एखाद्या वेळीं येत असत.

आमचे हेडमास्तर कै. परशुराम रामचंद्र शिनारी यांचें वाचन मोठें वर्षांतून चारदोन वेळां कसले तरी समारंभ घडवून आणून, त्या निमित्तानें, निवडक विद्यार्थ्यांकडून, गायन, संवाद वगैरे कार्यक्रम करवून घेण्याची त्यांस संवय होती.

साठ वर्षांपूर्वी गांवांतील देवळी लोक वेताळ व खळनाथ यांच्या देवळांत, वर्षांतील ठराविक दिवशीं, पौराणिक नाटकांचे प्रयोग (दहिकाले) करून दाखवीत असत व ही प्रथा अद्यापही चालू असेल असें वाटतें. आजगांवचा शिमगा म्हणजे एक मोठें प्रकरणच होते. आजगांवांतील लोकांचें ' रोंबट ' शिरोड्यास जात असे तेव्हां शेंपांचशें माणसें त्या रोंबटांत असत. मुख्य सण गणेशचतुर्थी. घरोघर गणपतीच्या सुंदर मूर्ति पूजीत असत आणि फटाके लावीत असत. ज्यांच्या घरीं पांच दिवसांचा गणपति असे त्यांच्याकडे भजन, कथाकीर्तन वगैरे होत असे. श्रावणी पौर्णिमेस गांवांतील महादेवाच्या देवालयांत कुडाळदेशकर गौडब्राम्हणांची श्रावणी होत असे.

साठ वर्षांपूर्वींचे लोक बरेच अज्ञानी व धर्मभोळे. त्यामुळें ते पापभीरु असत. त्यावेळीं फार स्वस्ताई होती. गड्याची रोजची मजुरी तीन आणे. सगळीं धान्यें रुपयास सोळा शेर या दरानें मिळत. नारळ रुपयाचे ३२.

त्यावेळीं बालविवाह रूढ असूनही लोक मोठे काटक व दीर्घायुषी होते. रोगराई फारशी नसे. कोणी आजारी पडला तर त्याला वैद्याचें औषध. औषधपाण्याची सोय नसल्यामुळें महार, चांभार वगैरे अज्ञानी व गरीब लोक एकदां आजारी पडले कीं बहुतकरून मरावयाचे. भुताखेतांवर लोकांचा विश्वास फार.

गांवांत किरिस्तावांची वस्ती मोठी व त्यांच्या मुख्य धंदा दारू गाळण्याचा. पुढें सरकारनें गांवांत दारुचा मोठा कारखाना सुरू केला व त्यामुळें किरिस्तावांचा धंदा बसला. या दारूच्या कारखान्यास दास्तान असें म्हणत असत.

त्यावेळीं पाऊस बहुत करून नियमितवेळीं पडत असे. केव्हां केव्हां येवढा मोठा पाऊस पडत असे कीं, सर्व प्रदेश जलमय होऊन जात असे व तीन तीन दिवस सूर्यदर्शन होत नसे.

गांवांतील पांढरपेशा लोकांचा पोषाख म्हटला म्हणजे धोतर, उपरणें आणि डोक्यास पांढरा रुमाल, पायांत वहाण, डोक्यास गंध. खालच्या वर्गातील लोक लंगोटी नेसत. आणि बाहेर जातांना खांद्यावर कांबळी घेत. ब्राम्हणांची मुलें दहाबारा वर्षांची झालीं तर लंगोटी नेसून शाळेंत जात. पुढें पंचा व त्यानंतर धोतर. सर्व विद्यार्थी टोप्या घालीत असत. पंधरा दिवसांनीं किंवा महिन्यानें हजामत. त्यावेळीं केंस राखण्याची चाल नव्हती.

लग्नकार्यें मोठ्या थाटानें होत असत. सुखवस्तु मनुष्याच्या घरच्या लग्नास, नृत्य करण्यास कलावंतीण ही असावयाचीच.


शिक्षणाचा प्रसार फारसा नसल्यामुळें लोक प्रामाणिक होते व त्यामुळें कोर्टाची पायरी चढण्याचा प्रसंग क्वचितच येत असे. त्यावेळीं वर्तमानपत्रें फारशीं नव्हतीं. शाळेंत शिनारी मास्तरांकडे केसरी, सुधारक, विविध ज्ञानविस्तार व बालबोधहीं नियतकालिकें येत असत.

त्यावेळीं आजगांवातील लोकांस पोष्ट ऑफिस शिरोड्याचें.

साठ वर्षांपूर्वी बारदेशकर ब्राम्हणांची वस्ती आजगांवांत बरीच होती. हल्लीं त्यांतील कांहीं घराणीं शिरोडें येथें स्थायिक झालीं आहेत. त्यावेळीं चित्पावन ब्राम्हणांचीही वस्ती मोठी होती.


## श्री सिद्ध पुरूष

आजगांवच्या प्रभु मतकरी कुळाचा मूळ पुरूष, जो श्री सिद्ध पुरूष, त्याच्या मूर्तीची स्थापना श्रीदेव वेताळ देवालयांत, देवाच्या डाव्या बाजूस करण्यांत आलेली आहे. श्री सिद्ध पुरूषाच्या पूजेचें काम प्रभुमतकरी घराण्याच्या शाखेकडून चालत असतें. उत्साहाच्या वेळीं पालखीची मिरवणूक काढतेवेळीं, श्री सिद्ध पुरूषाची उत्सवमूर्ति म्हणून निराळी मूर्ति आहे.




प्रभु मतकरी आजगांवकर ( बागलांची राय ) वंश वृक्ष

## स्वामी चिदानंद



स्वामी चिदानंदांची समाधि

आजगांवच्या मतकरी कुलांत शके १६३० मध्यें एक थोर पुरुष जन्म पावला. या सत्पुरुषाचें नांव **रुद्राजी बाळकृष्ण प्रभु मतकरी** आजगांवकर. त्याच्या आईचें नांव रमाबाई. रुद्राजीच्या बालपणींच, वडील बाळकृष्णपंत, वारल्यामुळें आणि त्यांच्या भाऊबंधांत कलहाग्नी माजल्यामुळें रमाबाई रुद्राजीस घेऊन आपल्या माहेरीं म्हणजे वेतोरें येथें जाऊन राहिली. वेतोरें गांवीं शिक्षणाची सोय नसल्यामुळें व घरची परिस्थिती बिकट असल्यानें रुद्राजीस शिक्षण घेतां आलें नाहीं; आणि त्यांना आजोबांचीं गुरें राखण्याचा उद्योग करावा लागला. गुरें राखत असतां एके दिवशीं खडेसल नांवाच्या जंगलांत, समोरून एका सजीव वाघासह एक संन्यासी येत असलेला त्याला दिसला. परंतु रुद्राजी, किंचित्सुद्धां न डगमगतां स्वामींकडे धांवत गेला व त्यांच्या चरणांवर त्यानें आपलें मस्तक ठेविलें. या सिद्ध पुरुषाच्या कृपेनेंच त्यास ब्रह्मज्ञान प्राप्त झालें. या सिद्ध पुरुषाचें नांव पूर्णानंद. पूर्णानंदांनी रुद्राजीचें नांव 'चिदानंद' असें ठेविलें.

चिदानंदांनी आपल्या गुरुबरोबर बारा वर्षे उत्तरेकडील तीर्थ यात्रा केली. आणि नंतर बारा वर्षे दक्षिण यात्रा केली. त्याचवेळीं आजगांवीं येऊन त्यांनी आपल्या कुलस्वामीचें व ग्रामदेवतेचें दर्शन घेऊन तेथें बरेच दिवस वास्तव्य केलें. आजगांवच्या वास्तव्यांत या सत्पुरुषांनीं पुष्कळ लोकोत्तर चमत्कार केलेले लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आले. मुक्यास वाचा देणें, जन्मांधास दिव्यदृष्टी, निष्प्राण झालेल्या प्रेतास पुन: सजीवता आणणें वगैरे अतर्क्य चमत्कार पाहून लोकांत त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि निर्माण झाली. त्यानंतर गुरु पूर्णानंदांनी दाभोली येथील मठाचें अधिपत्य स्वीकारून आपल्या वतीनें तें काम चिदानंदांवर सोपविलें. आजही श्रीमठ दाभोली येथें चिदानंदस्वामींच्या वंशजांचा मान चालत आहे.

गुरुंच्या आज्ञेवरून चिदानंदांनी चाळीसाव्या वर्षी गृहस्थाश्रमास प्रारंभ केला. त्यांच्या पत्नीचें नांव पार्वती. स्वामींना सहा पुत्र व एक कन्या होती. स्वामींचे दोन पुत्र मोठे भगवद्भक्त होऊन गेले. स्वामी वयाच्या ८० व्या वर्षी बागलांची राई येथें समाधिस्थ झाले. स्वामींच्या समाधीवर एक श्रीशंकराची पिंडी आहे. त्या पिंडीच्यावर एक पांचसहा इंच कुडकाची लाकडी पाटी आहे. त्या पाटीची खालची बाजू पाण्यांनें दरदरलेली असते. व तिला दहिंवराप्रमाणें तेज:पुंज असे सूक्ष्म चमकदार जलबिंदु निर्माण होऊन ते एकांत एक मिळून त्याचें थेंबथेंब पाणी खालीं पिंडीवर पडत असतें. हा चमत्कार महाशिवरात्रीपासून सुरू होऊन तो मृगाचा पाऊस पडेपर्यंत अव्याहत सुरू असतो. पूर्वी समाधीसमोर जवळच पिंपळाचा एक जुनाट वृक्ष होता. त्यासंबंधानें असा चमत्कार सांगतात. कीं, कितीही मोठा सोसाट्याचा वारा आला तरी त्या वृक्षाच्या पानांचा सळसळाट होत नसे. यासंबंधानें अशी कथा सांगतात कीं, स्वामी एकदां पुराण सांगत असतां वाऱ्यानें हलणाऱ्या पानांच्या आवाजानें पुराणास विक्षेप होऊं लागला. तेव्हां स्वामींनी हस्तसंकेतानें सळसळ आवाज करूं नकोस अशी वृक्षास आज्ञा केली. तेंव्हांपासून गेलीं दोनशें वर्षे तो वृक्ष ती आज्ञा पाळीत आला होता. स्वामी सन्यासी साधु, असाधारण राजयोगी व उत्कृष्ट कवि होते.

९८२२०३ २०२ ३०७२५

स्वामींची ग्रंथरचना विपुल होती. परंतु ती सर्व आतां उपलब्ध नाहीं. त्यांचा संस्कृत गुरुगीतेवरील ' स्वानंदलहरी ' नामक ओवीबद्ध टीकाग्रंथ छापून प्रसिद्ध झालेला आहे. चिदानंद स्वामींची विशेष माहिती महाराष्ट्र कवि चरीत्र भाग २ रा पृष्ठ १२७ ते १३६ वर आलेली आहे.

चिदानंदांचे कांहीं वंशज हल्लीं स्वतःपुढें ' बागलकर ' हें नांव लावतात त्यांच्यापैकीं कांहीं ' गोसांवी ' असेंहि म्हणवून घेतात. कांहींजण 'आजगांवकर ' हें नांव लावितात, यापुढें बागलांची राय येथील घराण्यांतील पुरुषांनीं प्रभु मतकरी आजगांवकर ' असें नांव लावणें योग्य होईल.

## कै. अंबाजीनाना प्रभु आजगांवकर

आजगांवच्या मतकरी घराण्यांत प्रस्तुत लेखकाचे पणजोबा कै. अंबाजी सदाशिव उर्फ अंबाजीनाना हे थोर पुरुष होऊन गेले. गांवांतील गांवकीचें काम ते करीत. त्यांना पाहिलेले लोक आजहि आहेत. त्यांच्या बद्दल एक गोष्ट सांगण्यांत येते ती अशीः- शेतसाऱ्याचे पैसे नसल्यामुळें एका बाईनें आपला दागिना त्यांच्याकडे गहाण ठेवून सारा भरला. परंतु त्याचा विपर्यास करून कोणीतरीं दरबारकडे चहाडी केली. तें काम तपासास येऊन अंबाजी-नाना यांस सावंतवाडी तुरुंगांत कच्च्या कैदेंत ठेवण्यांत आलें. तेवढयाच सुमारास रामनवमीचा उत्सव आला. श्रीदेव वेतोबाच्या देवालयांत हा उत्सव मोठया थाटानें साजरा केला जातो. आणि हें देवपण तेव्हां अंबाजीनाना-शिवाय होत नसे. दुसऱ्या दिवशीं रामनवमी आहे हें समजतांच अंबाजी-नानांनी तुरुगांत देवाची आठवण केली. चमत्कार असा कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं आकस्मिक रित्या त्यांची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. मुक्तता होतांच, रामनवमीच्या दिवशीं दुपारीं बारा वाजतां अंबाजीनाना सावंतवाडीहून आजगांवीं थेट देवळाकडे आले. व देवळासमोरील तळींत उडी मारून त्यांनीं आंघोळ केली. तसेच ते ओलेत्यानें देवळांत गेले. आणि मग मोठया थाटांत आणि लोकांच्या हर्षोद्‌गारांत रामजन्म साजरा झाला. अंबाजीनानांची ही आकस्मिक सुटका हा एक दैवी चमत्कार मानला जातो.

## कै. रघुनाथ मुरारी प्रभु आजगांवकर

हे सुमारें ८२ वर्षांचे होऊन १८९९ सालीं मृत्यु पावले. हे आरंभीं लष्करांत होते. नंतर पोलिस खात्यांत गेले, हे मोठे शूर होते. हणमंत सावंत यानें उभारलेलें बंड यांनी मोडले त्यावेळच्या मानानें हे फार बहुश्रुत असून त्यांचें वाचनही मोठें होतें. हे प्रेमळ हरिभक्त होते. मृत्युकालीं पूर्ण अवधान राखून, रामनामोच्चार करून यांनी देहत्याग केला. महाराष्ट्र-भाषा-भूषण आजगांवकर, हे यांचे चिरंजीव व त्यांच्यामुळेंच आजगांवकरांस संतवाङमयाची गोडी लागली.

## मनोरंजनकार काशीनाथ रघुनाथ मित्र आजगांवकर



कै. का. र. मित्र आजगांवकर

आजगांवांतील पहिला वृत्तपत्रकार आणि मराठी मासिक पुस्तकांच्या क्षेत्रांतील एक श्रेष्ठ दर्जाचा संपादक म्हणून कै. काशीनाथ रघुनाथ (मित्र) आजगांवकर यांचें नांव घेतलें जाते. केशवसुत, गडकरी, बालकवि ठोमरे कोल्हटकर वगैरे तत्कालीन वाङमयसेवक मासिक मनोरंजनाच्याद्वारें पुढें आले. आजगांवच्या मराठी शाळेंत प्राथमिक शिक्षण घेऊन वृत्तपत्रीय क्षेत्रांत शिरलेल्या ह्या व्यक्तीची घडाडी कांहीं विलक्षण होती. यांनी कांही काल ६ रु. पगारावर शिक्षक म्हणून वेंगुर्लें येथें काम केलें, व पुढें वार्षिक आठ आणे वर्गणीवर १८९५ सालीं 'मासिक मनोरंजन' सुरू केलें. कांहीं कालानें त्यांच्या दीर्घोद्योगानें 'मनोरंजन' हें महाराष्ट्रांतील अग्रगण्य मासिक झालें. १९१४

मध्यें मनोरंजन प्रेस काढून अनेक उपयुक्त ग्रंथांचें त्यांनी प्रकाशन केलें. त्यांनी स्वतःही अनेक पुस्तकें लिहीलीं आहेत. त्यापैकीं धाकट्या सूनबाई, मृणालिनी, लीला, ही रामाची आयोध्या, ह्या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांनी बंगाली भाषेचा अभ्यास केला होता. आपल्या मृत्युपत्रांत त्यांनी पुढील उद्गार काढले आहेत–

" माझ्या मातृभाषेची आणि स्वदेश बांधवाची कांहीतरी चांगलीशी सेवा करावी आणि महाराष्ट्रांत जन्म घेतल्याचें सार्थक करावें या हेतूनें मी मासिक मनोरंजन काढलें व अनेंक आपत्तींतून, अरिष्ठांपासून जिवापाड मेहनत करून मी तें उत्कर्षाला आणलें. हें अपत्य एकट्याचें माझें नाहीं, तें महाराष्ट्राचें आहे. महाराष्ट्रानें तें चिरंजीव करावे. "

कै. काशीनाथपंतांचा जन्म २ नोव्हेंबर १८७१ रोजीं झाला. आणि २३ जून १९२० रोजीं त्यांचें देहावसान झालें. मराठी वाङमयांतील श्रेष्ठ कवि, टीकाकार, नाटककार विनोदाचार्य कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर १९२१ च्या खास 'मित्र' अंकांत म्हणतात— " काशीनाथपंतांच्या यशाची गुरुकिल्ली त्यांच्या नैतिक गुणांत दिसून येईल. बऱ्याच बाबतींत त्यांचें श्री. धोंडो केशव कर्व्यांशीं साम्य असे. दोघांचेंहि शरीरसामर्थ्य बेताचें, वृत्ति साधी, व एक मार्गी. दोघेही निरभिमानी व विनयशील. दोघेहि निर्व्यसनीं व शांत स्वभावाचे. कर्व्यांचे ज्ञान काशीनाथपंतापेक्षा वरेंच विस्तृत असलें तरी सामान्य अध्यापकापेक्षां विस्तृत नाहीं. त्यांची बुद्धीही सामान्य मनुष्यापेक्षां तीव्र नाहीं. परंतू स्वीकृत कार्याविषयीं कळकळ, कर्तव्यनिष्ठा, उद्योगशीलता वगैरे नैतिक गुण त्यांच्या अंगीं काशीनाथपंतांतल्याप्रमाणेंच वसत आहेत. व त्यामुळें त्यांस यशप्राप्तीहि त्यांच्याप्रमाणेंच होत आहे. महाराष्ट्रांत त्यांच्यापेक्षां बुद्धिमान असलेले पुरुष शेंकडयांनीं मोजतां येतील, पण हातून झालेल्या कामगिरीचा विचार केल्यास बुद्धिमानांपैकीं कोणी त्यांची बरोबरी करील काय याचीच वानवा आहे. काशीनाथपंत यांच्याच वर्गांतील आणि औद्योगिक शाखेंतील दुसरे कर्तृत्ववान पुरुष श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर होत. "

कै. काशीनाथपंतांबद्दल महर्षि श्री. धोंडो केशव कर्वे म्हणतात– "काशीनाथपंत हे सामाजिक सुधारणेचे मोठे अभिमानी असून स्त्रीशिक्षणाच्या प्रयत्नांचे विशेष चहाते होते. मी लिहिलेल्या "आत्मवृत्त" पुस्तकापासून जर कांहीं उपयोग असेल तर त्याबद्दलचें श्रेय काशीनाथपंतांस आहे. या कामीं त्यांनी मला फार उत्तेजन दिलें. मला व माझ्या संस्थांना काशीनाथपंतांचा वेळोवेळीं फार उपयोग झाला आहे व त्याची आठवण झाली म्हणजे त्यांजविषयींची कृतज्ञताबुद्धी एकदम जागृत होते. सौजन्य हा काशीनाथपंतांचा निसर्गसिद्ध गुण होता. त्यांचें वर्तन फार प्रेमळपणाचें असे. परोपकाराकडे त्यांची बरीच प्रवृत्ति होती. गरीब सारस्वत विद्यार्थींसाठीं एका फंडाची योजना करून त्याला संघटित स्वरूप देण्याचें कामीं त्यानी निरपेक्ष बुद्धीनें पुष्कळ परिश्रम केले. त्यांचें चरित्र लिहिण्याचें काम कोणीं अंगावर घेऊन पुरें केलें तर एक चांगल्या चरित्र ग्रंथाची महाराष्ट्र-वाङमयांत भर पडेल."

कै. काशीनाथपंत आजगांवकर यांचें कार्य समजून घेण्याच्या दृष्टीनें वरील उतारे पुरेसे आहेत, एका बंगाली मित्राच्या सहवासांत राहून त्यांनी बंगाली भाषेचा अभ्यास केला होता. मनोरंजनाच्या पहिल्या अंकावर आपलें नांव घालतांना 'मित्र' हे आड नांव त्यांनी जें एकदां धारण केलें तें सर्वार्थानें सार्थ केलें. हलीं कै. काशीनाथपंताचे वंशज 'मित्र' हेंच नांव लावतात. यापुढेंतरी या घराण्यांतून 'मित्र आजगांवकर' या आड-नांवाचा उपयोग केला जावा. तसें केल्यानें त्यांचा आजगावशीं असलेला संबंध तुटणार नाहीं. मित्र घराण्यांतील विद्यमान व्यक्तींची माहिती अन्यत्र दिली आहे.

# गायनाचार्य विष्णु दिगंबर पलुस्कर



कै. विष्णु दिगंबर पलुस्कर

संगीत क्षेत्रांत युगप्रवर्तक म्हणून ज्यांचें नांव घेतलें जातें ते कै. विष्णु दिगंबर पलुस्कर आजगांवच्या गाडगीळ घराण्यांतील होत. त्यांच्या घराण्याच्या कांहीं पिढया पलुस गांवीं गेल्यामुळें. त्यांना पलुस्कर म्हणतात. इ. स. १८७२ मध्यें श्रावण शुद्ध पौर्णिमेला कुरुंदवाड येथें त्यांचा जन्म झाला. महाराष्ट्रांतील एक थोर संगीततज्ञ बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्या हाताखालीं त्यांनीं बारा वर्षें संगीताचा अभ्यास केला. त्याकाळीं संगीताचा अभ्यास करण्यांत नानाप्रकारचे अडथळे येत असत. आणि आजच्याप्रमाणें शिक्षणाच्या सुखसोई उपलब्ध नव्हत्या. अशा परिस्थितीवरही मात करून कै. विष्णु दिगंबर यांनी गायन क्षेत्रांत दिगंत कीर्ति मिळविली. आणि तें ज्ञानभांडार इतरांना उपलब्ध करून देण्यासाठीं १९०१ मध्यें लाहोर येथें त्यांनी 'गंधर्व महाविद्यालया' ची स्थापना केली शिवाय त्यांनी हिंदी-संगीत शिकविण्याच्या पद्धतीला आधुनिक स्वरूप दिलें या पद्धतीचा प्रचार करण्यासाठीं तज्ञ शिक्षक तयार केले. आणि भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक म्हणून संगीताला स्थान दिळवून दिलें. अखिल भारतीय संगीत परिषदा भरविण्याचें श्रेय त्यांनाच दिलें जातें. कॉंग्रेस अधिवेशनातून देशाभिमान जागृत करणारीं गीतें ते गात असत. यामुळें ते लाला लजपतराय, लो. टिळक, म. गांधी, पंडीत मालवीय अित्यादींच्या निकट परिचयांत आले. त्यांचा त्यांनी

हिंदी-संगीताच्या पुनरुत्थानासाठीं उपयोग करून घेतला. १९०६ सालीं हिंदुस्थान सरकारनें त्यांना राष्ट्रीय-गीतें गाण्यास बंदी केली. संगीत क्षेत्रां तील हा थोर क्रांतिकारक पुरुष २१ ऑगस्ट १९३१ मध्यें मिरज येथें कालवश झाला. त्यांच्या मृत्यूबद्दल सबंध भारतांत दुखवटा व्यक्त करण्यांत आला होता. गंधर्व महाविद्यालयाच्या मुख्य शाखेला जोडलेलीं सुमारें नव्वद संगीत विद्यालयें आज भारतांत असून या विद्यालयांचीं प्रमाणपत्रें विशेष मानलीं जातात. कै. विष्णु दिगंबर आपल्या पत्नीसह आजगावीं देवदर्शनास येऊन गेले होते.

## कै. नारायण व्यंकाजी प्रभु आजगांवकर

१९ व्या शतकांतील धाडशी व उद्योगी व्यक्ती. यांचें शिक्षण त्या काळाप्रमाणें लिहिण्या वाचण्यापुरतेंच झालें होतें. नशिबाची परीक्षा पहाण्या-साठीं हे अि. स, १८६५ सालीं बेळगावीं पायीं आलें त्यावेळीं बेळगांवीं कोकणांतील माणसें अगदींच नव्हतीं. अशा परिस्थितींत त्यांनी तेथें दलालीचा धंदा सुरू केला व पुढें स्वतःच्या नांवानें पेढी स्थापन केली. दीर्घोद्योग, प्रामाणिकपणा व धडाडी या गुणांवर त्यांनी व्यापार क्षेत्रांत मोठेंच नांव मिळविलें. पुढें त्यांनी वेंगुर्ला येथेंही पेढी स्थापन केली. सतत १९१५ पर्यंत ५० वर्षें त्यांचीं दुकानें चालू होतीं. बेळगांवला त्यांनी आपल्या बरोबर अनेकांना नेऊन व्यापार क्षेत्रांत पुढें आणलें.

# कै. सखाराम रामचंद्र प्रभु आजगांवकर



कै. सखाराम रामचंद्र प्रभु

कै. सखारामपंत हे एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस आपलें नशीब काढण्याच्या उद्देशानें बेळगांवीं आले. त्यापूर्वी कै. नारायण व्यंकाजी आजगांकर हे बेळगांवीं व्यापार-क्षेत्रांत नांव कमावून होते. कै. नारायण व्यंकाजीचें उदाहरण नजरेसमोर ठेवून स्वपराक्रमानें बेळगांव पेठेंत पुढें आलेले दुसरे व्यापारी सखारामपंत होत. पहिल्यानें ते बेळगांवच्या राणोजीराव माने यांच्या सुताच्या दुकानांत ५ रु. पगारावर नोकरीस राहिले. पुढें माने यांचे खरेदीदार आगासाहेब यांच्या सहकार्यानें १९०१ मध्यें त्यांनी स्वतंत्रपणें सुताचा धंदा सुरू केला. १९१४ सालपर्यंत त्यांनी मोठ्या परिश्रमानें, इतर कसलेल्या व्यापाऱ्यांस टक्कर देऊन स्वतःच्या दुकानास स्थैर्य आणलें. पुढें दोन वर्षें ते फार आजारी होते. याचवेळीं त्यांनी आपले बंधु केशवराव यांस बेळगांवीं आणलें. सखारामपंतांचा स्वभाव तापट, करारी,

स्वाभिमानी आणि महत्त्वाकांक्षी होता. १९१६ मध्यें ते निवर्तले. त्यांच्या मागाहून कै. केशवराव यांनी धंद्यांत वाढ केली. केशवरावांचा स्वभाव उदार व प्रेमळ होता. त्यांनी आपल्या हयातींत पुष्कळ दानधर्म केला. केशवराव १९३८ मध्यें निवर्तले.

## कै. शिवराम महादेव प्रभु आजगांवकर

हे एकेकाळीं बरेच प्रसिद्ध होते. महादेव फके प्रभु यांचे हे ज्येष्ठ चिरंजीव. ते कीर्तनहि करीत असत. कांहीं नाटक मंडळांत त्यांनी भूमिकाहि केल्या होत्या. ते चांगले नट होते. त्यांनीं हिंदुस्थानचा पद्यात्मक इतिहास लिहिला होता. तो छापून प्रसिद्ध झालेला आहे. याशिवाय दत्तात्रय स्तुतिपर बऱ्याच कविता त्यांनी रचिल्या होत्या. व त्याहि पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्या आहेत. ‘विश्वामित्र-मेनका’ कथेवर ‘कौशिकतपोभंग’ या नांवाचें एक संगीत नाटकहि त्यांनी लिहिलें आहे. यांचे बंधु शंकर हेही नाटकांत विनोदी कामें करीत. हे मुंबईंतील एल्फिन्स्टन मिल मधून हेड-क्लार्क म्हणून सेवानिवृत्त झाले.

## श्री. नारायण बाबाजी प्रभु आजगांवकर

इंग्रजी सातवी इयत्ता ( स्कूल फायनल ) पास होणारे आजगांवांतील हे पहिले विद्यार्थी. हे पुढें मुंबई म्युनिसिपालिटीच्या लायसेन्स खात्यांत असि-स्टंट लायसेन्स ऑफिसर होते- त्यांचे थोरले चिरंजीव, पुणें येथें इंजिनियर आहेत. त्यांच्याकडे हे हल्लीं राहतात.

# महाराष्ट्र-भाषा-भूषण—

## श्री. जगन्नाथ रघुनाथ प्रभु आजगांवकर



श्री. गु. फ. आणि
ज. र. आजगांवकर

आजगांवचे बहुविध गुण एकाच व्यक्तींत जर दाखवावयाचे झाले तर महाराष्ट्र-भाषा-भूषण श्री. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यांचें नांव पुढें करतां येईल. महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्रां-बाहेरही संत वाङमयाचे अभ्यासी व संशोधक लेखक म्हणून त्यांचें नांव पहि-ल्यानें घेतलें जातें. कै. लो. टिळक, म. गांधी, सरोजिनी नायडू, हरिभाऊ आपटे, डॉ. भांडारकर, तात्यासाहेब केळकर इत्यादि प्रसिद्ध व्यक्तींची आजगांवकरांवर पूर्ण कृपा होती. पांगारकर, गडकरी, खाडीलकर, वगैरे लेखक त्यांचे मित्र होते, लोकनायक अणे, श्री. बाळासाहेब खेर, प्रो. न. र. फाटक यांच्यासारखे थोर पुरुष त्यांना विशेष मानतात. त्यांचें नांव माहित नाहीं असा सुशि-क्षित महाराष्ट्रीय विरळा. महाराष्ट्र कविचरित्रांचे आद्य संशोधक म्हणून लो. टिळकांनी त्यांचा गौरव केला. तीन हजार पृष्ठांचा हा महाराष्ट्र कविचरित्र कोश श्री. आजगांवकरांनी पन्नास वर्षे खर्चून आर्थिक दुःस्थि-तीला टकरा देतदेत पुरा केला. कविचरित्रावर अभिप्राय देतांना 'केसरी' पत्रांत लो. टिळक म्हणतात. "निरनिराळया उपलब्ध साधनांची तार-तम्यानें छाननी करून कवींचे संगतवार चरित्र लिहिणें, त्यांचे ग्रंथांतील निवडक वेंचे देणें व कवीच्या काव्याचें परीक्षण करून त्याची मराठी वाङ-मयांतील जागा मुक्रर करणें हें काम मोठया मेहनतीचें, मार्मिकतेचें व रसि-कतेचें असून तें श्री. आजगांवकर यांनी योग्यरीतीनें चालविलें आहे.

महाराष्ट्र कवींच्या चरित्रांचे व काव्याचें अशा मार्मिक आणि संकलीत-रीतीनें समालोचन करण्याचा हा मराठी भाषेंतील पहिलाच प्रयोग आहे. ”

श्री. ज. र. आजगांकर हे प्रभावी आणि द्रुतगति वक्ते असून त्यांची सत्यप्रियता, स्वाभिमान आणि निस्पृहता हे गुण अनेकदां कसोटीस उतरले आहेत. उत्तर आयुष्यांत त्यांनी आपल्या तर्कशुद्ध लेखणीनें आणि व्यासंगानें अनेकवाद गाजविले आणि जिंकले आहेत. आपल्या आयुष्यांत त्यांनीं संदेश, इंदुप्रकाश, ज्ञानांजन, रणगर्जना, सुदर्शन, हास्यविनोद वगैरे गाजलेल्या नियतकालिकांचें संपादकीय व उपसंपादकीय स्थान भूषित केलें होतें. गेल्या पन्नास वर्षांतील महाराष्ट्रांतील बहुतेक वृत्तपत्रांत आणि मासिकांत आज-गांवकरांचे लेख आलेले आहेत, आणि त्यांनी दिलेल्या व्याख्यानांची संख्या तीनचारशें तरी खास होईल. रेडिओवरच त्यांचे शंभराहून अधिक कार्यक्रम झालेले आहेत.

“ आपलें अहिंसेचें तत्वज्ञान आम्हां मराठ्यांना पटणार नाहीं. शंभर वर्षांपूर्वी आम्ही बहुतेक हिंदुस्थान काबीज केला होता, म्हणून आम्हांला काहींतरी धकाधकीचा मामला सांगा ” असें म. गांधीना आजगांवकरांनी एकदां सांगितलें होतें. आजगांवकरांचें शिक्षण फारसें झालेलें नाहीं, परंतु त्यांचा व्यासंग येवढा मोठा आहे कीं, नागपूर युनिव्हर्सिटीनें त्यांना बी. ए. व एम्. ए. चे परीक्षक नेमले होतें. मुंबई विश्वविद्यालयाचेही ते मॅट्रिकचे पांच वर्षे परीक्षक होते. ‘ महाराष्ट्र-भाषा-भूषण ’ ही पदवी धारण करणारे महाराष्ट्रांत आजगांवकर हेच एकटे होत. ‘ महाराष्ट्र भाषाभूषण ’ म्हणजे आजगांवकर असें समीकरणच झालेलें आहे. ‘ संतश्रेष्ठ तुकाराम ’ या त्यांच्या पुस्तकाचें इंग्रजींत भाषांतर झालें आहे. महाराष्ट्र कविचरित्राशिवाय गोपाळ बोध, प्रणयविकसन ( नाटक ), प्रणयानंद ( नाटक ), इसापनीति, ध्रुव, प्रल्हाद, नामदेव, कवनकुतूहल, भरतपूरचा वेढा, नेपाळवर्णन वगैरे विपुल लेखन त्यांनी केलें आहे. ‘ चित्रमय जगत् ’ मासिकाचे पहिले संपादक आजगांवकर. आजगांवच्या प्रसिद्ध ‘ प्रभुमतकरी ’ कुलांत येवढा थोर वाङमय सेवक दुसरा नाहीं.

श्री. ज. र. प्रभु मतकरी आजगांवकर यांचा जन्म १८७९ मध्यें त्यांच्या आजोळीं वराड येथें झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण आजगांवच्या

मराठी शाळेंत झालें. पुढें ते कराची, कोल्हापूर, पुणें येथें कांहीं काल राहून १९११ च्या अखेरीस मुंबईंतील 'इंदुप्रकाश' दैनिकाचे मराठी संपादक होऊन मुंबईंत आले ते अद्याप तेथेंच आहेत. त्यापूर्वी ते पुणें येथें सहा वर्षे कै. हरिभाऊ आपटे यांच्या निकट सानिध्यांत होते.

१९४० सालीं कु. दे गौड ब्राह्मण ज्ञातीनें त्यांचा टोलेजंग सत्कार केला होता. १९३९ सालीं मुंबईंत आजगांवकरांचा एकसष्टीसमारंभ कै. वामन मल्हार जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यांत आला होता व सुमारें दोन हजार रुपयांची थैली त्यांना अर्पण करण्यांत आली होती. १९५२ मध्यें प्रसिद्ध पत्रकार श्री. चं. वि. बावडेकर यांचे अध्यक्षतेखालीं आजगांव ग्रामस्थ संघानें त्यांचा सत्कार करून त्यांच्याविषयींचें आपलें प्रेम व्यक्त केलें होतें. श्री. अजगांवकरांनी महराष्ट्र कविचरित्राची नवीन आवृत्ति तयार केली असून त्या कामीं मुंबई सरकारनें १९४९ ते ५३ या चार वर्षांत एकूण ३६०० रुपयांची मदत त्यांना केली होती. हल्लीं भारत सरकारनें एक वर्षासाठीं त्यांना दरमहा ५० रु. मानवेतन दिलें आहे.

## रावसाहेब श्री. मंगेश नारायण राजाध्यक्ष



रावसाहेब म. ना. राजाध्यक्ष

रावसाहेबांचा जन्म २२ ऑ. १८८१ रोजीं झाला. त्यांनी कस्टम खात्यांत नोकरी केली व १९३६ मध्यें ते सर-कार-कूनच्या जागीं असतां सेवा-निवृत्त झाले, त्यांनी आजगांवांत बरेंच भरीव कार्य केलें आहे. आजगांवच्या कीर्तींत आणि परंपरेंत कशी भर घालतां येईल याबद्दल त्यांच्याइतकी दूरदृष्टी असलेलीं माणसें थोडींच आढळतात. बोलणें थोडें व कृति जास्त अशावृत्तीनें

वागून आजगांवांत त्यांनी एक भव्य शालागृह उभारलें आहे. आजगांवची चिरेबंदी शाळा व समोरील क्रीडांगण, आजगांव येथील सहकारी सोसायटी, ग्रंथसंग्रहालय, आजगांव ग्रामस्थ संघ या सर्वांच्या मागचा मुख्य आधार म्हणून रावसाहेब राजाध्यक्ष यांचें नांव घ्यावें लागतें. निंदा आणि स्तुति यांना सारखेंच मानून आणि सेवानिवृत्तिनंतरचें आपले उत्तर आयुष्य गांवच्या सेवेंत खर्च करून या थोर ग्रामसेवकानें सेवेचा उच्च आदर्श लोकांसमोर ठेवला आहे.

## डॉ. राजाराम नारायण राजाध्यक्ष

यांचा जन्म २८ सप्टेंबर १८८४ मध्यें आजगांव येथें झाला. शिरोडें येथें त्यांचा दवाखाना असून हे लोकांना वैद्यकीय सल्ला मोफत देत असतात. आजगांवच्या वजरावरील पुलाचें बांधकाम त्यांनीं पुढाकार घेऊन पुरें केलें. वैद्यकीय व्यवसायांत त्यांनी मोठा लौकिक संपादन केला आहे. ' निस्पृहस्य तृणं जगत् ' अशी त्यांची वृत्ति आहे.

## कै. यशवंत व्यंकाजी राजाध्यक्ष

यशवंत व्यंकाजी यांचा जन्म १८६६ सालीं झाला, त्यांचें प्राथमिक शिक्षण आजगांवच्या मराठी शाळेंतच झालें. वयाच्या सोळाव्या वर्षापासून गांवचे कुलकर्णी म्हणून ते काम पाहूं लागले. हुषार कुलकर्णी म्हणून त्यांची ख्याति होती. त्यांचे पणजोबा रघुनाथ व्यंकाजी, विजापूरकरांशीं लढत असतांना रांगणा किल्ल्याच्या पायथ्याशीं धारातीर्थी पडले. त्यामुळें त्यांच्या नांवें अजगांव येथें असलेला जमिनीचा धारा त्यांना वंशपरंपरेनें इनाम करून देण्यांत आला आहे.

## श्री. भास्कर केशव प्रभु आजगांवकर

' चांगदेव पांसष्ठी ' या ज्ञानदेवकृत ग्रंथाचें त्यांनी विवेचन केलें आहे. हे कवि, टीकाकार व ज्ञानेश्वरीचे अभ्यासी आहेत. यांचें अप्रसिद्ध असें लिखाण विपुल आहे. याचे बंधु डॉ. **वामन केशव आजगांवकर** हे ' ग्रामोद्योग ' ह्या पत्रिकेचे कांहीं काल संपादक व प्रकाशक होते. यांनीं

१९३०।३२ च्या सत्याग्रहांत भाग घेऊन तुरुंगवास भोगला होता. यांचें वैद्यकीय शिक्षण कलकत्त्यास झालें. शिवाय श्री. भास्कररावांचे चिरंजीव श्री. विनायकराव हे एअर इंडियामध्यें ग्राउंड इंजिनियर म्हणून काम पहातात. 'मॉरल् रिआर्ममेंट' या जागतिक संस्थेचे ते सभासद असून भारतातर्फें त्यांनी युरोपचा प्रवास केला आहे.

## 'प्रणाम' चे संपादक श्री. फ. र. प्रभु आजगांवकर



सौ. शांताबाई व श्री. फ. र. प्रभु आजगांवकर

आजगांव येथें वृत्तपत्र काढून तें धडाडीनें चालविण्याचा पहिला मान श्री. फ. र. प्रभु आजगांवकर यांच्याकडे जातो. महाराष्ट्रांतील शैक्षणिक व शिक्षकांच्या उन्नतीसाठीं त्यांनी हें पत्र १९५० ते ५३ पर्यंत चालविलें. थोडक्या कालावधींत या पत्रानें आपल्या निर्भीड, सत्यप्रिय विचारसरणीनें मोठा लौकिक मिळविला होता. श्री. फ. र. यांना विशेषत: ज्योतिषशास्त्राचा नाद आहे. गोमांतकांत त्यांनी कांहीं काल शिक्षक म्हणून काम केलें होतें. त्यांचा जन्म ३ मे १८९० मध्यें आजगावीं झाला.

## सौ. शांताबाई फ. आजगांवकर

प्रस्तुत ग्रंथलेखकाची आई. हिचा जन्म ७ जुलै १८९७ मध्यें तांबोसें-

गोवा येथें झाला. वडील शिवराम बाळकृष्ण सामंत हे तांबोसें येथील एक सधन जमीनदार त्यामुळें बालपण लाडांत गेलें. वयाच्या बाराव्या वर्षी प्रणामचे संपादक श्री. फ. र. प्रभु यांच्याशीं विवाह अनेक संसारिक आपत्तींत हिचें नैतिक धैर्य व ईश्वरावरील श्रद्धा कसाला लागून राहिली आहे. मुलांचें शिक्षण पुरें करण्याचें सारें श्रेय तिलाच आहे नरसोबाचीवाडी येथील दत्तात्रेयाची ती उपासक असून, व्रतवैकल्यें व नेमधर्म याकडे तिचा अधिक ओढा आहे.

## श्री. हरी गणेश प्रभु आजगांवकर

आजगांव येथील सावकार घराण्यांतील श्री. हरी गणेश हे पन्नास वर्षांपूर्वी मुंबईस आले. त्यांनी लोहारचाळींत कमिशन एजंटची पेढी स्थापन केली. त्यांनी प्रामाणिकपणानें व दीर्घोद्योगानें मुंबईच्या व्यापारी वर्गांत लौकिक मिळविला आहे. सध्यां त्यांचे चिरंजीव परशुराम हरी हे मुंबई दुकानचे चालक आहेत. शिरोडें येथें त्यांचें दुकान असून ते श्री. गोविंद हरी प्रभु हे चालवितात. हे हल्लीं शिरोडें येथें बागायतांत स्थाईक झाले आहेत.

## श्री. सखाराम गणेश प्रभु आजगांवकर

श्री. हरी गणेश यांचे हे बंधु. प्रथम मराठी शाळेंत शिक्षक होते. नंतर डेप्युटी एज्युकेशनला इन्स्पेक्टर म्हणून सेवानिवृत्त झाले. एक शिक्षणतज्ञ म्हणून त्यांचा लौकिक आहे, शिरोडें येथील इंग्रजी शाळेला आर्थिक मदत मिळवून देण्यासाठीं ह्या उतार वयांतहि त्यांनी फार कष्ट केले आहेत.

## श्री. केशव विठ्ठल तथा आपा फौजदार

आजगांवच्या मतकरी घरण्यांतील मागच्या पिढींतील ही एक प्रसिद्ध व्यक्ती. गावांत यांना फार मान होता. कोणीहि मनुष्य परगांवाहून आला म्हणजे त्याचें आदरातिथ्य आपा फौजदार यांचेकडे होत असे.

## श्री. भास्कर नारायण प्रभु आजगांवकर

यांचा जन्म २७ ऑ. १८९२ सालीं झाला. यांचे प्राथमिक शिक्षण

आजगांव येथें झालें. १९१५ मध्यें मॅट्रिक झाल्यावर मुंबईत पोर्टट्रस्ट मध्यें ते कारकूर म्हणून राहिले. पुढें अॅड्व्होकेट होऊन १९४९ मध्यें हेडक्लार्क म्हणून रिटायर झाले. हल्लीं मुंबईत वकिली करितात. यांनी कु. देशस्थ गौडब्राह्मण को-ऑपरेटिव्ह सोसायटी स्थापन करण्यांत भाग घेतला. हे कु. दे. विद्यावृद्धि समाजाच्या मॅनेजिंग कमिटीचे मेंबर असून रिफंड कमिटीचे अध्यक्ष आहेत. यांचा थोरला मुलगा पांडुरंग, इंडियन वॅटलशिप वर लेफ्टनंट् कमांडरच्या जागेवर आहे. दुसरा मुलगा पद्माकर, टाटा रिसर्च इंस्टिटयूट वंगलोरमध्यें इंजिनियर होते. हल्लीं ते हिराकुड धरण योजनेंत माईन् वर्कस्मध्यें इंजिनियर आहेत. आणि तिसरा मुलगा रामचंद्र हा मुंबई राज्यांतील डायव्हिंग चॅंपियन म्हणून प्रसिद्ध आहे.

## श्री. विश्वनाथ आत्माराम प्रभु आजगांवकर

### वीव्हिंग मास्तर, स्टॅंडर्ड मिल.

फार प्राचीन कालापासून कापड विषयक व्यापारांत आणि उत्पादनांत भारत फार प्रसिद्ध आहे. कापडाची निर्यात हा एक आपला महत्वाचा धंदा आहे. आधुनिक यंत्रसामुग्रीचें आणि विणकामाचें यथार्थ ज्ञान असलेलीं भारतांत जी थोडीं तज्ञ माणसें आहेत त्यांत आजगांवचे श्री. विश्वनाथपंत ऊर्फ दाजी आजगांवकर यांचीं प्रामुख्यानें गणना होते. हें उच्च स्थान त्यांनी आपल्या चिकाटीनें, दीर्घोद्योगानें, आणि चतुरस्त्र बुद्धीनें मिळविलें आहे. १९११ मध्यें सहा आणे रोज ह्या अल्पवेतनावर एक सामान्य कुली म्हणून यांनीं मिलमध्यें प्रवेश मिळवून अवघ्या पांच वर्षांत असिस्टंट वीव्हिंग मास्तर म्हणून फिन्लेमिल मध्यें ते काम करूं लागले. १९१७ च्या आक्टोवरांत मध्यप्रदेशांत पुलगांव येथें व १९१८ मध्यें बारशी येथें वीव्हिंग मास्तर म्हणून त्यांनी नोकरी केली. १९२७ मध्यें, दिल्ली क्लॉथ अॅण्ड जनरल मिलमध्यें ते वीव्हिंग सुपरिन्टेंडेंट होते. १९३४ पासून गेलीं वीस वर्षे ते स्टॅंडर्ड मिलचे वीव्हिंग मास्तर म्हणून मोठ्या पगारावर काम करीत आहेत. त्यांचीं सर्व मुलें पदवीधर आहेत. कांहीं नवीन गीरण्यांना कन्सल्टेशन व प्लॅन्स देणें हीं कामेंही त्यांना करावीं लागतात. व्ही. जे.

टी. आय्. ह्या प्रसिद्ध औद्योगिक शिक्षण संस्थेनें त्यांना गेलीं कित्येक वर्षे वीव्हिंगचे परीक्षक म्हणून निवडलें आहे. अखिलभारतीय स्वरूपाच्या ज्या टेक्सटाईल कॉन्फरन्सिस झाल्या त्यांतून महत्वाच्या विषयांवर त्यांनी आपले संशोधनपूर्ण प्रबंध वाचले आहेत. भारतांतील आणि युरोपांतील कापड-विषयक इंग्रजी नियत कालिकांतून त्यांनी विपूल लेखन केलें आहे. टॅरिफ बोर्डासमोर त्यांनी साक्ष दिली असून भारत सरकारनें नेमलेल्या स्टँडर्ड कमिटीवर त्यांची नेमणूक झाली होती.

## श्री. घनःश्याम आत्माराम प्रभु आजगांवकर

यांचें प्राथमिक शिक्षण आजगांवच्या मराठी शाळेंत झालें. शिरोडें येथील टयुटोरियल इंग्लिश स्कूलचे ते सेक्रेटरी असून ही शाळा पुढें आणण्यास त्यांचे अविश्रांत श्रम कारणीभूत झाले आहेत. या संस्थेच्या संस्थापकांपैकीं ते एक आहेत. आजगांवच्या देवस्थानविषयक व गांवकीच्या कार्यांत ते आस्थेनें भाग घेत असतात. आजगांव येथील श्रीदेव वेताळ देवालयाचा जीर्णोद्धार हें त्यांनी केलेलें सर्वांत मोठें कार्य होय.

## श्री. आत्माराम राघोबा प्रभु आजगांवकर

यांचें प्राथमिक शिक्षण आजगांवच्या मराठी शाळेंत झालें. यांनी कांहीं काल सावंतवाडीस इंजिनियरिंग ऑफीसमध्यें उमेदवारी केली होती. यांनी एक वर्ष प्राथमिक शिक्षक म्हणूनहि काम केलें. १९२१ मध्यें बेळगांव येथें येऊन त्यांनी स्वतःचें दुकान थाटलें. बेळगांवच्या रविवार पेठेंत एक वजनदार व्यापारी म्हणून आज ते ओळखले जातात. त्यांना सामाजिक कार्याची आवड असून शैक्षणिक कार्यांसाठीं त्यांनी कांहीं संस्थांना देणग्याही दिल्या आहेत. ईश्वरावर श्रद्धा ठेवून वागणें हा त्यांचा स्वभावधर्म आहे.

## श्री. कान्होबा राघोबा प्रभु आजगांवकर

श्री. कान्होबा राघोबा प्रभु यांचा जन्म ५ जानेवारी १८९९ रोजीं झाला. १९१४ मध्यें आजगांवच्या मराठी शाळेंतून ते व्ह. फा. पास झाले.

१९२७ ते ३२ च्या दरम्यान त्यांनी शिरोड्यास व्यापार केला. नंतर १९३२ मध्यें कराचीस जाऊन त्यांनी तेथें पानविडीचें दुकान थाटलें. 'माधवजी पुरुषोत्तम आणि कंपनी' या गुजराथी दुकानचे ते १९४७ पर्यंत भागिदार म्हणून काम पहात होते. तेथें मराठा जनरल एज्युकेशन सोसायटीस त्यांनी २० हजार रुपये मिळवून दिले. ह्या सोसायटीचे ते व्हाइस प्रेसिडेंट होते. दाक्षिणात्य गौ. सा. समाजाचेहि व्हा. प्रेसिडेंट म्हणून ते काम पहात होते. त्यांनी १९४७ मध्यें कराचीस स्वतःच्या नांवाची स्वतंत्र कंपनी स्थापन केली. फाळणीनंतर कराची सोडून ते कोचीनला आले. तेथें 'के. आर्. आजगांवकर आणि कं.' या नांवानें त्यांनी पेढी सुरु केली. आणि १९४९ मध्यें त्याचीच बेळगांवीं शाखा स्थापन केली. स्वतःच्या कर्तृत्वावर ते व्यापारांत पुढें आले आहेत.

## श्री. लक्ष्मण सखाराम प्रभु आजगांवकर

बेळगांव येथें आपल्या परोपकारी व प्रेमळ वागणुकीमुळें सर्वांच्या आदरास पात्र झालेली व्यक्ति म्हणून श्री. लक्ष्मणरावांचा निर्देश केला जातो. त्यांनी अनेक व्यक्तींना आणि संस्थांना सढळ हातानें मदत करून हातभार लावला आहे. त्यांच्या लोकसंग्राहक वृत्तीमुळें बेळगांवांत स्वज्ञातीयांस त्यांनी मोठें मानाचें स्थान मिळवून दिलें आहे. त्यांचा जन्म ६ डिसेंबर १९०७ मध्यें आजगांवीं झाला. आजगांवच्या मराठी शाळेंत त्यांचें प्राथमिक शिक्षण झालें. बेळगांवच्या मिशनस्कूलमध्यें त्यांचा इंग्रजीचा अभ्यास झाला. १९२७ मध्यें ते दुकानच्या व्यवहारांत लक्ष घालूं लागले. १९३८ मध्यें त्यांचे चुलते केशवराव निवर्तल्यावर दुकानची सर्व जबाबदारी त्यांच्यावर पडली. त्यांनी आपल्या बुद्धिकौशल्यानें व मनमिळाऊ स्वभावानें एक अग्रगण्य व्यापारी म्हणून लौकिक संपादन केला आहे. स्थानिक शैक्षणिक संस्थांचे ते एक महत्त्वाचा आधार आहेत.

# श्रीमान् केशव जनार्दन गाडगीळ

बी. ए. ( ऑनर्स )



श्रीमान के. ज. गाडगीळ

Stand up, be bold, be strong. Take the whole responsibility on your own shoulders, and know that you are the creator of your own destiny

—Vivekanand

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपलें इच्छित ध्येय साध्य करून घ्यायला, बुद्धि-मत्ता, चिकाटी, आणि महत्वाकांक्षा ह्या गुणांची आवश्यकता असते. अशा व्यक्ति समाजांत नेहमींच थोड्या आढळतात. पण त्यांच्याच मुळें समाजाचें आणि पर्यायानें देशाचें पाऊल पुढें पडत असतें अशा व्यक्तींत श्री. केशव जनार्दन ऊर्फ बापूसाहेब गाडगीळ यांचें नांव समाविष्ट करावें लागेल.

श्री. केशवराव यांचा जन्म कुरुंदवाड येथें गरीब पण मानधन अशा प्रसिद्ध गाडगीळ घराण्यांत झाला. त्यांचे वडील कुरुंदवाड संस्थानच्या धाकट्या पातीचे दरबार गवई होते. त्यांच्या मातोश्री ती. सौ. यशोदाबाई

आदर्श माता होत्या. आपल्या मुलानें खूप शिकावें आणि विद्वान व्हावें अशी त्यांना तळमळ असे. घरची गरिबी असतांही मातापितरांनी श्री. गाडगीळ यांस कोणत्याही गोष्टीची कमतरता पडूं दिली नाहीं.

श्री. गाडगीळ यांचें प्राथमिक शिक्षण कुरुंदवाड येथील ए. व्ही. स्कूलमध्यें झालें. दुय्यम शिक्षण कै. श्री बापूसाहेब महाराज कुरुंदवाडकर (धाकटी पाती) यांचे सहाध्यायी म्हणून त्यांचे आश्रयाखालीं पार पडलें. श्री. गाडगीळ यांना आपलें कॉलेज शिक्षण स्वावलंबनानेंच पूर्ण करावें लागलें. मुंबई येथें विल्सन कॉलेजमध्यें शिकत असतांना, द्रव्यार्जनासाठीं त्यांना शिकवण्या कराव्या लागत.

सुप्रसिद्ध उद्योगपति व गिरणी मालक श्री. मुरारजी गोकुळदास यांच्या निकटवर्ती स्नेह्याच्या मुलाची त्यांना शिकवणी मिळाली. 'यत्न तो देव जाणावा' ह्या समर्थांच्या वचनाप्रमाणें वागून श्री. गाडगीळ विल्सन कॉलेजमधून बी. ए. झाले. पदवीधर होतांच कुठेंतरी सरकारी नोकरी पत्करून मोठ्या हुद्यावर जाणें त्याकाळीं सहज शक्य होतें. परंतु गाडगीळांची महत्वाकांक्षा केवळ नोकरींत इतिकर्तव्यता मानणारी नव्हती. म्हणूनच श्री. मुरारजी गोकुळदास यांच्या प्रेमळ उत्तेजनानें त्यांच्याच एका गिरणींत ते उमेदवारी पत्करून राहिले. यानंतर मुरारजी शेठ यांनी अंबरनाथ येथें 'धी धरमसी मुरारजी लेदर क्लॉथ फॅक्टरी' नांवाचा मेणकापडाचा कारखाना काढला. अशाप्रकारचा कारखाना हिंदुस्थानांत त्यावेळीं दुसरा नव्हता. या कारखान्यांत श्री. गाडगीळ यांची बदली करण्यांत आली. येथें इंग्लंडहून मुद्दाम आणलेल्या तज्ञांच्या हाताखालीं ते शिक्षण घेऊं लागले. श्री. गाडगीळ आपल्या कामांत तरबेज झालेले पाहून कारखाना चालविण्याची सर्व तांत्रिक जबाबदारी श्री. मुरारजी शेठनीं त्यांच्यावर सोंपविली. १९२७ मध्यें श्री. गाडगीळ यांना, रेक्सिनच्या कारखान्याचें निरीक्षण करून येण्यासाठीं अमेरिकेस पाठविलें.

१९२८ ते ३९ हा काळ जागतिक मंदीचा आला. त्यामुळें मेण-

कापडाचा हा कारखाना वंद करणें भाग पडलें. १९४० सालीं कारखाना, मेसर्स अहमद अबदुल करीम ब्रदर्स या कंपनीनें विकत घेतला. त्यावेळीं पूर्वानुभवी व कष्टाळू म्हणून श्री. गाडगीळ यांना मुद्दाम पाचारण करून यांत्रिक प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ति करण्यांत आली. श्री. गाडगीळ यांनी आपल्या कर्तबगारीनें थोडन्या अवधींतच कारखाना भरभराटीस आणला. युद्धकालांत देशाच्या व सरकारच्या रेक्सिनविषयक सर्व गरजा या कारखान्यानें पुरविल्या. दुसऱ्या जागतिक युद्धांत रवर पुरविणारे देश शत्रूच्या ताब्यांत गेले व रबराची उणीव तीव्रतेनें भासू लागली. सैनिकांस लागणाऱ्या ग्राउंड शीट्सचा तुटवडा पडू लागला. त्यावेळीं श्री. गाडगीळ यांनी सब्स्टिटयूट रवर वापरून ग्राउंड शीटचा नमुना बनविला, तो सरकारी लॅबोरेटरीनें पास केल्यावर श्री गाडगीळ यांनी सुप्रसिद्ध उद्योगपति श्रीमान शेठ कृष्णराज ठाकरसी यांचे सहकार्यानें ग्राउंड शीटस् वनविण्याचा कारखाना मुंबई येथें चालू केला. या एकमेव कारखान्यानें भारतीय सैनिकांच्या ग्राऊंड शीटस्च्या सर्व गरजा पुरविल्या.

नंतर श्री. गाडगीळ यांनी भोर येथें "धि भोर इंडस्ट्रीज लि." या भव्य कारखान्याची स्थापना करण्यांत पुढाकार घेतला. या कारखान्यांत मेणकापड लेदर क्लॉथ, ट्विनटेक्स, प्लॅस्टिक क्लॉथ, सरस, बुकबाईंडिगचें कापड वगैरे माल तयार होतो. या कारखान्यांत सुमारें ५०० कामगार काम करतात. श्री. गाडगीळ हे या कारखान्याचे टेक्निकल डायरेक्टर आहेत.

श्री. गाडगीळ हे मधून मधून आजगांवीं देवदर्शनार्थ येतात. श्रीदेव वेताळ देवालयाचा हल्लींच जीर्णोद्धार करण्यांत आला असून, सुमारें पांच हजार रुपये खर्च करून श्री. गाडगीळ यांनी देवालयांत लादी वसवून दिली आहे.

॥ पत्र वा पुष्प जो प्रेमें फळ वा जळ दे मज ॥
॥ तें त्या पवित्र भक्ताचें अर्पिलें खाय मी सुखें ॥
( – गीताई )

श्री. गाडगीळ यांची पन्नाशी उलटून गेली असूनहि या वयांत त्यांचा काम करण्याचा उत्साह तरुणांना लाजवील असाच आहे. शास्त्रीय विषयाचें त्यांचें ज्ञान व वाचन अद्यावत आहे. गाडगीळांचा स्वभाव निगर्वी, प्रेमळ, व सौजन्यशील आहे.

मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्यदेवोभव, या सूत्रत्रयीचे ते मूर्तिमंत आदर्श आहेत.

## पंडित दत्तात्रेय विष्णु पलुस्कर गाडगीळ



पं. द. वि. पलुस्कर

गायनाचार्य विष्णु दिगंबर पलुस्करांचे एकुलते एक चिरंजीव श्री. दत्तात्रेयपंत याचें नांव भारतीय संगीत क्षेत्रांत प्रामुख्यानें घेतलें जातें. भारत सरकार-तर्फे रशियांत जाणाऱ्या सांस्कृतिक शिष्ठमंडळांत त्यांचा समावेश करण्यांत आला आहे.

दत्तात्रेय विष्णु पलुस्करांचें आप्त परिवारांतलें नांव बापू. बापुरावांचा जन्म १८ मे १९२१ रोजीं कुरुंदवाड येथें झाला. श्री. विष्णु दिगंबर यांचे हें बारावें व शेवटचें अपत्य. तशांत आधींची अपत्यें गेलेलीं. असें असतांना पंडितजींचा त्यांच्यावर जीव जडल्यावांचून कसा राहील. ४—५ वर्षांच्या बापूला वडील आपल्या परीनें शिकवित असत. इतक्या लहान वयांत त्याना सुरेल सात स्वर व लहान लहान पलटें घेतांना पाहून त्यांना समाधान होत असे.

नंतर १९३५ पर्यंत म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत, बापूंचें शिक्षण, त्याचे चुलते पं. चिंतामणराव पलुस्कर यांचेकडे झालें. येवढ्या लहानवयांत बापुरावांनी तीनशें साडेतीनशें चीजा व ४०–५० राग हस्तगत केले. तत्पूर्वी १९२८ सालीं बापूंच्या मुंजीच्या निमित्तानें पं. विष्णु दिगंब-

रांनी नाशकांत जी संगीत परिषद घडवून आणली होती तिची स्मृति अजूनहि बापुरावांच्या मनाशीं ताजी आहे. पं. चिंतामणराव पलुस्करांखेरीज पंडित विनायकराव पटवर्धन, पं. मिराशीबुवा, केशवराव दातार, व नाराय-णराव व्यास यांच्याकडेहि बापुरावांनी सांगिताचा अभ्यास केला.

आज बापुराव ३३ वर्षांचे आहेत. त्यांना दोन मुलेंहि आहेत. आपल्या आईवर त्यांची निरतिशय भक्ति आहे. लहानसाच सुबक बांधा, गौरवर्ण, वाटोळा चेहरा, भावपूर्ण नेत्र, व भरीला वागणुकींतील शालीनता या गुणांनीं बापुराव माणसावर चटकन् छाप पाडतात.

आलाप, बोल, व तान हीं ख्याल गायकीचीं तीन्ही अंगें त्यांनी आत्मसात केलीं आहेत. १९३१ मध्यें विष्णुबुवा पलुस्कर गेले. तेव्हांपासून, आतापर्यंत बापुरावांनी आपल्या अभिजात संगीत कौशल्याची चमक अनेकवेळां दाखविली आहे. जालंदरच्या हरवल्लभाच्या मेळ्यांत बापूचें स्वतंत्र गायन झालें. त्यानंतर अलाहाबाद,कलकत्ता, वगैरे ठिकाणच्या संगीत परिषदांकडून बापुरावांना निमंत्रणें आलीं. १९५२ च्या मार्चमध्यें मद्रासची रसिक रंजन सभा तर त्यांनी चांगलीच गाजविली. दिवसें दिवस त्यांच्या कर्तृत्वाचें क्षितिज वाढत जाईल व आपल्या वडिलांच्या कीर्तींत ते भर घालतील यांत शंका नाहीं.

## श्री. बाळकृष्ण लक्ष्मण प्रभु आजगांवकर

ज्याकाळीं इंग्रजी शिक्षणाला विशेष मान होता आणि वड्या पगाराची नोकरी आपण म्हणून चालत येत होती अशा काळीं बी. ए.; एल्. एल्. बी. होऊनहि व्यापारक्षेत्रांतच प्रवेश करून नांव कमविणारे जे कांहीं थोडे गृहस्थ आहेत त्यांत सावकार घराण्यांतील शिवराम राघोबा आजगांव-कर या मुंबईतील प्रसिद्ध पेढीचे मुख्य चालक श्री. बाळकृष्ण लक्ष्मण प्रभु आजगांवकर यांची प्रमुख्यानें गणना होते. त्यांचा जन्म २७ जुलै १८९१ मध्यें आजगांवीं झाला. त्यांचें मराठी व इंग्रजी तीन इयत्तांचें शिक्षण आजगांवच्या शाळेंतच झालें. १९०९ पर्यंत ते सावंतवाडी हायस्कूलमध्यें

होते. मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजमधून १९१४ मध्यें ते बी. ए. झाले. १९१७ मध्यें वकिलीची सनद घेऊन मुंबई हायकोर्टांत कांहीं महिने त्यांनी वकिलीही केली. १९१८ पासून शिवराम राघोबा आजगांवकर या नांवानें मुंबईत विद्यमान असलेल्या पेढीचे ते चालक आहेत. ही पेढी, कोंकणपट्टी, बेळगांव, व गोवा या भागाशीं व्यवहार करते.

## श्री. नारायण गोविंद प्रभु आजगांवकर

खांडेकर वाङमयापैकीं नवचंद्रिका, अबोली, चांदण्या ह्या पुस्तकांचे प्रकाशक श्री. ना. गो. प्रभु हे शिरोडें येथील टयूटोरियल इंग्लिश स्कूलमध्यें कांहीं वर्षे शिक्षक होते. हे चांगले वक्ते व तळमळीचे कार्यकर्ते असून आजगांव ग्रामस्थ संघाचे ते पहिले अध्यक्ष होत. उत्कृष्ट शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक आहे.

## श्री. गणपत सखाराम प्रभु आजगांवकर

श्री. गणपतराव यांचा जन्म १९१२ मध्यें आजगांवीं झाला. प्राथमिक शिक्षण त्यांनी आजगांवच्या शाळेंतच पूर्ण केलें. त्यांचें इंग्रजी शिक्षण शिरोडा येथील इंग्रजी शाळेंत झालें. लहानपणापासून त्यांचा साहित्याकडे कल आहे. सुरवातीस त्यांनी अगदीं लहानशा प्रमाणांत सूत रंगविण्याच्या धंद्यास सुरवात केली. हें काम प्रथम ते स्वतःच करीत. हल्लीं त्यांनी आपल्या ह्या छोटया धंद्याचें रुपांतर भल्या मोठ्या डाईंग फॅक्टरींत केलें आहे. चिकाटी, कल्पकता, व दूरदृष्टी यांच्या जोरावर त्यांनी अगदीं अल्पावकाशांत बेळगांवच्या उद्योगपतींत मानाचें स्थान संपादक केलें आहे. त्यांनी शिरोड्याच्या इंग्रजी शाळेस एक हजार रुपये दिले. त्यांचा स्वभाव सरळ आणि परोपकारी असून लहानथोरांशीं वागतांना ते सारखीच आस्था दाखवितात. त्यांचा एक मुलगा चि. सुधाकर हा इंटरसायन्सला आहे

## डॉ. यशवंत केशव प्रभु आजगांवकर.

राणी पार्वतीदेवी कॉलेज बेळगांव या संस्थेचे सध्याचे चेअरमन डॉ. यशवंतराव यांचें प्राथमिक शिक्षण आजगांवच्या मराठी शाळेंत झालें.

सेंट झेवियर कॉलेजमधून १९३२ मध्यें ते बी. एस्. सी. झाले. १९३४ मध्यें त्यांनी जर्मनींत जाऊन (D. Phill) डी. फिल. (फिजिक्स) ही पदवी संपादन केली. बंगलोर येथील टाटा अिन्स्टिटयूटमध्यें एक वर्ष रिसर्च स्कॉलर व एक वर्ष लेक्चरर म्हणून काम करून पुढें ते १९४० पासून आपल्या धंद्यामध्यें लक्ष घालूं लागले. बेळगांवांतील अनेक शिक्षण संस्थांच्या चालकवर्गांतील ते एक आहेत.

## श्री. गंगाराम नारायण प्रभु आजगांवकर.

श्री. गं. ना. प्रभु यांचा जन्म २४ जून १८९८ मध्यें आजगांवीं झाला. १९१७ मध्यें मालवणच्या टोपीवाला हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले. मुंबई पोर्टट्रस्टमध्यें २५ रु. पगारावर कारकून म्हणून लागले व हेडक्लार्क म्हणून रिटायर्ड झाले. त्यांनी कु. दे. ज्ञातिफंड, निराश्रित सहाय्यकारी फंड, आजगांवची शाळा, देवस्थान जीर्णोद्धार यासाठीं मदत केली आहे.

## श्री. स. य. राजाध्यक्ष, आजगांवकर

शिरोडा येथील ट्यू. अि. स्कूलचे कांहीं वर्षे मुख्याध्यापक असलेले श्री. स. य. आजगांवकर हे हल्लीं बेळगांव येथील मराठी ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्राध्यापक आहेत १० डिसेंबर १९१३ मध्यें त्यांचा आजगांव येथें जन्म झाला. १९४५ मध्यें कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधून ते बी. ए. झाले. १९४८ मध्यें बी. टी. झाल्यावर कुडाळ हायस्कूलमध्यें ते शिक्षक होते. त्यांनी बेळगांव येथें मॅट्रिकसाठीं सुरू केलेले व्हिक्टरी क्लासेस प्रसिद्ध आहेत. शिस्त आणि टापटीप यांची त्यांना आवड असून ते एक कुशल अध्यापक आहेत.

## श्री. गंगाराम दत्तात्रय प्रभु आजगांवकर

बेळगांवच्या रविवार पेठेंत 'लक्ष्मी ट्रेडिंग ब्युरो' नांवाचें स्वत: स्थापन केलेलें दुकान श्री. प्रभु चालवितात. पहिल्यानें बराच काल त्यांनी

नोकरी केली. हिंदुस्थानांत व्यापाराच्या निमित्तानें ते पुष्कळ फिरले. आप्त स्वकीयांचें, ज्ञातिबांधवांचें सहाय्य न घेतां, परकीय भाषा संस्कृति यांत वावरून गेलीं वीस वर्षे ते बेळगांवीं स्थायिक आहेत. अिमानें अितबारें जशी त्यांनी नोकरी केली तशीच स्वाभिमानासाठीं त्यांनी स्वतंत्र दुकान थाटलें.

## श्री. भालचन्द्र सखाराम आजगांवकर

श्री. ज. र. आजगांवकर यांचे वडील बंधू सखारामपंत यांचे हे धाकटे चिरंजीव होत. श्री. भालचंद्र हे मॅट्रिक झाल्यावर त्यांनी व्हि. ज्यु. टे. स्कूलची एल. टी. एम्. ही परीक्षा दिली. व गिरणींत विणकाम खात्यांत नोकरी धरली. वाढतां वाढतां हल्लीं ते मोठ्या पगारावर कोल्हापूर येथील ' छत्रपति शाहू मिलचे मॅनेजर आहेत. हे स्वभावानें फार शांत, सभ्य आणि अत्यंत दयाळू आहेत.

## श्री. शामराव शिवराम प्रभु आजगांवकर

शामरावांचा जन्म ३० मार्च १९०६ मध्यें झाला. त्यांचें अिंग्रजी ७ वी पर्यंतचें शिक्षण सावंतवाडी हायस्कूलमधून झालें. १९३० सालच्या सत्याग्रहांत व १९४६ च्या प्रजापरिषद चळवळींत त्यांनी हिरीरीनें भाग घेतला होता. ते सावंतवाडी तालुका काँग्रेस कमिटीचे चिटणीस, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे सभासद, रत्नागिरी जिल्हा काँग्रेस कार्यकारी मंडळाचे सभासद असून जिल्हा विकास मंडळ, जिल्हा सहकारी बोर्ड, तालुका ग्रामसुधारणा मंडळ, धान्य सल्लागार समिती इत्यादि संस्थांचे सभासद आहेत.

## डॉ. सत्याश्रय शिवराम प्रभु आजगांवकर

डॉ. आजगांवकर हे पंचगणी येथील (लिमोरया टी. बी. सॅनिटोरियममध्यें ॲक्टिंग सुपरिन्टेंडेंट असून तेथील सार्वजनिक कार्यांत ते नेहमीं भाग घेत असतात.

## श्री. श्रीपाद महादेव प्रभु आजगांवकर

आजगांवच्या मतकरी घराण्यांतील हे पहिले एम्. ए., एल्. एल्. बी.

असून खेर मंत्रिमंडळाच्या काराकीर्दींत मुंबई विधानसभेंतील कॉंग्रेसपक्षाचे ते चिटणीस होते. त्यांचा तत्वज्ञानाकडे ओढा आहे.

## श्री. वामन राजाराम राजाध्यक्ष, आजगांवकर

हे हल्लीं मध्यवर्ती सरकारच्या सेंट्रल एक्साजिज व कस्टम्स या खात्यांत ऑफिस सुपरिंटेंडंटच्या हुद्यावर आहेत. त्यांचा जन्म १७-६-१९०६ सालीं झाला. १९२६ सालीं ते वरील खात्यांत कारकून म्हणून नोकरीस राहिले आणि आपल्या कर्तबगारीनें व हुशारीनें अितरांस मागें टाकून ते या हुद्यावर चढले आहेत. त्यांचा उत्साह व सार्वजनिक कामाची तळमळ उल्लेखनीय आहे. १९४६ सालीं त्यांनी आजगांवांत कांहीं सार्वनिजक कार्य करावें या हेतूनें " आजगांव ग्रामस्थ संघ, मुंबई " ही संस्था स्थापून मोठ्या मेहनतीनें व प्रामाणिकपणें तिची सेवा केली. १९५२ सालीं त्यांची बदली नागपूर येथें झाली. ह्या वेळेपर्यंत संस्थेचे चिटणीस म्हणून त्यांनीं मोठ्या जबाबदारीचें काम बजावलें. आजगांव ग्रामस्थांच्या सहकार्यानें, आजगांवचें नवीन शालागृह, शाळेंतील मुलांस बक्षिसें, गुरांची पाणी पिण्याची व्यवस्था, ऋग्ण शुश्रुषेचीं उपकरणें गावांत ठेवणें, वगैरे गोष्टी त्यांच्या प्रयत्नाचीं फळें होत. आजगांवांत सार्वजनिक स्मशान बांधावें म्हणून त्यांची खटपट चालू आहे. गावांतील बहुजन समाजांत ते फार प्रिय असून त्यांचा स्वभाव मनमिळावू आहे. सेवानिवृत्त झाल्यावर ते आजगांवीं राहून लोकोपयोगी कार्य करतील अशी खात्री वाटते.

## श्री. भालचंद्र राजाराम राजाध्यक्ष

डॉ. राजाराम ना. राजाध्यक्ष यांचे हे द्वितीय चिरंजीव. यांनी मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ् आर्ट मधील पांच वर्षांचा चित्रकलेचा अभ्यास करून डिप्लोमा घेतला. त्यांनी स्कॉलर म्हणून शिक्षण पुरें केलें. सध्यां ते मुंबईंत कमर्शियल आर्टिस्ट म्हणून काम करीत आहेत. प्रथम श्रेणींत आर्ट मास्तर म्हणून ते उत्तीर्ण झालेले होते. ' आजगांव दर्शन ' ह्या प्रस्तुत ग्रंथाचें मुखपृष्ठ त्यांनीच काढलें.

## श्री. दिनकर नारायण आजगांवकर

हे मुंबई इलाख्यांतून मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिल्या नंबरास पास झाले. पुढें बी. ए. होऊन पुढील शिक्षणासाठीं विलायतेस गेले. हल्लीं ते मुंबईंतील न्यु इंडिया इन्शुअरन्स कंपनींत मोठ्या हुद्यावर आहेत

## श्री. राधाबाई तुकाराम देसाई



श्री. राधाबाई तु. देसाई

कै. रघुनाथ फटू प्रभु आजगांवकर यांची ही कन्या व प्रस्तुत लेखकाची आत्या. आजगांवच्या शालागृहास यांनी मंगलोरी कौलें घातलीं आहेत. श्रीमती राधाबाई तु. देसाई यांनी कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि फंड, मालवण कन्याशाळा, सावंतवाडी सूतिकागृह, वालावल येथील इंग्रजी शाळा, बांधकोंड येथील मराठी शाळा, टयू- इं- स्कूल शिरोडा व इतर धर्मकार्य यांसाठीं सुमारें पंचवीस हजार रुपये खर्च केला आहे. कै. तुकाराम लक्ष्मण देसाई हे अंबाजी नानांचे (मुलीचा मुलगा) नातु. त्यांचें शिक्षण आजगांवच्या मराठी शाळेंत झालें. कांही काल ते कै. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांचे दुकानीं, सामान्य नोकर म्हणून होते. पुढें मेथाजी झाले आणि नंतर त्यांनी स्वतंत्र दुकान घातलें. आपल्या सचोटीनें व दीर्घोद्योगानें त्यांनी दुकानास स्थैर्य आणलें. ते १९४२ मध्यें कैलासवासी झाले. त्यांच्या स्मरणार्थ बांधकोंड येथें म. प्रा. शाळा चालू आहे.

## श्री. दिनानाथ अंकुश प्रभु आजगांवकर

हे हल्लीं लोकमान्य कचेरींत शद्बकोडें विभागाचे संपादक आहेत. प्रसिद्ध सावकार श्री. अंकुश रवळोबा यांचे हे चिरंजीव.

## प्रो. नारायण दत्ताराम राजाध्यक्ष एम्. ए.

हे आजगांवचे असून बेळगांव येथील राणी पार्वतीदेवी कॉलेजमध्यें प्रोफेसर होते. हल्लीं ते मुंबईच्या जयहिंद कॉलेजांत तर्कशास्त्राचे प्राध्यापक आहेत.

## श्री. पु. रा. बेहरे

हे ' नवशक्ति ' या मराठी दैनिकांत संपादकीय भागांत काम करतात. पूर्वी धनुर्धारी पत्रांत कांही दिवस होते. त्यांचें प्रा. शिक्षण आजगावीं झालें. यांनी कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत.

## श्री. पुरुषोत्तम दत्तात्रय प्रभु एम्. ए.

यांचा जन्म आजगांवांतील ढाकोरें वाडींत आपल्या आजोळीं झाला. कै. रामचंद्र हरी पंडीत हे त्यांचे आजोबा, त्यांचें प्राथमिक व इंग्रजी चार इयत्तांचें शिक्षण आजगांवच्या ए. व्ही. स्कूलमध्यें झालें. सावंतवाडी हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर त्यांनी मुंबई येथें पोर्टट्रस्टमध्यें पंधरावर्षे कारकूनी केली. १९४६ मध्यें बॉम्बे म्युच्युअल ह्या प्रसिद्ध इन्शुरन्स कंपनींत इन्स्पेक्टर म्हणून त्यांनी नोकरी धरली. हल्लीं न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनींत ते सुपरिटेंडेंट आहेत. यांनी उत्तरवयांत आपलें विश्वविद्यालयीन शिक्षण पुरें केलें.

## काळसें येथील आजगांवकर

इसवी सन १७९० या सुमारास आजगांवच्या प्रभु मतकरी घराण्यांतील एक पुरुष लक्ष्मण, काळसें येथें स्थायिक झाला. ब्रिटिश राजवटीची सुरवात व पेशवाईचीं अखेर अशा संधी कालांत कै. नारायण लक्ष्मण आजगांवकर यांनी, काळसें येथें तेथील स्थानिक लोकांची मर्जी संपादन करून व सरकार दरबारांतील त्यांचीं कामें करून देऊन, देणगी म्हणून जमीन मिळविली. या घराण्यांतील कांहीं पुरुष मालवण, रत्नागिरी, मुंबई येथें विविध क्षेत्रांत नांव लौकिक मिळवून आहेत.

## श्री. लक्ष्मण नारायण प्रभु आजगांवकर

रत्नागिरीच्या लायब्ररींत शिपाई म्हणून नोकरी व शिक्षण करून हुजूर डेप्युटी कलेक्टरच्या हुद्यावर गेले. विद्यावृद्धि समाजाचे ते पहिले अध्यक्ष. यांचे बंधु वासुदेवराव मामलेदार होते.

## श्री. अच्युत नारायण आजगांवकर

हे पहिले बी. ए. असून कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें सहाध्यायी होत. राजकोट येथील राजकुमार विद्यालयांत ते अध्यापक होते. कै. अच्युतरावांचे नातू **श्री. वि. अ. आजगांवकर** मालवण येथील कन्याशाळेचे व ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल आहेत.

## डॉ. राजाराम वासुदेव आजग कर

मालवण येथें प्रसिद्ध डॉक्टर आहेत. हे विद्या व कला यांचे भोक्ते आहेत.

## श्री. कमलाकर नारायण प्रभु आजगांवकर

हे लक्ष्मण नारायणचे नातु होत. हे बी. ए. असून रत्नागिरीस ऑनररी. मॅजिस्ट्रेट होते. सध्या काँट्रॅक्टर आहेत स्वभावानें प्रेमळ व दानशूर आहेत. कमलाकर पंतांची बहीण **डॉ. सीताबाई** ह्या सुविद्य असून वरिष्ठ विधानसभेच्या सभासद आहेत. रत्नागिरी येथील दोन घराण्यांपैकीं श्री. माधवराव रेव्हिन्यू खात्यांत होते. श्री. केशवराव हे रेव्हिन्यू खात्यांत हेड अकौंटंट होते.

## कै. विनायक वासुदेव उर्फ भाऊसाहेब आजगांवकर

हे टोपीवाला हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. यांनी भौगोलिक विषयाचें बरेंच लेखन केलें असून, त्या विषयाचे तज्ञ म्हणून त्यांचें नांव घेतलें जातें.

## प्रो. नारायण दत्ताराम राजाध्यक्ष एम्. ए.

हे आजगांवचे असून बेळगांव येथील राणी पार्वतीदेवी कॉलेजमध्यें प्रोफेसर होते. हल्लीं ते मुंबईच्या जयहिंद कॉलेजांत तर्कशास्त्राचे प्राध्यापक आहेत.

## श्री. पु. रा. बेहरे

हे 'नवशक्ति' या मराठी दैनिकांत संपादकीय भागांत काम करतात. पूर्वी धनुर्धारी पत्रांत कांही दिवस होते. त्यांचें प्रा. शिक्षण आजगावीं झालें. यांनी कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत.

## श्री. पुरुषोत्तम दत्तात्रय प्रभु एम्. ए.

यांचा जन्म आजगांवांतील ढाकोरें वाडींत आपल्या आजोळीं झाला. कै. रामचंद्र हरी पंडीत हे त्यांचे आजोबा, त्यांचें प्राथमिक व इंग्रजी चार इयत्तांचें शिक्षण आजगांवच्या ए. व्ही. स्कूलमध्यें झालें. सावंतवाडी हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर त्यांनी मुंबई येथें पोर्टट्रस्टमध्यें पंधरावर्षे कारकूनी केली. १९४६ मध्यें बॉम्बे म्युच्युअल ह्या प्रसिद्ध इन्शुरन्स कंपनींत इन्स्पेक्टर म्हणून त्यांनी नोकरी धरली. हल्लीं न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनींत ते सुपरिटेंडेंट आहेत. यांनी उत्तरवयांत आपलें विश्वविद्यालयीन शिक्षण पुरें केलें.

## काळसें येथील आजगांवकर

इसवी सन १७९० या सुमारास आजगांवच्या प्रभु मतकरी घराण्यांतील एक पुरुष लक्ष्मण, काळसें येथें स्थायिक झाला. ब्रिटिश राजवटीची सुरवात व पेशवाईचीं अखेर अशा संधी कालांत कै. नारायण लक्ष्मण आजगांवकर यांनी, काळसें येथें तेथील स्थानिक लोकांची मर्जी संपादन करून व सरकार दरबारांतील त्यांचीं कामें करून देऊन, देणगी म्हणून जमीन मिळविली. या घराण्यांतील कांहीं पुरुष मालवण, रत्नागिरी, मुंबई येथें विविध क्षेत्रांत नांव लौकिक मिळवून आहेत.

## श्री. लक्ष्मण नारायण प्रभु आजगांवकर

रत्नागिरीच्या लायब्ररींत शिपाई म्हणून नोकरी व शिक्षण करून हुजूर डेप्युटी कलेक्टरच्या हुद्यावर गेले. विद्यावृद्धि समाजाचे ते पहिले अध्यक्ष. यांचे बंधु वासुदेवराव मामलेदार होते.

## श्री. अच्युत नारायण आजगांवकर

हे पहिले बी. ए. असून कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें सहाध्यायी होत. राजकोट येथील राजकुमार विद्यालयांत ते अध्यापक होते. कै. अच्युत-रावांचे नातू **श्री. वि. अ. आजगांवकर** मालवण येथील कन्याशाळेचे व ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल आहेत.

## डॉ. राजाराम वासुदेव आजग कर

मालवण येथें प्रसिद्ध डॉक्टर आहेत. हे विद्या व कला यांचे भोक्ते आहेत.

## श्री. कमलाकर नारायण प्रभु आजगांवकर

हे लक्ष्मण नारायणचे नातु होत. हे बी. ए. असून रत्नागिरीस ऑनररी. मॅजिस्ट्रेट होते. सध्या कॉंट्रॅक्टर आहेत स्वभावानें प्रेमळ व दानशूर आहेत. कमलाकर पंतांची बहीण डॉ. **सीताबाई** ह्या सुविद्य असून वरिष्ठ विधानसभेच्या सभासद आहेत. रत्नागिरी येथील दोन घराण्यांपैकीं श्री. माधवराव रेव्हिन्यू खात्यांत होते. श्री. केशवराव हे रेव्हिन्यू खात्यांत हेड अकौंटंट होते.

## कै. विनायक वासुदेव उर्फ भाऊसाहेब आजगांवकर

हे टोपीवाला हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. यांनी भौगोलिक विष-याचें वरेंच लेखन केलें असून, त्या विषयाचे तज्ञ म्हणून त्यांचें नांव घेतलें जातें.

## डॉ. श्रीधर शांताराम प्रभु आजगांवकर

D, O.. D. L. O. ( Vienna )
L. M. ( Dublin )



डॉ. आजगांवकर यांचा जन्म १७ जून १९०६ मध्यें मालवण येथें झाला. १९२३ मध्यें ते टोपीवाला हायस्कूल मधून मॅट्रिक झाले. उच्च वैद्यकीय शिक्षणासाठीं १९३७ मध्यें ते युरोपला व्हिएन्ना येथें गेले होते. गेलीं सहा वर्षें डायबेटीस स्पेशालिस्ट म्हणून जे. जे. हॉस्पिटल मध्यें काम करीत आहेत. गेल्या जून महिन्यांत मुंबई सरकारनें त्यांच्या कार्याची पहाणी करून मधुमेह विषयक क्लिनिक स्वतंत्ररीत्या काढावयाचें ठरविलें. त्या ठिकाणी डॉ. आजगांवकर यांची सरकारनें नेमणूक केली आहे अशाप्रकारचें मुंबई इलाख्यांतील हें पहिलेच क्लिनिक होय.

डॉ. आजगांवकर यांना सामाजिक कार्याची विशेष आवड आहे. १९३३–३७ पर्यंत मालवण नगरपालिकेचे ते सभासद होते. त्यांनी अनेक कमिट्यांवर चेअरमन म्हणून काम केलें आहे. टोपीवाला हायस्कूल या शिक्षणसंस्थेच्या मॅनेजिंग कमिटीवर ते १२ वर्षे होते. त्या कमिटीवर त्यांनी चार वर्षे चेअरमन म्हणून काम केलें. यूरोपमध्यें असतांना 'अमेरिकन मेडिकल असोसिएशन व्हिएन्ना' या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे ते सभासद होते. डब्लिन येथील 'भारतभुवन' या संस्थेच्या कार्यांत त्यांचा विशेष भाग होता. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या, 'बॉंबे प्रॉव्हिन्शियल कौन्सिल मुंबई' या संस्थेचे ते सभासद असून दादरच्या ज्योत्स्ना मंडळाचे अध्यक्ष व कुडाळदेशस्थ गौड ब्राम्हण विद्यावृद्धि समाजाचे ते व्हाईस चेअर-

मन आहेत. त्यांचा स्वभाव परोपकारी व प्रेमळ असून स्वज्ञातियांत त्यांना विशेष मान आहे. वैद्यकीय विषयाला वाहिलेल्या इंग्रजी नियतकालिकांतून त्यांचे मधुमेहविषयक लेख प्रसिद्ध होत असतात.

डॉ. आजगांवकर यांचा मोठा मुलगा विजय मेडिकलच्या ४ थ्या वर्षांत शिकत आहे. दुसरा चंद्रशेखर बी. कॉम. होऊन, चार्टर्ड अकाउन्टंटचें शिक्षण घेत आहे. डॉ. आजगांवर यांचे धाकटे बंधू श्री. मुरलीधरपंत हे हायकोर्टमध्यें अॅडव्होकेट म्हणून काम करतात. दुसरे वसंतराव स्वतंत्र व्यवसायांत असून तिसरे जनार्दनपंत व चुलतबंधु मोरेश्वर हे इन्कमटॅक्स एक्सपर्ट म्हणून काम करीत आहेत व ते बी कॉम. आहेत.

## श्री. पुरुषोत्तम तुकाराम आजगांवकर

श्री. पुरुषोत्तम तुकाराम ऊर्फ दादासाहेब आजगांवकर यांचें नांव पालघर भागांत सर्वश्रुत आहे. श्री. दादासाहेब स्वभावानें करारी, स्पष्ट-वक्ते, व धडाडीचे गृहस्थ असून सामाजिक कार्यासाठीं त्यांनी आतांपर्यंत सढळ हस्तानें मदत केलेली आहे. त्यांचें वय आज पंचावन वर्षांचें असून एक वजनदार व्यापारी म्हणून ते ओळखले जातात. त्यांचे वडील कै. तुकारामपंत हे गोवेरीहून पालघर येथें १९०७ च्या सुमारास आले. १९२० पासून त्यांनी गवताचा धंदा सुरू केला. १९३५ मध्यें ते निवर्तले. त्यांनी नांवारूपास आणलेला गवताचा व्यापार पुढें दादासाहेबांनी वाढविला. यांचे बंधु ज्ञानदेव स्वतंत्रपणें व्यापारधंदा करतात. दुसरे बंधु श्री. अच्युतराव पालघर येथेंच असून श्री. दादासाहेबांना त्यांच्या धंद्यांत मदत करतात. बागलाची राय येथें जें मतकरी आजगांवकर घराणें स्थाईक झालें, त्या घराण्यांतील हे होत.

## श्री. रघुनाथ काशिनाथ मित्र आजगांवकर



श्री. रघुनाथ काशिनाथ मित्र

हे बी. ए., एल एल बी, असून १९४७ सालीं आफ्रिकेला गेले. ब्रिटिश ईस्ट आफ्रिकेंत मोंबासा येथें ते वकिली करीत असून एक नामांकित वकील म्हणून त्यांचा लौकिक आहे. १९१८ मध्यें ते मुंबई येथें जन्मले. त्यांच्या जन्मानंतर दोनच वर्षांनी त्यांचें पितृछत्र नाहींसें झालें. असें असलें तरी त्यांचे चुलते श्री. दामोदर रघुनाथ मित्र आजगांवकर यांनी सर्व जबाबदारी उत्तम रीतीनें सांभाळली, ते मॅट्रिक मध्यें मुंबई इलाख्यांत पहिले आले. एल्फिन्स्टन कॉलेज मधून बी. ए. झाल्यावर त्यांनी वकिलीची परीक्षा दिली.

**श्री. मालती का. मित्र**– १९०७ मध्यें जन्म झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षें त्यांनी मासिक मनोरंजनचें संपादन केलें. त्या बी. ए., बी. टी. असून अलेक्झांड्रा गर्ल्स स्कूलमध्यें संस्कृत अध्यापिका आहेत.

श्री. लीला मित्र (सौ. लीला दत्तात्रय धोपेश्वरकर) ह्या एम् अे; बी. टी. असून यांचीं पुणें रेडिओ केंद्रावरून वाङ्मयविषयक भाषणें होतात. ह्या विविध विषयांवर व्यासंगपूर्ण लेखन करीत असतात.

श्री. कुमुदिनी मित्र- ह्या एम. अे., बी. टी. असून अंधेरी गर्ल्स हायस्कूलमध्यें व्हाईस प्रिन्सिपॉल आहेत.

श्री. इंदु मित्र- ह्या बी. ए., बी.टी. असून शिक्षिका आहेत.

श्री. भानू मित्र- ह्या मॉंटेसरी ट्रेंड असून सरस्वती हायस्कूलमध्यें शिक्षिका आहेत.

## आझाद हिंद सेनानी श्री. जगन्नाथराव भोसले



सेनापति जगन्नाथराव भोसले

भारत सरकारच्या पुनर्वसाहत खात्याचे हे हल्लीं उपमंत्री आहेत. त्यांचें लष्करी शिक्षण, डेहराडून व सॅण्डहर्स्ट येथें झालें. सिंगापूरच्या पाडावाच्या वेळीं ते लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यावर होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे ते उजवे हात. आझादहिंद फौजेचे चीफ् ऑफ् स्टाफ् व लष्करी मंत्री म्हणून त्यांनी काम केलें होतें. कांहीं काल लाल किल्ल्यांत ते अटकेंत होते. पुढें सरकारनें त्यांची मुक्तता केली. आझादहिंद सैनिकांस उपजीविकेचीं साधने उपलब्ध करून देण्यास त्यांचे प्रयत्न कारणीभूत आहेत. निर्वासितांच्या पुनर्वसाहतीच्या प्रश्नास त्यांनी चांगला हातभार लावला आहे. १९५१ च्या निवडणुकींत ते प्रचंड बहुमतानें लोकसभेवर निवडून आले. त्यांचा स्वभाव निगर्वी, प्रेमळ असून भारताच्या उत्कर्षासाठीं झटणाऱ्यांपैकीं ते एक आहेत. त्यांचा जन्म आजगांव

# श्री. रघुनाथ काशिनाथ मित्र आजगांवकर


श्री. रघुनाथ काशिनाथ मित्र

हे बी. ए., एल एल बी, असून १९४७ सालीं आफ्रिकेला गेले. ब्रिटिश ईस्ट आफ्रिकेंत मोंबासा येथें ते वकिली करीत असून एक नामांकित वकील म्हणून त्यांचा लौकिक आहे. १९१८ मध्यें ते मुंबई येथें जन्मले. त्यांच्या जन्मानंतर दोनच वर्षांनी त्यांचें पितृछत्र नाहींसें झालें. असें असलें तरी त्यांचे चुलते श्री. दामोदर रघुनाथ मित्र आजगांवकर यांनी सर्व जबाबदारी उत्तम रीतीनें सांभाळली, ते मॅट्रिक मध्यें मुंबई इलाख्यांत पहिले आले. एल्फिन्स्टन कॉलेज मधून बी. ए. झाल्यावर त्यांनी वकिलीची परीक्षा दिली.

**श्री. मालती का. मित्र**- १९०७ मध्यें जन्म झाला वडिलांच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षें त्यांनी मासिक मनोरंजनचें संपादन केलें. त्या बी. ए., बी. टी. असून अलेक्झांड्रा गर्ल्स स्कूलमध्यें संस्कृत अध्यापिका आहेत.

श्री. लीला मित्र ( सौ. लीला दत्तात्रय धोपेश्वरकर ) ह्या एम् ए; बी. टी. असून यांचीं पुणें रेडिओ केंद्रावरून वाङमयविषयक भाषणें होतात. ह्या विविध विषयांवर व्यासंगपूर्ण लेखन करीत असतात.

श्री. कुमुदिनी मित्र- ह्या एम. ए., बी. टी. असून अंधेरी गर्ल्स हायस्कूलमध्यें व्हाईस प्रिन्सिपॉल आहेत.

श्री. इंदु मित्र- ह्या बी. ए., बी.टी. असून शिक्षिका आहेत.

श्री. भानू मित्र- ह्या मॉंटेसरी ट्रेंड असून सरस्वती हायस्कूलमध्यें शिक्षिका आहेत.

## आझाद हिंद सेनानी श्री. जगन्नाथराव भोसले



सेनापति जगन्नाथराव भोसले

भारत सरकारच्या पुनर्वसाहत खात्याचे हे हल्लीं उपमंत्री आहेत. त्यांचें लष्करी शिक्षण, डेहराडून व सॅण्डहर्स्ट येथें झालें. सिंगापूरच्या पाडावाच्या वेळीं ते लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यावर होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे ते उजवे हात. आझादहिंद फौजेचे चीफ् ऑफ् स्टाफ् व लष्करी मंत्री म्हणून त्यांनी काम केलें होतें. कांहीं काल लाल किल्ल्यांत ते अटकेंत होते. पुढें सरकारनें त्यांची मुक्तता केली. आझादहिंद सैनिकांस उपजीविकेचीं साधने उपलब्ध करून देण्यास त्यांचे प्रयत्न कारणीभूत आहेत. निर्वासितांच्या पुनर्वसाहतीच्या प्रश्नास त्यांनी चांगला हातभार लावला आहे. १९५१ च्या निवडणुकींत ते प्रचंड बहुमतानें लोकसभेवर निवडून आले. त्यांचा स्वभाव निगर्वी, प्रेमळ असून भारताच्या उत्कर्षासाठीं झटणाऱ्यांपैकीं ते एक आहेत. त्यांचा जन्म आजगांव

तिरोडें येथें प्रसिद्ध सरदार घराण्यांत झाला. प्रस्तुत लेखकानें त्यांचें स्वतंत्ररित्या लिहिलेलें चरित्र प्रसिद्ध झालें असून त्यांत त्यांच्या कार्याची विशेष माहिती दिली आहे.

## श्री. स. फ. प्रभु आजगांवकर

श्री. आजगांवकर यांनी प्रस्तुत ग्रंथ लेखनास बराच हातभार लावला. त्यांचें प्रा. शिक्षण बांदा ( सावंतवाडी ) येथील ए व्ही. स्कूलमध्यें झालें. सावंतवाडीच्या कळसुलकर हायस्कूल मधून ते मॅट्रिक झाले. कांहीं काल रत्नागिरी येथें पोस्टल क्लार्क म्हणून काम केलें. कांहीं वर्षें भारतीय तार खात्यांत एक हुषार टेलिग्राफिस्ट म्हणून त्यांनी काम केलें आहे. पुढें ही नोकरी सोडून त्यांनी शिक्षण खात्यांत नोकरी पत्करली. विनोदी वक्ते आणि विनोदी लेखक म्हणून ते खात्रीनें पुढें येतील. शिक्षण व मानसशास्त्राचा त्यांचा व्यासंग उल्लेखनीय आहे. त्यांचा विनोदी लेखांचा संग्रह लौकरच प्रसिद्ध होणार आहे.

## श्री. श्रीकृष्ण अनन्त प्रभु आजगांवकर

यांचा जन्म ११ मे १९१२ रोजीं काळसें येथें झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण काळसें येथेंच झालें. १९३० सालीं टोपीवाला हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर १९३३ मध्यें ते जी. डी. ए. झाले. पुढें बेल अँड कंपनींत ते हुद्यावर होते. नंतर १९४३ मध्यें कंकॉर्ड ऑफ इंडिया इन्शुरन्स कंपनींत अकाऊन्टंट म्हणून ते राहिले. तूर्त दादरला शारदाश्रमांत ते रहातात.

## कु. मनोरमा नारायण प्रभु राळकर

आजगांव-ढाकोरें येथील श्री. नारायणराव राळकर यांची ही कन्या. मुंबई नगरपालिकेंत प्राथमिक शिक्षिकेचा व्यवसाय. प्रा. शिक्षण आजगांवच्या मराठी शाळेंत झालें. मुंबईच्या चिकित्सक समूहमधून मॅट्रिक वनिता विनयालयांतून पुढें ट्रेंड झाल्या. शिक्षण क्षेत्रांत स्वतंत्ररित्या संशोधनात्मक कार्य करण्याची यांची मनिषा असून प्रस्तुत ग्रंथलेखनास त्यांचें साह्य झालें.

## श्री. मुरारी लक्ष्मण परब

आजगांव देवस्थानच्या बाबतींत दुसरा मान अग्रसणांत रहाणाऱ्या अग्रसणकर मराठा घराण्यास आहे. या घराण्याचा मूळ पुरुष दादे परब. या घराण्यांतील एक विद्यमान व्यक्ति श्री. मुरारी लक्ष्मण परब यांचा जन्म डिसेंबर १८९७ मध्यें आजगांवीं झाला. वयाच्या विसाव्या वर्षापासून त्यांनी गांवकींत भाग घेण्यास सुरवात केली. ते १९४२ पर्यंत सात वर्षें पोलीस पाटील होते.

## श्री. दत्तोबा यशवंत वराडकर

आजगांवांतील आदर्श शेतकरी म्हणून श्री. दत्तोबा उर्फ दत्तो कृष्णाजी यांचें नांव घेतलें जातें. मातीच्या भिंती घालण्यांत यांच्या एवढा कुशल माणूस इकडील भागांत दुसरा मिळणार नाहीं.

## आजगांवचीं चित्पावन ब्राह्मण घराणीं

श्री. ना. गो. चापेकर यांनी लिहिलेल्या ' चित्पावन ' नांवाच्या ग्रंथावरून चित्पावन ब्राह्मण कुलें हीं सर्व रत्नागिरी जिल्ह्यांतीलच होत असें दिसतें. या कुलांचे वास्तव्याचे असे जे मूळ गांव आहेत त्यांत आजगांव हा प्रमुख गांव होय. पैकीं आज बाहेर असूनही परंपरेप्रमाणें ज्या कुळांतून आजगांवांतील देवतांस वार्षिक नैवेद्य दाखविला जातो तीं कुलें मूळ आजगांवचीं असें समजावें. कांहीं कुलें आजगांवच्या सर्व देवतांस व कांहीं आजगांवच्या ठराविक देवतांस नैवेद्य दाखवितात. श्रीदेव वेताळ व रवळनाथ यांस भजणारीं कुलें ज्याप्रमाणें आजगांवचींच, त्याचप्रमाणें श्रीसर्वेश्वर श्रीआदित्यनाथ, श्रीभूमिकादेवी, घोडेमूख यांस पूजणारीं कुलें मूळ आजगांवचीं यांत शंका नाहीं.

कोंकणची भूमि मूळ परशुरामानें लागवडीखालीं आणली. या कामीं म्हणजे परशुराम ही भूमि खणून काढीत असतां ती साफसूफ करण्यासाठीं ज्या ब्राह्मण कुलांनीं मदत केली त्यांना चित्पावन हें नामाभिधान प्राप्त झालें. यापैकीं कांहीं कुलें श्रीवाडेश्वर आपलें कुलदैवत मानतात व त्यांची मूळ

वस्ती गुहागर, चिपळूण, राजापूर वगैरे भागांत होतीं. एक गोष्ट खरी कीं, आजगांव हा चित्पावनांचा बालेकिल्ला होता. या कुलांतील बहुतेक पुरुष वेदशास्त्रसंपन्न आणि विद्वान होते. हीं घराणीं पेशवाईच्या ऐन कालांत वेदविद्येला मान असल्यामुळें महाराष्ट्रीय संस्थानिकांच्या आश्रयास जाऊन राहिलीं. त्यांत कित्येक घराणीं कोल्हापूर, ग्वाल्हेर, धार, अिचलकरंजी, नागपूर, पुणें, कुरुंदवाड वगैरे ठिकाणीं वास्तव्य करून राहिलीं. सर्व आपट्यांचा मूळ पुरुष आजगांवचाच ही गोष्ट सिद्ध झाली आहे. पलुस्कर-गाडगीळ हेही आजगांवचेच. ब्रेहरे, काकतकर, दातार, गोखले, मराठे, गोगटे, नातु, ताम्हणकर, भुस्कुटे, दामले, पेंडसे, पटवर्धन, भिडे, काळे, मोडक, बापट, नाटेकर, डोंगरे अित्यादि घराणीं आजगांवांत होतीं. या घराण्यांचे कुलवृत्तांत जर स्वतंत्रपणें लिहिले गेले तर त्यामुळें पुष्कळच फायदा होईल. वरील कुलांतून श्रीदेव वेताळ व रवळनाथ यांस भजणारीं अनेक घराणीं आज महाराष्ट्रांत व बाहेर विखुरलेलीं असून तीं मूळ आजगांवचीं होत.

# आजगांवचें गाडगीळ घराणें

आजगांव येथील गाडगीळ घराणें हें येथील पहिल्या ब्राह्मण वसाहतीमधील श्रेष्ठ घराणें आहे. या गावांतील या घराण्याच्या चार शाखा माहितींत आहेत.

(१) ढाकोरें वाडींतील घराणें आज गावांत विद्यमान नाहीं. या घराण्यानें आपली कांहीं मिळकत येथील काकतकर यांचे श्रीदत्त देवस्थानास अर्पण केली आहे. येथील गाडगीळ घराण्याची एक शाखा, वेंगुर्लें-भटवाडींत 'जोशी' आडनांवानें नांदत आहे. या बाजूच्या बहुतेक गावांत कोंकणस्थ ब्राह्मणांकडे सदर जोशी यांना जोशीपणाचा हक्क आहे. लग्नकार्यांत घटिकायंत्राची स्थापना करणें, मुहूर्त पत्रिका पूजन करविणें व वाचणें, आणि योग्यवेळीं मुंजी व लग्न लावणें हें काम जोशी करतात. शिवाय दरसाल वर्षफल व संक्रांतिफळ वाचणें इ॥ कामें ते करतात. पूर्वीं सदर जोशी स्वतः पंचांग करून तीं प्रत्येकाला पुरवित असत.

(२) देऊळवाडा व मारेळवाडा येथील एकाच गाडगीळ घराण्याच्या जमिनींत श्रीदेव वेताळ, श्रीदेवी सातेरी व श्रीदेव रवळनाथ यांचीं देवस्थानें आहेत. आजगांव देवस्थानचीं ब्राह्मणांकडून व्हावयाचीं सर्व कामें गाडगीळ यांनीं पुढाकारानें करावयाचीं असतात. उदा०— श्रीदेवाची स्थापना, पुनः प्रतिष्ठा व समाराधना वगैरे. गाडगीळ घराण्याचा अधिपति पुरुष म्हणून एक पाषाणी मूर्ती, श्रीदेव वेताळ मूर्तीच्या डाव्या अंगास असून तिची पूजा-अर्चा ब्राह्मणामार्फत आजहि होत असते.

श्रीदेव रवळनाथ व श्रीदेव आदित्यनाथ यांचेकडील ब्राह्मणांच्या पाषाणी मूर्तीदेखील गाडगीळ यांच्या आहेत. या घराण्यांतील व्यक्ति आतां आजगावांत कोणी नाहींत. या कुळांत कोणी एक उत्तम सूर्योपासक ब्राह्मण होता. त्याला जवळच्या रेडी गांवांतील एका कोळचानें देवाच्या दृष्टांतानुसार एक उत्तम धातुमय तांबूस पाषाणाची तेजस्वी श्रीसूर्यनारायणाची मूर्ती आणून दिली. ही मूर्ती कोळचाला समुद्रांत मासे मारतांना जाळचांत मिळाली, असें म्हणतात.

(३) भटवाडीमधील गाडगीळ घराण्यांत 'अग्निहोत्री' ब्राह्मण होऊन गेले. त्यावरून त्यांना 'अग्निहोत्री' हेंच आडनांव पडलें. या घराण्याकडे या भागाचे 'धर्माधिकारी' म्हणून श्रीशंकराचार्य पीठ संकेश्वर व करवीर यांचेकडून अधिकार होता. या घराण्याकडे एक उत्तम मुरलीधर मूर्ती होती. तिच्या योग्य सेवेच्या अभावीं ती आज जमिनींत पुरून गेली आहे. या मूर्तीच्या प्रसादानें या घराण्याची चांगली भरभराट झाली होती. आतां सदर घराण्यांतील एक जोडपें गांवांत फक्त नांवाला आहे. गाडगीळ यांची जमीन वगैरे त्यांच्याकडे कांहीं नाहीं.

(४) आजगांवांतील मळेवाड या भागांत गाडगीळ घराणें आज विद्यमान असून तेथें त्यांनीं श्रीदत्त देवस्थान उभारलें आहे.

आजगांवांतील ऋग्वेदी कोकणस्थ ब्राह्मणांचें पुरोहितपण गाडगीळ घराण्याकडे होतें. येथील बेहेरे महाजन यांचेंहि पुरोहित गाडगीळच. या घराण्यांत पूर्वी उत्तम वैदिक व याज्ञिक ब्राह्मण होऊन गेले आहेत. इकडून

६

दुसऱ्या गांवीं, रत्नागिरी जिल्ह्यांत व वरघांटीं महाराष्ट्रांत वगैरे बाहेर पुष्कळ ठिकाणीं गाडगीळ वंश पसरला आहे. गायनाचार्य विष्णु दिगंबर पलुस्कर आजगांवचे गाडगीळच. बाहेर आज या घराण्यांत दशग्रंथी सनातनी ब्राह्मण व आंग्ल विद्याविभूषित विद्वान् माणसें विद्यमान् असून बहुतेक सुस्थितींत आहेत. श्री. केशव जनार्दन गाडगीळ हे कै. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे चुलत पुतणे होत. श्री. केशवरावजींचे वडील श्री. जनार्दनपंत उत्तम गवई आहेत. पूर्वी कुरुंदवाड दरबारचे ते गवई होते.

## नातू घराणें

आजगांवांतील ढाकोरे वाड्यांत पूर्वी चित्पावन घराणीं वास्तव्य करून होतीं. त्यांनीं बागायती व भरडी जमीन लागवडीखाली आणली होती. पैकीं एक नातू घराणें आजहि येथें नांदत आहे. यांचें गोत्र वसिष्ठ असून शाखा हिरण्यकेशी आहे.

ठाकोरें येथील प्राचीन देवता श्रीलक्ष्मीनारायण असून आजची पाषाण-मूर्ती सुमारें ७०० वर्षांपूर्वींची असावी, असें तिच्या शिल्पावरून वाटतें. ढाकोरें येथील चित्पावन घराणीं हाच देव आपलें आराध्य दैवत मानतात. या देवस्थानच्या लगतच पलिकडे नारायण तळ्याच्या बाजूस नातू वठारांत नातूंचें मूळ घराणें आज नांदत आहे. ह्या घराण्यांतील पुरुष सात्विक वृत्तीनें रहाणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. कांही पुरुष तपस्वी बनून बैरागी म्हणून तीर्थयात्रा करीत अज्ञात झाले आहेत.

सुमारें ७०० वर्षांपूर्वी आजगांव येथील डोंगरांत या घराण्यांतील भक्तांसाठीं 'गंगावतरण' झालें असून त्या नातू ब्राह्मणानें आपली काशी-रामेश्वर-यात्रा येथें पूर्ण केली. सदर स्थानें आज 'गंगेचें आडवन' व 'रामेश्वर भाटलें' या नावानें प्रसिद्ध आहेत. या देवस्थानकडे होणारी समाराधन I नातूशिवाय होत नव्हती. श्रीशांतादुर्गा देवीची मूर्ती मुसलमानांच्या धाडीच्या वेळीं दडविण्यांत आली होती. तिच्या दृष्टांताप्रमाणें बेहेरे घराण्यानें तिची स्थापना 'वाकाड' या भागांत केली. त्यांत नातूंचा भाग होता. पूर्वीपासून आजवर होणाऱ्या आजगांवच्या सामुदायिक कामगिरींत नातूंनीं वेळोवेळीं

भाग घेतला आहे. या घराण्यांतील श्री. अनंत गोपाळ नातू हे आजगांवीं राहून ज्योतिषी-व्यवसाय करतात. यांचे बंधु श्री. विष्णु गोपाळ नातू हे एक नामवंत शिक्षक आहेत.

नातू घराण्यांत, एक पतिव्रता स्त्री, सुमारें दीडशें वर्षांपूर्वीं सती गेली होती. तिचा वंश पुढें सांगली येथें वास्तव्य करून राहिला. पहिला पुरुष विष्णु, त्याचा मुलगा लक्ष्मण, लक्ष्मणास विष्णु, त्यास वासुदेव, वासुदेवाचा पुत्र शंकर, हा चालू पुरुष. हे सर्व पुरुष वेदविद्यापारंगत होते व आहेत. चालू पिढीपर्यंत या घराण्यांत वैदिक अग्निहोत्री यज्ञयाग परंपरेनें चालत आले आहेत. विद्यमान शंकरशास्त्री नातू दीक्षित हे वेदशास्त्रसंपन्न असून त्यांचा मुलगा महादेव वैदिक शिक्षण घेत आहे. यांचे चुलत भाऊबंद असून त्यांच्यांत वेदशास्त्रसंपन्न पुरुष होऊन गेले. यांचें कुलदैवत आजगांवचा वेताळेश्वर आहे.

## आजगांवचे आपटे घराणें

(योद्धे, तपस्वी, विद्वान् व थोर साहित्तिक प्रसवणारें घराणें)

सर्व आपट्यांचा मूळ पुरुष आजगांव येथील विश्वनाथभट होत. यांस दोन पुत्र, महादेवभट व कृष्णंभट. महादेवभटाचा वंश आजगांव येथें असून कृष्णभटाचा वंश मालवणनजिक त्रिंबक येथें आहे. आजगांव येथील महादेवभटास विश्वनाथभट व विश्वनाथभटास महादेवभट हे पुत्र. महादेवभटास पुत्र चार. भास्करभट, पद्मनाभभट, कृष्णभट व गणेशभट. भास्करभटास सुकंभट व बापुभट असे दोन पुत्र. बापुभटास कृष्ण व नारायण, नारायणास लक्ष्मण व भास्कर; भास्करभटास विष्णुभट, लक्ष्मणभट व बापुभट आणि विष्णुभटास बाळकृष्ण व नारायण असे पुत्र होत. ह्या नारायण ऊर्फ नारो विष्णू आपटे यांनीं स्वपराक्रमानें आपलें नांव इतिहासांत अमर ठेविलें आहे. नारायणाचे वडील विष्णुभट आपटे हे आजगांवहून शके १७०० च्या सुमारास मिरज येथें आले. नारायण वयानें १६ वर्षांचा झाला, तेव्हां तो सांगलीकर सरदारांजवळ शागीर्द म्हणून राहिला. ही नोकरी करीत असतांनाच कांहीं पुंड मंडळी जमवून रात्रींच्या वेळीं तो लुटमारीचा धंदा करीत असे.

एके दिवशीं रात्रीं सुमारें दोन हजार लोक बरोबर घेऊन श्री. नारो विष्णु आपटे यांनीं बेळगांवचा किल्ला मोठ्या चातुर्यानें ताब्यांत घेतला. पुढें त्यांचें प्रस्थ फारच वाढलें. श्रीमंत शेवटचे बाजीराव पेशवे यांनीं त्यांस समक्ष बोलावून घेऊन आपल्या पदरीं ठेवलें. इ. स. १८१७ मध्यें त्यांच्या ताब्यांत १५ हजार फौज होती. याच सालीं कोरेगांवच्या लढाईंत सरदार नारो विष्णु व सेनापती बापु गोखले हेच मुख्य होते.

पेशवाई बुडण्याच्या शेवटच्या धामधुमींत श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या संरक्षणार्थ सरदार नारो विष्णु आपटेंची निवड झाली होती. पुढे ब्रह्मावर्ताहून श्रीमंतांनीं सरदारांची व्यवस्था करण्याबद्दलचें पत्र दौलतराव शिंद्यास पाठविलें. शिंद्यांनीं सरदार नारो विष्णु यांस मोठ्या थाटानें दरबारांत आणून शके १७३९ मध्यें नारो विष्णु पेशवाईंतील हुद्द्यासह बावन्न पागेवरचे मुख्याधिकारी झाले व त्यांना "सरदार नारो विष्णु आपटे" हें दरबारी नांव बहाल करण्यांत आलें. सरदार दौलतराव शिंद्यांच्या मृत्युनंतर जनकोजीराव शिंद्यांस गादी मिळवून देण्यांत त्यांनीं बरेच परिश्रम घेतले. त्याबद्दल त्यांचा थाटाचा सत्कार होऊन त्यांना ग्वाल्हेर येथें त्यांचा पूर्वीचा हुद्दा बहाल करण्यांत आला.

जनकोजीराव शिंद्यांच्या कारकीर्दींत सरदार नारो विष्णु माळवा प्रांताचे सुभायतीवर होते. सुभायतीवर असतांना सोंदे नांवाच्या आडदांड लोकांचा बंदोबस्त केल्याबद्दल खातरजमा होऊन जनकोजीरावांनीं त्यांना दिवाणगिरीचे कामावर नेमलें. शके १७५५ त "रावराजे समशेर बहाद्दर" हा किताब देऊन दरबारांत उजवे बाजूचा मान व पुरी ताजीम, पांच पाच्यांचीं वस्त्रें व कंठी शिरपेंच याप्रमाणें बहुमान केला. शके १७६३ मध्यें अहमदनगर जिल्ह्यांतील लिपण व दंडे हे दोन गांव जहागीर देऊन वंशपरंपरेची सनद त्यांना मिळाली. पुढें कांहीं दिवस सरदार नारो विष्णु इंदोर दरबारतर्फें वकील होते. शके १७६५त सरदार नारो विष्णू आपटे रावराजे समशेर बहाद्दर हे इंदोर येथें कैलासवासी झाले.

सरदार नारो विष्णू यांना दोन पुत्र. पहिले हरिपंत ऊर्फ बाबासाहेब व दुसरे विठ्ठलपंत ऊर्फ भाऊसाहेब बाबासाहेव आपटे यांना शके १७४२ त दौलतराव शिंद्यांनीं स्वतःकडे नोकरीवर दाखल करविलें व पुढें १७६७ त त्यांना त्यांची वडिलार्जित सरदारकी बहाल करण्यांत आली. १७८३ त जयाजीराव शिंद्यांनीं लासूर व खेतोखेडी हें गांव जहागीर देऊन वंश-परंपरेची सनद करून दिली. बाबासाहेब आपटे यांच्या मातुश्री लक्ष्मीबाई यांनीं श्रीक्षेत्र काशी येथें दुर्गाघाटावर श्री नारायणेश्वराचें मंदिर बांधलें. त्याचे पूजानैवेद्याकरितां गिर्द जिल्ह्यांतील गुठीणा गांवची सनद करून दिली.

बाबासाहेबांचे बंधु भाऊसाहेब हे नेहमीं जयाजीराव शिंद्यांकडे असून त्यांना दरमहा २०० रु. तनखा मिळत असे. बाबासाहेबांचे चिरंजीव गणेश ऊर्फ रावसाहेब आपटे हे शेवटचे श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे जांवई होत.

सरदार बाबासाहेब आपटे यांचा अद्भूत पराक्रम, अतुल कीर्ति आणि अलौकिक दातृत्व यांसंबंधीच्या पुष्कळ गोष्टी सांगण्यांत येतात. बाबासाहेब शरीरानें सडपातळ असून अतिशय सशक्त व निरोगी होते. अश्वविद्येंतील त्यांचें कौशल्य तर अलौकिक होतें. सर्व हिंदुस्थानांत घोड्यावर बसण्यांत व घोड्याची परीक्षा करण्यांत त्यांच्यासारखा पुरुष आजपर्यंत झाला नाहीं. ‘ अश्वहोलीका ’ नांवाचा अश्वविद्येवरील एक ग्रंथ त्यांनीं लिहिलेला आहे. सर्कशींत नांवारूपास आलेले कै. विष्णुपंत छत्रे हे बाबासाहेबांचे शिष्य. बाबासाहेबांच्या अलौकिक कौशल्याबद्दल महाराज शिंदे सरकार यांनीं त्यांना अश्वकलेंतील अजिक्यपत्र दिलें होतें. सरदार बाबासाहेबांची दातृत्वाबद्दल अतिशय ख्याति होती. त्यांच्यासारखा दाता बृहन्वृंदांत क्वचितच झाला असेल. बावासाहेब निःस्पृह, दयाळू, शूर, अश्वपरीक्षक व अश्वारोहण विद्येंत निष्णात होते. उज्जयिनीध्मयें यात्रेकरू ब्राह्मण व बैरागी यांचें थंडीपासून निवारण करण्याकरितां रु. ५००० ची त्यांनीं बनात दिली होती. काशींतील वैदिक, शषी, ज्योतिषि, अग्निहोत्री इत्यांदींना आपल्या मातोश्रींच्या इच्छापूर्ततेकरितां सुमारें ३०००० रु.चें कापड, दक्षिणा व शालजोड्या वाटल्या होत्या. यावरून बाबासाहेबांच्या औदार्याची कल्पना

आल्याशिवाय रहात नाहीं. बादशहा सप्तम एडवर्ड ग्वाल्हेरला गेले असतां ते वृद्ध व अशक्त बाबासाहेबांना भेटले, त्यांचा त्यांनीं गौरव गेला. बाबा-साहेब माळवा प्रांताचे सुभेदार असतां १८५७ च्या धामधुमींत इंग्रज सर-कारच्या गव्हर्नर जनरलांनीं त्यांच्याकडे मदत मागितली होती. सरदार बाबासाहेब आपटे शके १८०४ मध्यें कैलासवासी झाले. यांचे एकुलते एक चिरंजीव सरदार गणेश हरी ऊर्फ रावसाहेब आपटे हेहि अद्वितीय पराक्रमी व अश्वविद्येंत पारंगत होते.

विश्वनाथ भट आपटयांचे द्वितीय पुत्र केशव दीक्षित, केशव दीक्षितांचे पहिले चिरंजीव विनायक दीक्षित हे राम दीक्षितांचे पणजे. राम दीक्षित मोठे विद्वान् होऊन गेले. १० सप्टेंबर १९५२ च्या अंकांत केसरीकार म्हणतात, ' संस्कृत विद्येचें पुनरुज्जिवन या लेखांत ज्यांचा उल्लेख येण्याचा चुकून राहिला, त्यांपैकीं पुण्यांतील महामहोपाध्याय रामचंद्र गंगाधर आपटे व कृष्णशास्त्री राजवाडे हे मुख्य होत. राम दीक्षित आपटे हे न्याय व धर्मशास्त्रांत प्रवीण असून तत्कालीन विद्वान् नारायण-शास्त्री गोडबोले, सदाशिवशास्त्री थत्ते व न्या. महादेव गोविंद रानडे यांना फार मान देत. दयानंद सरस्वती आर्यसमाजाची स्थापना करण्याकरितां पुण्यास आले, तेव्हां त्यांच्याबरोबर वाग्युद्धांत दोन हात करून राम दीक्षितांनीं जय मिळविला. त्यांचे वंशज पुण्यांत आहेत.

## इतर प्रसिद्ध पुरुष

सुप्रसिद्ध लेखक व 'आनंद' मासिकाचे संपादक श्री. वासुदेव आपटे, श्री यशवंत गोविंद आपटे अकौंटंट् जनरल लष्कर–ग्वाल्हेर, कै. महादेव चिमणाजी आपटे उर्फ आनंद सरस्वती, सुप्रसिद्ध कादंबरीकार **हरी नारायण आपटे**, रा. ब. नारायण गोविंद आपटे, सवजज्ज पुणें; वगैरे अनेक पुरुष आपटे घराण्यांत होऊन गेले असून त्यांची विस्तृत माहिती 'आपटे घराण्याचा इतिहास' या पुस्तकांत मिळते.

# आजगांवचें चित्पावन मराठे घराणें

सावंतवाडी संस्थानांत ज्या ज्या ठिकाणीं 'मराठे' कुलानें वास्तव्य केलें होतें त्यांत आजगांव हा प्रमुख गांव होता, आज एकाही मराठे घराण्याचें आजगांवीं वास्तव्य नसलें तरीं श्रीदेव वेताळ, खळनाथ, आदित्यनाथ, घोडेमूख, सर्वेश्वर इत्यादि आजगांवच्या ग्रामदेवतांना नैवेद्य दाखविणारे मराठे मूळ आजगांवचेच होत. आजगांवांत असतांना या मराठे घराण्यास कांदेरकर मराठे व पंत मराठे या नांवांनीं ओळखलें जाई. कालांतरानें आजगांव या मूळ वास्तव्याच्या ठिकाणाहून हीं घराणीं मळेवाड, ऐनापूर, अनगोळ इचलकरंजी, ग्वाल्हेर इत्यादि ठिकाणीं वास्तव्यास गेलीं. आजगांवांत बराच कालपर्यंत स्थाईक असलेल्या कांदेरकर मराठ्यांचा मूळ पुरूष बल्लाळ होय. या घराण्यांतील पुरूष वैदिक अग्निहोत्री म्हणूण ओळखले जात. या घराण्यांतील एक पुरूष **विनायक बल्लाळ मराठे** यांची पत्नि सती गेली होती. **भिकाजी नरसिंह मराठे** हे १९३९ च्या युद्धांत इराणांत लढाईवर गेले होते. रत्नागिरी येथील अखिल-चित्पावन ब्राम्हण विद्यार्थी-सहाय्यक-मंडळ या संस्थेचे संस्थापक **बाळाजी हरी मराठे** हेही याच घराण्यांतील होत. कांदेरकर मराठ्याप्रमाणेंच पंत मराठ्यांच्या कांहीं पिढ्या आजगांवींच स्थाईक होत्या. या घराण्याचा मूळ पुरुष बाळंभट असून त्यांच्या कुलांतील **येसाजी विष्णु मराठे** यांच्या मातुश्रीना सावंतवाडीचे राजे यांच्याकडून चोळी लुगड्यावद्दल देणगी म्हणून धारामाफीची सनद मिळाली होती. या घराण्यांतील कांहीं पुरुष पुढें राजापूरास स्थाईक झाले.

आजगांवहून मळेवाड येथें स्थाईक झालेल्या मराठे घराण्यांतील **हरभट दामोदर मराठे** वैदिक यांना जमखंडीकर पटवर्धनांकडून जमीन इनाम मिळाली होती **चिंतामण गणेश मराठे** हे वैदिक व याज्ञिक असून मिरज वैदिक मंडळात त्याना पहिला मान आहे. यांनी वेदाच्या पोथ्या लिहिल्या. **विष्णु दामोदर मराठे**, वैदिक यांच्या हातच्या शक १६८१ मधील पोथ्यांवर वास्तव्य आजगांव असें लिहीलें आहे. **बापुभट चिंतामणी** यांचें मिरजेच्या किल्ल्यांत वास्तव्य होतें. **रामकृष्ण नारायण उर्फ**

भाऊभटजी-हे उत्तम वैदिक असून यांनी ठिकठिकाणीं घनाचीं पारायणें केलीं. १८५४ मध्यें श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरजकर यांनीं हजार रुपये खर्च करून त्यांच्या पोथीची मिरवणूक काढली होती. मिरजयेथील सरकारी वेदशाळेवर १८४४ पासून ते गुरुजी होते. श्रीमच्छंकराचार्यांकडून जरीचें महावस्त्र देऊन त्यांच्या गौरप झाला होता.

आजगांवहून ऐनापूर व सांगली येथें जें माराठे घराणें स्थाईक झालें त्यांचा मूळ पुरुष गणेश. या घराण्यांतील **दत्तात्रय केशव मराठे** हे उत्तम वैदिक असून हे जमखंडीकरांकडे संभावना करीत. **अनंत चिंतामण** हे पुण्याच्या भारतीय संगीत विद्यालयाचे चालक व भावे स्कूलमध्यें गायन-शिक्षक आहेत. **कृष्णराव गोविंद मराठे** यांनीं 'मराठे-कुल-वृत्तांत' हा ग्रंथ लिहिला असून हे पुण्यास इंजिनिअरिंग कॉलेजांत प्राध्यापक आहेत.

बेळगांव जिल्ह्यांतील अनगोळ कुरुंदवाड येथें **अनंत बाबदेव मराठे** हे प्रथम वास्तव्य करून राहिले. त्यांचे वडील **बाबदेव महादेव** हे आजगांवीं शेती व बागायती करीत. मोरेश्वर बळवंत हे 'चैतन्य' साप्ताहिकाचे संपादक आहेत.

आजगांवहून इचलकरंजीस स्थाईक झालेल्या मराठे घराण्यास इचल-करंजीकर घोरपडे यांचेकडून आगर येथें दोन बिघे जमीन इनाम मिळाली. या घराण्यांतील **बळवंत काशिनाथ मराठे** हे 'मराठे टेक्स्टाईल मिल्स' या गिरणीचे मालक होत. त्यांचे चिरंजीव **गोविंद बळवंत** हे स्वतःच्या गिरणीचे व्यवस्थापक असून यांनीं सुताची गिरणी उभारली आहे.

आजगांवहून काशी, चित्रकूट, झांशी इत्यादि ठिकाणीं जाऊन नंतर ग्वाल्हेरांत स्थाईक झालेले मराठेही आजगांवच्या देवतांस वार्षिक नैवेद्य दाखवितात. या घराण्यांतील बहुतेक पुरुष अग्निहोत्री होते.

**निखार्गे घराणें :-** हें घराणें मूळ दानोली जवळील केसरी गांवचें. सुमारें १५० वर्षांपूर्वी तें आजगांवीं आलें. शंभर वर्षांपूर्वींचा काल भरभराटीचा होता. या घराण्यांतील शिवराम साजबा निखार्गे शिरोड्यास गेले. त्यांच्या घराण्यांतील मोतीराम नीळकंठ निखार्गे यांचें हॉटेल शिरोडा येथें प्रसिद्ध आहे. आजगावांत निखार्गे यांचीं तीन दुकानें आहेत.

**कै. अनंत रावोबा सुतार (मेस्त्री)** गेल्या पिढींतील, सुतार घराण्यांतील एक प्रसिद्ध व्यक्ती. आपल्या सुतारकामांत हे निष्णात होते. चिकाटी व प्रामाणिकपणा हा त्यांचा स्वभावविशेष होता. आजगांव शिरोडा येथील बरींच कामें यांच्या देखरेखीखालीं झालीं.

**श्री. नारायण विश्राम सुतार** आजगांव ढाकोरें येथील प्रसिद्ध सुतार. मुंबईंत यांचें बंदुका व पिस्तुलें बनविण्याचें दुकान होतें. यांना यांत्रिक कामाची उत्तम माहिती असून सध्यां ते गावांतच वास्तव्य करून आहेत.

## आजगांवचे चर्मकार

शेंकडों वर्षांपासून आजगांवांत चर्मकारांची जमात वास्तव्य करून आहे. हे लोक कुलदैवत म्हणून वालावलीच्या नारायणास नारळ ठेवतात. त्यावरून ते मुळचे वालावलीचे असावेत असें वाटतें. यांच्या स्वत:च्या इस्टेटी होत्या. शंभर वर्षांपूर्वी बाबली विठू आजगांवकर आजगांवीं रहात. त्यांचा मुलगा सुकडोजी तेथून जवळच तिरोडें येथें राहिला. त्याचे मुलगे वासुदेव, बाबुराव, सखाराम, अर्जुन हे आपलें नशीब काढण्यासाठीं मुंबईस गेले. पैकीं श्री. बाबुराव सुकडोजी आजगांवकर यांचें दुकान मुंबईंत गिरगांव रोड येथें आहे. श्री. वासुदेव सुकडोजी आजगांवकर यांचें दुकान धोबीतलाव येथें, सखाराम सुकडोजी आजगांवकर हे कोटांत व अर्जुन सुकडोजी हे फोर्टमार्केट बोराबाजार येथें चप्पल व बूट यांची दुकानें घालून आहेत. बाकी जे लोक गांवीं आहेत त्यांची स्थिति सर्वसामान्य आहे.

ठाणे
१२३४३ दि:
नों: दि:
ग्रंथ संग्रहालय ठाणे

# समारोप—

एखाद्या गांवची ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक माहिती जमा करणें किती कष्टाचें काम आहे, हें अनुभव घेऊनच पाहिलें पाहिजे. लाखों खेडयांनीं समृद्ध असलेला हा भारत देश आहे. या खेडयांना स्वतंत्र असा इतिहास आहे. पण खेडेगांवचा हा इतिहास, वैशिष्ठयें, संस्कृति यांची जोपासना करण्याचा प्रयत्न क्वचितच कोणी केला असेल. 'आजगांव-दर्शन' या प्रस्तुत ग्रंथानें 'आजगांव'ची ओळख करून घेणें सोपें होईल, अशी उमेद आहे.

१९५० मध्यें प्रस्तुत ग्रंथरचनेचा संकल्प सोडला व १९५४ मध्यें तो पूर्ण झाला. असें असलें तरी आजगांवचें हें संपूर्ण दर्शन नव्हे !

## कुडाळ देशस्थ ब्राह्मणांची सत्ता.

शके १३५८चा नागदेवाचा ताम्रपट उपलब्ध आहे. त्यावरून पंधराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत आद्यगौड ब्राह्मण ज्ञातीचें बलाढ्य सामंत घराणें या भागावर राज्य करीत होतें, असें दिसतें. 'पंधराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास वाडी हा भाग (हल्ली सावंतवाडी) बलाढ्य स्थानिक ब्राह्मण घराण्याच्या राज्यांत मोडत असे', असें रत्नागिरीच्या गॅझेटीअरकारानें म्हटलें आहे. यावरून इ. स, १००० नंतर १५ व्या शतकापर्यंत कोंकणच्या सागरी प्रांतावर ब्राह्मणी सत्ता स्थिर झाली होती, असें स्पष्ट दिसतें. कोंकण प्रांतावरील हिंदु संस्कृतीचा आणि साम्राज्याचा इतिहास ६ व्या शतकापासून उपलब्ध आहे. रेवती पट्टण हें व्यापार व कला याबद्दल त्या कालापासून प्रसिद्ध होतें.

निरनिराळे आधार देऊन श्री. बांबर्डेकरांनीं जी माहिती 'मठगांवचा शिलालेख' या ग्रंथांत दिली आहे, तिच्या अनुषंगानें चार शब्द लिहितों.

8622

## मूळ पुरुष देवशर्मा.

इ. स. १००५ नंतर उत्तर हिंदुस्थानांत गझ्नीच्या महमुदाच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. त्यामुळें जान्हवी तीरावरच्या मुंज नांवाच्या गांवांतून सामंत कुलाचा मूळ पुरुष देवशर्मा, कोंकणांत परागंदा होऊन आला. तेव्हां देवशर्म्याबरोबर आणखी तेरा गोत्रांचीं ब्राह्मण घराणीं कोकणांत आलीं. या १४ घराण्यांनीं कुडाळ प्रांतांतील निरनिराळ्या १४ गांवीं वसाहती केल्या. हे गांव त्या ज्ञातीचे ' मूळ भुंकेचे ' (मूळ भूमिकेचें) या विशिष्ट नांवांनें प्रसिद्ध आहेत. (आजगांव हा मूळ भूमिकेचा गांव आहे, हें वाचकांनीं लक्षांत घेतल्यास प्रभुमतकरी घराण्यास येथें अग्रमान कां याचा बोध होतो. )

देवशर्मा जेव्हां कोंकणांत आला, तेव्हां तेथें चालुक्यांची सत्ता होती. चालुक्यांच्या वतीनें त्यांचा मांडलीक असलेला कदंबराजा येथें राज्य करीत होता. या कदंबराजानें देवशर्म्याचा 'हिंदळें' गांवीं मोठा सत्कार करून त्यास कांहीं भागाचे राज्याधिकार दिले. पुढें देवशर्म्याच्या वंशांत जन्मलेल्या वीर माइंदानें आपलें राज्य वाढविलें आणि कृतज्ञता बुद्धि बाळगून कदंबाच्या राज्याचें संरक्षणही केलें. रेवतीपट्टण म्हणजे रेडी. कडुवलपट्टण म्हणजे कुडाळ, सामंतपट्टण म्हणजे आजची सावंतवाडी. हीं तत्कालीन ब्राह्मणी सत्तेनें निर्दशित केलेलीं नांवें आज इतिहासजमा झालीं आहेत.

१५ व्या शतकानंतर इ. स. १६९६ पर्यंत बहामनी राजाचे मांड-लिक म्हणून सामंतांचे वंशज जे 'प्रभु' त्यांनीं राज्य केलें. १७व्या शतकाच्या मध्यास माणगांवतर्फेचा नाईक लखम सावंत यानें गादीवरील प्रभूदेसाई यास ठार मारलें व शिवाजीविरुद्ध विजा-पुरकरांना मदत केली. खेम सावंतानें १६९६त जोगण प्रभुस ठार मारल्यावर नारायण प्रभू साळशी महालांत जाऊन राहिला.

## आजगांव हा तालुका होता

कुडाळ प्रांतांतील देसाई-देशमुखांची संस्था बनवासीच्या कदंबापासूनची. तेव्हां देसायाच्या हाताखालीं प्रांताच्या व्यवस्थेसाठीं आठ जण असत. त्यांत तीन देसाई, एक सामंत, एक नायक, दोन मतकरी व एक नाडकर्णी यांचा समावेश होई. त्यास **अष्ट प्रधान** म्हणत. शिवाजी महाराजांनीं कुडाळ प्रांतावर स्वारी करण्यापूर्वीं कुडाळ देशस्थ प्रभु घराण्याच्या ताब्यांतील मुलखाची सरकारी दप्तरांत माहिती मिळते, ती अशी–

" कुडाळ परगण्यांत बारा तर्फा, दोन कर्याती, एक विला-यत, एक बंदर आणि पांच महाल मिळून चारशें तेरा गांवांचा समावेश होता. कुडाळ परगण्यांतील बारा तर्फांपैकीं 'आजगांव' एक तर्फ म्हणजे तालुका होता. आजगांव तर्फेत बारा गांव होते. (सिलेक्शन्स ऑफ् रेकॉर्डस् ऑफ् दी बॉंबे गव्हर्नमेंट, व्हाल्युम १० न्यू सेरीज्, पृष्ठें १५३-५४)"

वरील सर्व माहितीचा जर साकल्यानें विचार केला तर असा निष्कर्ष निघतों कीं, देशवर्म्याबरोबर आलेल्या आणि कुडाळ

देशाचे सत्ताधीश झालेल्या ब्राह्मण कुलापैकीं आजगांवचे भारद्वाज गोत्री प्रभुमतकरी हें एक घराणें आजगांव तालुक्यावर प्रमुख होतें. म्हणूनच त्यांना येथें अग्रमान मिळत होता. त्यांनीं वसाहत केलेल्या या गांवास 'आद्यग्राम' हें विशिष्ट अर्थाचें नांव पूर्वींच रूढ असावें. आजगांवांतील प्रभुमतकरी घराण्याची पहिली वसाहत ढाकोरें येथें झाली होती. ढाकोरें येथील श्रीनारायणाचें देवालय प्राचीन असून तें ह्या गांवचें कुलदैवत होय. प्रभुमतकरी यांच्या आजगांवांतील वास्तव्यामुळें ह्या गांवास महत्व आलें, यांत नवल नाहीं. राजघराण्याशीं संबंध असलेलें कुल म्हणून त्यांना ह्या गांवामध्यें अग्रमान मिळाला, ही गोष्ट योग्यच होती. परंतु चौदाव्या शतकांत आजगांवीं आलेल्या मतकरी कुलापूर्वीं 'आद्य ग्राम' या नांवाखालीं येथें शेंकडो वर्षें वसाहत असावी व ती चित्पावन ब्राह्मण कुलांची असावी, असें येथील प्राचीन परशुरामाच्या देवालयावरून म्हणणें भाग पडतें. रत्नागिरी जिल्ह्यांत परशुरामाचें दुसरें देवालय फक्त चिपळूण येथेंच आहे.

## आजगांव व रेडीपाटणचा किल्ला.

रेडी येथील किल्ल्यानजीक खालीं समुद्रांत सिद्ध महापुरुषाचें देवालय आहे. येथील कुंडांत गोडें पाणी येतें. मार्गशीर्ष महिन्यांत जेव्हां आजगांवची देवस्वारी निघते, तेव्हां आजगांवचा देव रेडीपाटण येथील सिद्धास भेटून व त्याच्या चाळयास मान देऊन येत असतो. तसेंच आजगांव देवस्थानविषयक ज्या सरकारी नेमणुका आहेत, त्यांत श्रीसिद्ध, रेडी या नांवें अल्पशी नेमणूक चालत आली आहे. रेडी येथील सिद्धाचे पुजारी गोसावी हे आजगांवच्या देवाजवळ दर वर्षीं दसऱ्यास येत असतात. त्यांना बहु-

मानदिर्शक नैवेद्याचें पान देण्याची वहिवाट आहे. या सर्व जुन्या वहिवाटी लक्षांत घेतां व रेडीच्या किल्ल्याच्या प्रवेश-द्वारावरील कोरलेली गणपतीची भव्य मूर्ती यांचा विचार केला, तर ढाकोरें वाडींतील श्रीगणपतीच्या उपासकांपैकीं एकाद्या थोर व पराक्रमी पुरुषाचा रेडीच्या किल्ल्याशीं निकटचा संबंध सूचीत होतो. 'या भागांत गणपतीचीं तीन प्राचीन देवस्थानें फक्त ढाकोरें वाडींत आहेत. रेडीच्या किल्ल्यावर आजगांवचा कोणी पुरुष अधिकारी होता, अशी एक आख्यायिका आहे. या किल्ल्याचें शिवकालीन नांव यशवंतगड होतें. तत्पूर्वी रेवतीपट्टणांत हा गणनूगड म्हणून प्रसिद्ध असावा, असें मत शिरोडें येथील एक इतिहास-संशोधक कै. बाबाराव आजगांवकर यांचें होतें. या बाबतींत अधिक संशोधनास जागा आहे.

## आजगांवचा नकाशा

प्रस्तुत ग्रंथांतील आजगांवचा नकाशा १८८५ सालीं रेव्हिन्यू खात्यानें जमिनीची मोजणी करून तयार केलेल्या मूळ नकाशा-वरून तज्ज्ञ माणसाकडून तयार करविला आहे. यासाठीं फारच खर्च सोसावा लागला, तसेंच प्रभुमतकरी घराण्याची अंदाजें सन १५०० पासून मिळणारी दुर्मिळ वंशावळ ग्रंथांत दिली आहे.

## देवस्थानचीं तरंगें आणि श्री. बांबर्डेकर यांचे विचार

" या प्रांतांतील सर्व देवळांत 'तरंग' नांवाच्या देवता असतात. या तरंगावर पितळेचे अगर रुप्याचे (स्त्रीपुरुषांचे) मुख-वटे, नुसता हाताचा तळवा किंवा कलश असे बसवून ते विशेष प्रसंगीं पूजिले जातात. हे मुखवटे, ज्यांनीं देवस्थान-व्यवस्था लावली, त्या राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचीं स्मारकें असलीं पाहि-

जेत. या तरंगांच्या सहाय्यानें पिशाच्च संचाराप्रमाणें विरतिक अवसर आणतात. त्यावरून त्या देवता नसून त्यांचा संबंध Spirit प्रमाणें मनुष्याशींच येतो, हें उघड दिसतें. या मुखवटयांचा संबंध शिवोपासक राजघराण्यांतील मुखवटयांशीं असावा. तरंगांवरील कलश सामंतांची कुळदेवता होय, जिला पुढें 'कुळ' हें नांव प्राप्त झालें. नागदेवाच्या ताम्रपटांत सांगितल्याप्रमाणें हे सामंत जान्हवी तीरावरूनच आले, म्हणूनच गंगोदकपूर्ण कलश हें चिन्ह त्यांनीं स्विकारलेलें दिसतें." (मठगांवचा शिलालेख पृ. १५८)

## परिसरांतील व्यक्ति

आजगांवच्या परिसरांत शिरोडा व आरवली येथील बऱ्याच व्यक्ति उच्च शिक्षण घेतलेल्या असून त्यांपैकीं कांहींनीं मुंबई विश्वविद्यालयाची डॉक्टरेट् पदवी मिळविलेली आहे आणि कांहींनीं युरोपचा प्रवासही केलेला आहे. परळ येथील शिरोडकर हाय-स्कूलचे संस्थापक कै. डॉ. काशीनाथ रामचंद्र शिरोडकर हे एक थोर समाजसेवक व शिक्षणक्षेत्रांतील अधिकारी पुरुष होऊन गेले. श्री. अंकुशराव गावडे आणि श्री. भिवा अर्जुन परब यांनींही गरिबीतून परिस्थितीशीं दोन हात करीत शिक्षण पुरें केलें आहे. आरवली येथील श्री. बाबासाहेब रेगे आणि त्यांचे बंधु श्री. दिनकरराव रेगे हे उच्च विद्याविभूषित असून त्यांच्या हातून भरीव देशकार्य होईल, अशी आशा आहे. यांपैकीं बहुतेकजण टयूटोरीयल् इंग्लिश स्कूल, शिरोडा, या शाळेचे विद्यार्थी होत.

माननिदर्शक नैवेद्याचें पान देण्याची वहिवाट आहे. या सर्व जुन्या वहिवाटी लक्षांत घेता व रेडीच्या किल्ल्याच्या प्रवेश-द्वारावरील कोरलेली गणपतीची भव्य मूर्ती यांचा विचार केला, तर ढाकोरें वाडींतील श्रीगणपतीच्या उपासकांपैकीं एकाद्या थोर व पराक्रमी पुरुषाचा रेडीच्या किल्ल्याशीं निकटचा संबंध सूचीत होतो. 'या भागांत गणपतीचीं तीन प्राचीन देवस्थानें फक्त ढाकोरें वाडींत आहेत. रेडीच्या किल्ल्यावर आजगांवचा कोणी पुरुष अधिकारी होता, अशी एक आख्यायिका आहे. या किल्ल्याचें शिवकालीन नांव यशवंतगड होतें. तत्पूर्वी रेवतीपट्टणांत हा गणनगड म्हणून प्रसिद्ध असावा, असें मत शिरोडें येथील एक इतिहास-संशोधक कै. बाबाराव आजगांवकर यांचें होतें. या बाबतींत अधिक संशोधनास जागा आहे.

## आजगांवचा नकाशा

प्रस्तुत ग्रंथांतील आजगांवचा नकाशा १८८५ सालीं रेव्हिन्यू खात्यानें जमिनीची मोजणी करून तयार केलेल्या मूळ नकाशा-वरून तज्ज्ञ माणसाकडून तयार करविला आहे. यासाठीं फारच खर्च सोसावा लागला, तसेंच प्रभुमतकरी घराण्याची अंदाजें सन १५०० पासून मिळणारी दुर्मिळ वंशावळ ग्रंथांत दिली आहे.

## देवस्थानचीं तरंगें आणि श्री. बांबर्डेकर यांचे विचार

" या प्रांतांतील सर्व देवळांत 'तरंग' नांवाच्या देवता असतात. या तरंगावर पितळेचे अगर रुप्याचे (स्त्रीपुरुषांचे) मुख-वटे, नुसता हाताचा तळवा किंवा कलश असे बसवून ते विशेष प्रसंगीं पूजिले जातात. हे मुखवटे, ज्यांनीं देवस्थान-व्यवस्था लावली, त्या राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचीं स्मारकें असलीं पाहि-

जेत. या तरंगांच्या सहाय्यानें पिशाच्च संचाराप्रमाणें विरतिक अवसर आणतात. त्यावरून त्या देवता नसून त्यांचा संबंध Spirit प्रमाणें मनुष्याशींच येतो, हें उघड दिसतें. या मुखवटयांचा संबंध शिवोपासक राजघराण्यांतील मुखवटयांशीं असावा. तरंगांवरील कलश सामंतांची कुळदेवता होय, जिला पुढें 'कुळ' हें नांव प्राप्त झालें. नागदेवाच्या ताम्रपटांत सांगितल्याप्रमाणें हे सामंत जान्हवी तीरावरूनच आले, म्हणूनच गंगोदकपूर्ण कलश हें चिन्ह त्यांनीं स्विकारलेलें दिसतें." (मठगांवचा शिलालेख पृ. १५८)

## परिसरांतील व्यक्ति

आजगांवच्या परिसरांत शिरोडा व आरवली येथील बऱ्याच व्यक्ति उच्च शिक्षण घेतलेल्या असून त्यांपैकीं कांहींनीं मुंबई विश्वविद्यालयाची डॉक्टरेट् पदवी मिळविलेली आहे आणि कांहींनीं युरोपचा प्रवासही केलेला आहे. परळ येथील शिरोडकर हाय-स्कूलचे संस्थापक कै. डॉ. काशीनाथ रामचंद्र शिरोडकर हे एक थोर समाजसेवक व शिक्षणक्षेत्रांतील अधिकारी पुरुष होऊन गेले. श्री. अंकुशराव गावडे आणि श्री. भिवा अर्जुन परब यांनींही गरिबीतून परिस्थितीशीं दोन हात करीत शिक्षण पुरें केलें आहे. आरवली येथील श्री. बाबासाहेब रेगे आणि त्यांचे बंधु श्री. दिनकरराव रेगे हे उच्च विद्याविभूषित असून त्यांच्या हातून भरीव देशकार्य होईल, अशी आशा आहे. यांपैकीं बहुतेकजण टयूटोरीयल् इंग्लिश स्कूल, शिरोडा, या शाळेचे विद्यार्थी होत.

## आभार !

प्रस्तुत ग्रंथ-छपाईचें काम सुबक रीतीनें केल्याबद्दल 'तरुण भारत' प्रेसचे व्यवस्थापक व कामगारवर्ग यांचा मी आभारी आहे. ग्रंथाची सजावट व मुद्रितें तपासण्याची जबाबदारी माझे मित्र श्री. र. के. तेंडोलकर यांनीं सांभाळली. रत्नागिरीचे कॉंट्रॅक्टर श्री. कमलाकरपंत आजगांवकर यांनीं ग्रंथछपाई चालू असतांना आर्थिक सहाय्य देण्याचें आश्वासन दिलें. त्यामुळें आर्थिक भार हलका झाला. महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध पत्रकार श्री. चं. वि. बावडेकर यांच्या आशीर्वादामुळे ग्रंथाला शोभा आली आहे. या ग्रंथ-लेखनाच्या कामीं ज्यांनीं सहाय्य दिलें आणि वेळोवेळीं प्रोत्साहन दिलें, त्या सर्व मित्रमंडळींचें पुन: एकदां आभार मानून हा समारोप संपवितों.

दा. क्र. 8822
क्रमांक 202
नों. दि.
REFBK-0008822

## श्री. नीलकंठ श्रीधर आपटे, बी. एजी; मुंबई,
### जॉइंट डायरेक्टर ऑफ अॅग्रीकल्चर, मध्यभारत



रावराजे सरदार श्रीधर गोपाळ आपटे बी. ए यांचे हे तृतीय पुत्र होत. त्यांचा जन्म ग्वाल्हेर येथें १८ जुलै १९०४ ला झाला. त्यांचे बालपण ग्वाल्हेर येथेंच गेलें. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तेथेंच पूर्ण केल्यावर हे पुण्यास फर्ग्युसन कॉलेजांत दाखल झाले. १९२९ मध्यें पुण्याच्या शेतकी कॉलेजांतून हे पदवीधर झाले. इन्स्टीटयूट ऑफ प्लँट इंडस्ट्री इंदोरमध्यें व तेथून इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या गंग कॅनल कॉटन इम्प्रुव्हमेंट स्कीम आणि श्री. गंगानगर ( बिकानेर ) चें काम त्यांनीं केलें. त्यानंतर त्यांची नियुक्ती श्रीमंत शिंदे सरकारनीं आपल्या ग्वाल्हेर राज्यांत असिस्टंट डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर व डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरच्या पदावर केली. तेथें त्यांनी महत्त्वाचीं कृषिकार्में केली. २८ मे १९४८ ला मध्यभारत बनल्या-नंतर ह्या नवीन जनतंत्र राज्यांतील शेतकी खात्यांत डेप्युटी डायरेक्टरच्या पदावर आणि जॉइंट डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर या मोठ्या व जबाबदारीच्या पदावर हल्लीं काम करीत आहेत. यांना मुलगे दोन. मोठे चि. शरद्कुमार मेडिकल कॉलेजांत फायनल एम्. बी. बी. एस्. ला आहेत. धाकटे चि. अरविंदकुमार इंटरला आहेत. त्यांच्या पत्नी सौ. प्रमिलाबाई या सांगली येथील कुशाभाऊ पटवर्धन यांची कन्या होय. त्यांनीं विवाहानंतर १८ वर्षांनीं शालेय शिक्षणास पुन्हां आरंभ करून इंटरपर्यंत शिक्षण पुरें केलें.

## श्री. रा. बा. आजगांवकर

हे एक सव्यसाची विनोदी लेखक व अभिजात कवि आहेत. त्यांच्या-विनोदी लेखनाबद्दल साहित्यसम्राट कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी त्यांची पाठ थोपटली होती. गेलीं तीस वर्षे मराठी साहित्याची ते सेवा करीत आहेत. त्यांचे पधर्वांधर पुत्र श्री. शशांङ्क व श्री. चकोर हेहि साहित्यक्षेत्रांत परिचित आहेत.

सा. न. वि. वि.

आजगांव दर्शन पुस्तक पाठविल्याबद्दल आभारी आहे. अशीं बारकाव्याचीं वर्णनें प्रत्येक लहानमोठ्या ग्रामासंबंधीं व्हावयास पाहिजेत; आणि माझ्या मतें त्यांत भावी उत्कर्षाच्या सूचना पाहिजेत. हें गांव शेंकडो वर्षांपूर्वी वसलें गेलें त्यावेळची सर्व परिस्थिती बदलली. नवीन मनूस अनुसरून आतां ग्रामसुधारणेच्या कोणत्या बाबी लक्षांत घेतल्या पाहिजेत, कालवे, रेल्वे, शेती उत्पन्न, खाणी, वीज अशा कोणत्या बाबती आतां स्वीकारण्याजोग्या आहेत याचें विवेचन प्रत्यक्ष अनुभवानें अशा गांवासंबंधीं प्रसिद्ध होईल तर हल्लीं जो ग्रामसुधारणेचा विषय सरकारपुढें आहे त्यास जनतेचा सहकार मिळूं शकेल. हल्लीं स्वराज्याचा काल आहे. त्यांत लोकांनीं संपूर्ण भाग घेतला पाहिजे, तरच देशाचें दैन्य निवारण होईल. हें पुस्तक वाचून मला पुष्कळशी नवीन माहिती मिळाली. या विषयाचा असा खोल अभ्यास केल्याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों. लोभ निरंतर असों द्यावा रियासतकार **गो. स. सरदेसाई**

मूळ आद्यग्राम नांव असलेल्या एका कोंकणी गांवाची सर्वांगीण माहिती देणारें हें छोटें पुस्तक आहे. श्री. गुं. फ. आजगांवकर यांचें हें लेखन अभिनंदनीय व अनुकरणीय वाटतें. ( लोकमान्य, मुंबई )

आपल्याकडून आठवणीनें आलेलें पुस्तक 'आजगांव-दर्शन' हें मिळालें. फार फार आभारी आहें. प्रत्येक गांवच्या वैशिष्ट्यानें भरलेलीं अशाप्रकारचीं पुस्तकें निघतील तितकीं थोडींच. माझ्यातरी पाहण्यांत अशा प्रकारची सांगोपांग सुसूत्र माहिती एखाद्या गांवची असलेली अशी याच पुस्तकांत आढळली. मी तुमचें हार्दिक अभिनंदन करतों.

होरारत्न श्री. **वसंत लाडोबा म्हापणकर** [मालवण]

'माझा गांव बदलापूर' हें श्री. ना. गो. चापेकर यांचे पुस्तक ज्यांनीं वाचलें असेल. त्यांना श्री. गुं. फ. आजगांवकर यांच्या आजगांव दर्शन या पुस्तकाचें महत्व सहज पटेल श्री. आजगांवकर यांच्या या सुंदर सचित्र पुस्तकाचा मराठी वाचकांना परिचय करून देण्याची कामगिरी प्रस्तावनेच्या व पुरस्काराच्या रूपानें महाराष्ट्रभाषा भूषण आजगांवकर व चं. वि. बावडेकर या दोन मान्यवर साहित्यिकांनी पार पाडली आहे. **धनुर्धारी–१८।१२।५४**



## कै. कु. सुशिला विश्वनाथ आजगांवकर एम्. एस्. सी.


यांचा जन्म १९२१ मध्यें आजगावीं झाला. बी. एस सी फर्स्ट क्लास, नंतर पुढें गणित घेऊन त्या एम् एस्. सी झाल्या नॅशनल कॉलेज वांद्रा, आणि रुपारेल कॉलेज माटुंगा येथें गणित विषयाच्या प्राध्यापिका होत्या. ७ मे १९५४ रोजीं त्या अकालीं कालवश झाल्या. आजगावांतील ह्या पहिल्या स्त्री प्रोफेसर !

## रावबहादूर कै. लक्ष्मण नारायण प्रभु आजगांवकर



रेव्हिन्यू खात्यांत प्रथम 'क्लार्क' म्हणून नोकरी करून पुढें स्वतःच्या कर्तृत्वानें हे 'डेप्युटी कलेक्टर' या हुद्यावर चढले. विद्यावृद्धि समाजाचे हे पहिले अध्यक्ष. सरकारनें त्यांना 'रावबहादूर' ही पदवी अर्पण केली होती.

## श्रीयुत वासुदेव आत्माराम मेस्त्री



श्री वासुदेवराव यांचा जन्म व शिक्षण आजगावीं झालें. यांचें घराणें आजगांवच्या देवस्थानविषयक कामगिरींत भाग घेतें. सावंतवाडी स्टेटतर्फे स्कॉलर्शिप देऊन त्यांना कोल्हापूर टेक्निकल स्कूलमध्यें पाठविण्यांत आलें. तेथें त्यांनी मोटर मॅकॅनिक्सचा अभ्यास पुरा केला. त्यांनी एन्. पॉवेल कंपनीत व बॉंबे मोटर सायकल कंपनीत काम केलें होतें. ते फर्स्टक्लास बॉयलर अटेन्डंट असून, एस. एम्. कोतवाल डाईंग अँड ब्लीचींग मिलमध्ये सध्या मॅकॅनिकल इंजिनियर म्हणून काम पहातात.

# देवस्थानविषयक पुरवणी मजकूर

पृष्ठ ३७ ओळ ७––“ग्रामसीमेस लागून न्हावेली हा गांव आहे. समुद्रस्नानास आजगांवचे देव न्यावयाचे ठरल्यास न्हावेलीचे मानकऱ्यास आगाऊ एक दिवस कळवावें लागतें. त्या गांवचे मानकरी गांवकर तरंगें–पालखी आजगांवीं आणतात. त्या देवांसमवेत आजगांवचे देव समुद्रास जातात. यदाकदाचित अडचणीमुळें आजगांव देवांचे जाणे रहीत झालें असतां न्हावेलीचे देव स्वतंत्रपणें न जातां आपले गांवीं जातात.

समुद्रस्नान करून आजगांवचे देव न्हावेली देवांसह परत येत असतां आरवली गांवचे „श्रीदेव वेताळप्रमुख देवानें म्हणजे तरंगांनीं सामोरें येऊन आपले देवालयांत नेऊन सत्कार करण्याची वहिवाट आहे. ”

पृष्ठ ११ ओळ ८—“ आजगांवीं श्रीदत्ताचीं दोन देवस्थानें आहेत. वाडा ढाकोरें येथें कै. विनायक भटजी काकतकर वैदिक, एका कालीं प्रसिद्ध मांत्रिक यांनीं स्वतःचे खाजगी मालकीचें व मळेवाड येथें कै. भास्कर सदाशिव गाडगीळ यांनी स्वतःचे मालकीनें स्थापन केलें असून दोन्ही देवालयांतील वार्षिकी उत्साह नित्याची पूजाअर्चा त्यांचेच वंशज करीत आहेत ”.

पृष्ठ ४३ ओळ १०—“ महारांच्या जाती दोन. पान महार व बेळे महार. आजगांवांत पान महारांचें एकही घर नाहीं. सर्व महार बेळे जातीचे असून ते पानमहारांचें घरीं जेवीत नाहींत. गांवच्या सर्व देवस्थानांत महारांचें आद्यस्थान कायम असून पूर्वापार चालत आलेल्या ‘ पूर्वसत्ता व राजसत्ता ’ या गोष्टींत कांहीं अडचण आल्यास महारदेवाच्या वंशाचें वारें त्यांच्या भक्तमडळींत एखाद्यावर संचार करून निवाडा सांगत असतें ”.

“ गांवासंबंधीं देवस्कीचे कामाची वर्दी रयतेस व मानकऱ्यास कळविण्याचें काम वतनदार महारास करावें लागतें. तसेंच याच जमातीनें देवस्कीचे ढोल वाजवून सुरवात करून द्यावी लागते. ढोल घेऊन आरंभापासून अखेरपर्यंत महार हजर असावे लागतात. ते नसतील तर सकाळच्या नौबतीपासून पुढील कोणतेंही काम होणें अशक्य होतें. असा यांचा अप्रमान आहे. गावचे लोक महारांच्या शापास भीत असल्यानें त्याचें बलुतें, देवाचे नैवेद्याचें अन्न देणें वगैरे व्यवस्थेशीर चालू आहे. यांनीं आपल्या वसतिस्थानाची, कुल-

दैवतेच्या स्थानाची दागडुजी करून, स्वच्छ राखून ते यथाशक्ति शिक्षणहि मिळवीत आहेत. यांची संख्याही वाढत आहे. ही जाता पूर्वापार इमानदार असल्याचें प्रसिद्ध आहे. ती प्रसिद्धी अद्यापही थोडीबहुत अनुभवास येते ".

**देवालयें**—(१) जुनें देऊळ 'धावगिरे' नांवचे असून तें सावळ वंशाच्या पुरुषाचें आहे. देवस्थान विषयक एक दोन कामांत सावळ वंशाच्या पुरुषाचे विर्तिकी काम आहे. (२) श्रीदेव परशुरामादि कोणत्याहि देवलया- संबंधीं चित्तपावन ब्राह्मणाकडे कसल्याच प्रकारचा हितसंबंध नाहीं. बेहरे घराण्यानें अगदीं अलिकडच्या काळांत गांवकर मतकरी घराण्याकडून फक्त देवास पावणेर (नैवेद्य)' अर्पण–आपल्या वास्तव्य स्थानीं नेऊन करण्यापुरता पांचवा मान मिळविला आहे. (हे महाजन आहेत. मानकरी फक्त ४.— (१) मतकरी (२) अग्रसणकर (३) शेणवी (४) राळकर (५) बेहरे (महाजन)

(३) **नवीन देवालयः**–अग्रसणांत विठू रघे परब अग्रसणकर यानें 'मायेचे' म्हणून स्थापन केलें तें त्यांचें खासगींचे आहे.

प्रस्तुत पुस्तकांत प्रभु मतकरी घराण्याचा इतिहास संक्षेपानें आला आहे. तो साग्र लिहावयाचा झाल्यास, तो क्षत्रियकुलावतंस पृथ्वीराज चौहानपर्यंत पोंहोंचून मतकरी वंशाचे पूर्वज आणि कांहीं अस्सल क्षत्रिय वंशाचेहि वर्णन द्यावें लागलें असतें. गौड देश, गंगातीरस्थ लोकरीती व गढवाल प्रांतीय रीतिभाती यांचे अवशेष मतकरी गौड ब्राह्मण कुडाळ देशकरांत कसे सांपडतात, त्याचें कारण, तसेंच क्षत्रिय मराठा समाजातील जन्मोत्सव. पालकारोहणादि विधी, लग्नविधी, अंत्यसंस्कार वगैरे सप्रमाण रूढी इत्यादिकांवरून ज्ञाति इतिहास संकलन करावा लागला असता.

आदिमाया (मूळ भूमिका महिषासुरमर्दिनी मूर्ति) हिची स्थापना बेहरे यांचे पूर्वजांनीं केली. यासंबंधी पुढील दंतकथा प्रसिद्ध आहे ती अशी:- ही मूर्ति माळयारवाड्यांत स्थापिलेली होती. तेथें बेहरे हे मुख्य पुजारी होते. तेथून त्या मूर्तीचें उत्थापन करून श्रीदेव वेताळेश्वराच्या देवालयांत स्थापन केली. हें कृत्य बेहऱ्यांच्या पूर्वजांनीं पांचवा मानकरी होण्याच्या आशेनें केलें आणि या कामीं त्यांचे स्नेहांकित साठे यांनीं त्यांना मदत केली असें म्हणतात. ही दंतकथा सत्यशी वाटण्यासारखा पुरावा दोनशें वर्षांपूर्वीच्या गांवच्या 'सौडांळ' कागदांत मिळतो. त्यांत गांवच्या उत्पन्नापैकीं सुमारें एकषष्ठांश

जमिनी देवीचे नांवावर असून वहिवाटदार बेहरे होते. देवीच्या कोपानें वंशवृद्धीस अडथळा होऊन शेतकी, जमिनी, बागबागायती वगैरे दुसऱ्या कुळां-कडे, वसुली अधिकारी मतकरी गांवकऱ्यांकडून दिल्या गेल्या. तसेंच उत्थापनास सहाय्य देणाऱ्या साठे घराण्यांतील फार मोठी जमीन दुसऱ्या कुळांकडे जावून आज त्यांचा निर्वंश झाला आहे. बेहरे कुळांकडे ढाकोरें, माळयारवाडा, मळेवाडी यांतील फार मोठ्या उत्पन्नाचीं ठिकाणें होतीं. साठे घराण्यांतील परिस्थितीही तशीच होती.

"अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः । इदं ब्राह्म इदं क्षात्रं" अशा वृत्तीचे कुडाळ देशस्थ ब्राह्मण असून त्यांत तीन गांवचे मतकरी व पांच गांवचे देसाई प्रमुख होत. प्राचीन काळीं राजपुरोहित क्षात्रधर्मशिक्षक, अशा थोड्या पुरुषांबरोबर उत्तरेंतून दक्षिणापथांत क्षत्रिय शहाण्णव कुळांतील कांहीं पुरुषांनीं ग्रामाधिपत्य संपादन केलें. ते मुख्य मूळ ग्राम चौदा आहेत. त्यांना मूळभूमिका ही संज्ञा रूढ आहे. कुडाळ शहरीं चंद्रभान सूर्यभान या नांवानें गादी स्थापन करून अष्टप्रधानमंडळासह सरदेसाई यांनीं कुडाळ व पंचमहालावर तीनशें वर्षें राज्य केलें असा इतिहास कै. भागवत यानीं प्रसिद्धीस आणला आहे. त्या अष्टप्रधान मंडळांत मतकरी आजगांवकर हे प्रमुख होते राजविप्लव होऊन सावंतवाडी राजधानी झाली तरीसुद्धां सन १९४८ पर्यंत मतकऱ्यांना मानपूर्वक 'वतनमतकरी' या नांवानें सरकारी खजिन्यांतून वार्षिक नेमणुकीचा पैसा मिळत होता. दरबार कचेरींत एक आसन सरकारमान्य म्हणून चालू होतें.

मूळ भूमिकेच्या चौदाही ग्रामांत राजसत्ता व पूर्वसत्ता या दोनही बाबी देवस्कीच्या असून त्या अस्सल क्षत्रिय मराठा गांवकरांकडे चालू आहेत. पण आजगांवी पहिला व सर्वाधिकारत्वाचा मान मराठा घराण्याकडे नाहीं हें प्रसिद्ध केलेल्या निबाड्यावरून दिसून येतें, असें कां घडलें ? मद्रास इला-ख्यांतील मंगलोरच्या पुढील बारकोल प्रांतीं, चार पांच गावांत कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण, (जामदग्न्यगोत्री अग्रसणकर म्हणविणारे) असून ती मंडळी दाभोली मठास नियमित वर्गणी पाठवितात. त्यांजकडील कागदपत्रें उपलब्ध झाल्यास वरील प्रकारावर कांहीं तरी प्रकाश पडूं शकेल.

आजगांव हा गांव ब्राह्मणांनीच वसविला हें निधान तर्कप्रधान आहे. त्यास आधार म्हणजे श्री परशरामाचें सुमारें सातशें आठशें वर्षांपूर्वीचें बांधकाम आहे. त्याचप्रमाणें श्री आदित्यनाथाचें देवालयही अतिप्राचीन आहे. ब्राह्मणाची मुख्य दीक्षा, द्विजकारक गायत्री मंत्र आहे. मंत्रप्रतिपाद्य देवता सप्ताश्वरथ संयुक्त श्री सूर्य (आदित्य) नारायण होय. त्या प्रिय उपास्य देवतेचें देवालय ब्राह्मणांवाचून दुसरे अनधिकारी कोण बांधणार ?

## आजगांवच्या विकासाचें स्वरूप

**पाण्याचे सांठे—**

शंभर वर्षांपूर्वी आजगावांतील लोकांनीं सामुदाईक सहकारानें 'दुकम पाटा' नांवाचा दोन फर्लांग लांबीचा एक बांध घालून दुकम तलाव तयार केला होता. ह्याच बांधाचें रुपांतर सरकारी रस्त्यांत झालें. गेलीं कित्येक वर्षें सारखी झीज होऊन रस्त्याची उंची दोन फूट कमी झाली आहे. ही उंची व रुंदी सहा फूट वाढविल्यास पाणी पुरवठ्यास मदत होईल. यांतील तिन्ही मानशी दुरुस्त केल्या पाहिजेत. पूर्वी 'सांडवें' भागांत अशाच तऱ्हेनें पाणी सांठविण्याची वहिवाट होती. जरूर ती दुरुस्ती केल्यास सांडवें व दुकम तलावापासून उन्हाळी पीक सुमारें तीनशें भरे काढतां येईल. शिवाय बागायतीस पाणी मिळेल. बांधवाडा येथील नाटेकर तळीतून सांचलेला गाळ काढून टाकल्यास तेथेंहि पाण्याचा सांठा उपलब्ध होण्यासारखा आहे.

## रस्त्यांची दुरुस्ती व इतर सोई

ढाकोरे वाडींतून बांधघाटीवर जाणारा जुना रस्ता, सावकारवाड्याहून बांधघाटीनें जाणारा रस्ता, सावकारवाड्याहून देऊळवाड्याला जाणारा रस्ता, व भोमवाड्यांतून तिरोडा येथें जाणारी पायवाट यांची दुरुस्ती गाडी रस्त्यास योग्य अशी केल्यास दळणवळणाचा प्रश्न सुटेल. निखाऱ्यांची मानस दुरुस्त केल्यास जमिनींत येणारें समुद्राचें पाणी बंद होईल. गांवांत काजूकारखाना व सहकारी दुकान चालण्यासारखें असून तेथील ग्रंथसंग्रहालयाची सरकारी मदतीनें वाढ करतां येईल. गांवांत लोकवस्ती भरपूर असल्यानें पोलीस चौकी, स्वतंत्र पोस्ट ऑफीस, व ग्रामपंचायत होणें इष्ट आहे.

## राष्ट्रपतींचा आशीर्वाद !

सेक्रेटरी टु धि प्रेसिडेंट ऑफ इंडिया
राष्ट्रपति भवन, नयी दिल्ली
८ जनवरी, १९५५.

श्री. गुं. फ. आजगांवकर
३३६/२ भाई जीवनजी लेन, बम्बई

प्रिय महोदय,

आपके द्वारा भेजी 'आजगांव दर्शन' नामक पुस्तक की एक प्रति राष्ट्रपति जी के नाम प्राप्त हुई। इसके लिये उन्होंने मुझे आप के पास धन्यवाद भेजने को कहा है।

भवदीय,
वी. जे. मोर
अण्डर सेक्रेटरी.

## थोरांचे अभिप्राय

तुम्ही पाठविलेलें 'आजगांव दर्शन' हें पुस्तक काल पोहोंचलें. पुस्तक वाचून पहातांना अनेक जुन्या आठवणी जाग्या झाल्या. निरनिराळ्या गांवांच्या विषयीं अशींच माहितीपूर्ण पुस्तकें प्रसिद्ध झाल्यास फार चांगलें.

वि. स. खांडेकर (कोल्हापूर)

आजगांव हा गांव ब्राह्मणांनीच वसविला हें निधान तर्कप्रधान आहे. त्यास आधार म्हणजे श्री परशरामाचे सुमारे सातशें आठशें वर्षांपूर्वीचें बांधकाम आहे. त्याचप्रमाणें श्री आदित्यनाथाचें देवालयही अतिप्राचीन आहे. ब्राह्मणाची मुख्य दीक्षा, द्विजकारक गायत्री मंत्र आहे. मंत्रप्रतिपाद्य देवता सप्ताश्वरथ संयुक्त श्री सूर्य (आदित्य) नारायण होय. त्या प्रिय उपास्य देवतेचें देवालय ब्राह्मणांवाचून दुसरे अनधिकारी कोण बांधणार ?

## आजगांवच्या विकासाचें स्वरूप

**पाण्याचे सांठे—**

शंभर वर्षांपूर्वी आजगावांतील लोकांनीं सामुदाईक सहकारानें 'दुकम पाटा' नांवाचा दोन फर्लांग लांबीचा एक बांध घालून दुकम तलाव तयार केला होता. ह्याच बांधाचें रुपांतर सरकारी रस्त्यांत झालें. गेलीं कित्येक वर्षे सारखी झीज होऊन रस्त्याची उंची दोन फूट कमी झाली आहे. ही उंची व रुंदी सहा फूट वाढविल्यास पाणी पुरवठ्यास मदत होईल. यांतील तिन्ही मानशी दुरुस्त केल्या पाहिजेत. पूर्वी 'सांडवें' भागांत अशाच तऱ्हेनें पाणी सांठविण्याची वहिवाट होती. जरूर ती दुरुस्ती केल्यास सांडवें व दुकम तलावापासून उन्हाळी पीक सुमारें तीनशें भरे काढतां येईल. शिवाय बागायतीस पाणी मिळेल. बांधवाडा येथील नाटेकर तळींतून सांचलेला गाळ काढून टाकल्यास तेथेंहि पाण्याचा सांठा उपलब्ध होण्यासारखा आहे.

## रस्त्यांची दुरुस्ती व इतर सोई

ढाकोरे वाडींतून बांधघाटीवर जाणारा जुना रस्ता, सावकारवाड्याहून बांधघाटीनें जाणारा रस्ता, सावकारवाड्याहून देऊळवाड्याला जाणारा रस्ता, व भोमवाड्यांतून तिरोडा येथें जाणारी पायवाट यांची दुरुस्ती गाडी रस्त्यास योग्य अशी केल्यास दळणवळणाचा प्रश्न सुटेल. निखार्‍यांची मानस दुरुस्त केल्यास जमिनींत येणारें समुद्राचें पाणी बंद होईल. गांवांत काजूकारखाना व सहकारी दुकान चालण्यासारखें असून तेथील ग्रंथसंग्रहालयाची सरकारी मदतीनें वाढ करतां येईल. गांवांत लोकवस्ती भरपूर असल्यानें पोलीस चौकी, स्वतंत्र पोस्ट ऑफीस, व ग्रामपंचायत होणें इष्ट आहे.

# राष्ट्रपतींचा आशीर्वाद !

सेक्रेटरी टु धि प्रेसिडेंट ऑफ इंडिया
राष्ट्रपति भवन, नवी दिल्ली.
८ जनवरी, १९५५.

श्री. गुं. फ. आजगांवकर
३३६/२ भाई जीवनजी लेन, बम्बई

प्रिय महोदय,

आपके द्वारा भेजी 'आजगांव दर्शन' नामक पुस्तक की एक प्रति राष्ट्रपति जी के नाम प्राप्त हुई। इसके लिये उन्होंनें मुझे आप के पास धन्यवाद भेजने को कहा है।

भवदीय,
बी. जे. मोर
अण्डर सेक्रेटरी.

# थोरांचे अभिप्राय

तुम्ही पाठविलेलें 'आजगांव दर्शन' हें पुस्तक काल पोहोंचलें. पुस्तक वाचून पहातांना अनेक जुन्या आठवणी जाग्या झाल्या. निरनिराळ्या गांवांच्या विषयीं अशींच माहितीपूर्ण पुस्तकें प्रसिद्ध झाल्यास फार चांगलें.

वि. स. खांडेकर (कोल्हापूर)

सा. न. वि. वि.

आजगांव दर्शन पुस्तक पाठविल्याबद्दल आभारी आहे. अशीं बारकाव्याचीं वर्णनें प्रत्येक लहानमोठ्या ग्रामासंबंधीं व्हावयास पाहिजेत; आणि माझ्या मतें त्यांत भावी उत्कर्षाच्या सूचना पाहिजेत. हें गांव शेंकडो वर्षांपूर्वी वसलें गेलें त्यावेळची सर्व परिस्थिती बदलली. नवीन मनूस अनुसरून आतां ग्राम-सुधारणेच्या कोणत्या बाबी लक्षांत घेतल्या पाहिजेत, कालवे, रेल्वे, शेती उत्पन्न, खाणी, वीज अशा कोणत्या बाबती आतां स्वीकारण्याजोग्या आहेत याचें विवेचन प्रत्यक्ष अनुभवानें अशा गांवासंबंधीं प्रसिद्ध होईल तर हल्लीं जो ग्रामसुधारणेचा विषय सरकारपुढें आहे त्यास जनतेचा सहकार मिळूं शकेल. हल्लीं स्वराज्याचा काल आहे. त्यांत लोकांनीं संपूर्ण भाग घेतला पाहिजे, तरच देशाचें दैन्य निवारण होईल. हें पुस्तक वाचून मला पुष्कळशी नवीन माहिती मिळाली. या विषयाचा असा खोल अभ्यास केल्याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों. लोभ निरंतर असों द्यावा रियासतकार **गो. स. सरदेसाई**

मूळ आद्यग्राम नांव असलेल्या एका कोंकणी गांवाची सर्वांगीण माहिती देणारें हें छोटें पुस्तक आहे. श्री. गुं. फ. आजगांवकर यांचें हें लेखन अभिनंदनीय व अनुकरणीय वाटतें. ( लोकमान्य, मुंबई )

आपल्याकडून आठवणीनें आलेलें पुस्तक 'आजगांव-दर्शन' हें मिळालें. फार फार आभारी आहें. प्रत्येक गांवच्या वैशिष्ट्यानें भरलेलीं अशाप्रकारचीं पुस्तकें निघतील तितकीं थोडींच. माझ्यातरी पाहण्यांत अशा प्रकारची सांगो-पांग सुसूत्र माहिती एखाद्या गांवची असलेली अशी याच पुस्तकांत आढळली. मी तुमचें हार्दिक अभिनंदन करतों.

हीरारत्न श्री. **वसंत लाडोबा म्हापणकर** [मालवण]

'माझा गांव बदलापूर' हें श्री. ना. गो. चापेकर यांचे पुस्तक ज्यांनीं वाचलें असेल, त्यांना श्री. गुं. फ. आजगांवकर यांच्या आजगांव दर्शन या पुस्तकाचें महत्व सहज पटेल श्री. आजगांवकर यांच्या या सुंदर सचित्र पुस्तकाचा मराठी वाचकांना परिचय करून देण्याची कामगिरी प्रस्तावनेच्या व पुरस्काराच्या रूपानें महाराष्ट्रभाषा भूषण आजगांवकर व चं. वि. बावडेकर या दोन मान्यवर साहित्यिकांनी पार पाडली आहे. **धनुर्धारी–१८।१२।५४**